सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, दि. २० जून २०२५ वर्ष - तिसरे अंक ७८ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## देशात इंग्रजी बोलणाऱ्यांना स्वत:ची लाज वाटेल...

### गृहमंत्री शहांचा हल्लाबोल!

नवी दिल्ली : भारतीय भाषा या देशाच्या आत्म्याचे आणि सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक आहेत. भारतीय भाषा ही आपली ओळख आहे त्याचा अभिमान बाळगावा असं आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलं. लवकरच इंग्रजीतून संवाद साधणाऱ्यांना स्वतःची लाज वाटेल असा समाज तयार होईल अशी आशाही त्यांनी व्यक्त केली. माजी आयएएस अधिकारी आशुतोष अग्निहोत्री यांच्या 'मैं बूंद स्वयं, खुद सागर हूं' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी




अमित शाह बोलत होते. या वेळी त्यांनी भारतीय भाषांचे महत्त्व अधोरेखित केले आणि इंग्रजी भाषेवरील अवलंबित्वावर जोरदार टीका केली. आपण आपल्या भाषिक वारशाचा अभिमान बाळगण्याची आणि त्याचा जागतिक स्तरावर गौरव करण्याची वेळ आली आहे असं अमित शाह म्हणाले. तसेच इंग्रजीवर अवलंबित्व असलेल्यांवर त्यांनी टीका केली.

इंग्रजी बोलणाऱ्यांना स्वतःची लाज वाटेल

अमित शाह म्हणाले की, भारतीय भाषा ही आपली खरी ओळख आहे. लवकरच असा समाज निर्माण होईल ज्यामध्ये इंग्रजी बोलणाऱ्यांना त्यांची स्वतःची लाज वाटेल. ज्यांना वाटते की हा बदल शक्य नाही, त्यांनी लक्षात घ्यावे की बदल दृढनिश्चयी लोकच घडवतात. आपल्या भाषा म्हणजे आपल्या संस्कृतीची शान आहे.

'पंच प्राण' भारताच्या अमृतकालाचे संकल्प

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या 'पंच प्राण' संकल्पांचा उल्लेख करत शहा म्हणाले की, हे १३० कोटी भारतीयांचे ध्येय बनले पाहिजे. या ५ संकल्पांद्वारे २०४७ पर्यंत भारत जगात सर्वोच्च स्थानावर पोहोचेल आणि त्या प्रवासात भाषांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असेल.

परदेशी भाषा भारत समजून घेण्यासाठी अपुरी आहे असं म्हणत अमित शाहांनी इंग्रजी आणि इतर परदेशी भाषांवर टीका केली. परदेशी भाषा या भारताच्या इतिहास, संस्कृती आणि धार्मिक परंपरा समजून घेण्यासाठी पुरेशा नाहीत असं अमित शाह म्हणाले. अर्धवट परदेशी भाषांद्वारे भारत कधीच समजला जाऊ शकत नाही. ही लढाई सोपी नाही, पण मला विश्वास आहे की आपण ती जिंकू. आपण आपल्या भाषांमध्ये देश चालवू आणि जगाचे नेतृत्वही करू असा आत्मविश्वास अमित शाहांनी व्यक्त केला.

## इराणमध्ये अडकलेल्या ११० भारतीय विद्यार्थ्यांना सुरक्षितरित्या आणले

नवी दिल्ली: इराणमध्ये अडकलेले ११० भारतीय विद्यार्थी दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचले आहेत. यातील अधिकतर विद्यार्थी हे जम्मू-काश्मीरचे आहेत. हे विद्यार्थी उमिया मेडिकल युनिर्व्हसिटीचे आहेत. विद्यार्थ्यांनी अर्मेनिया आणि दोहाच्या रस्त्याने दिल्लीसाठी उड्डाण केले होते. त्यांचे विमान ३ तास उशिराने पोहोचले.

इराण आणि इस्त्रायल यांच्यातील युद्ध पाहता भारत सरकारने इराणमध्ये अडकलेल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षित आणण्यासाठी ऑपरेशन सिंधूची



सुरूवात केली. सरकारच्या या विशेष ऑपरेशन अंतर्गत १७ जूनला इराणच्या उत्तर भाहात अडकलेल्या ११० भारतीय विद्यार्थ्यांना सुरक्षितरित्या बाहेर काढण्यात आले. या विद्यार्थ्यांना भारतीच्या दूतावासाच्या देखरेखीखाली रस्ते मार्गाने इराण येथून आर्मेनियाची राजधानी येरेवान येथे पोहोचवण्यात आले. ते या रस्त्याने दिल्लीला आले.

सर्व विद्यार्थी बुधवारी दुपारी २.५५ वाजताच्या स्पेशल फ्लाईटने भारताच्या दिशेने रवाना झाले आणि गुरूवार सकाळी दिल्लीला पोहोचले.

## मुंबई शहर जिल्ह्यात १४२ मिमी पाऊस, मुंबई - पुण्यासाठी २४ तास धोक्याचे

मुंबई : भारतीय हवामान विभागाने नाशिक आणि पुणे जिल्ह्याच्या घाट क्षेत्रात आज गुरुवारी अतिवृष्टीची शक्यता व्यक्त करुन रेट अलर्ट जारी केला आहे. मुंबई, रायगड, नाशिक, सातारा, जिल्ह्यातील घाट क्षेत्रातील मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. हवामान खात्याचा अंदाजानुसार पुढील चार दिवस पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्याच्या घाट क्षेत्राला पुढील चार दिवस यलो अलर्ट दिला आहे. रत्नागिरी, पालघर, ठाणे, आणि सिंधुदुर्गात पुढील चार दिवस जोरदार पावसाची शक्यता असल्याचे हवामान केंद्राने म्हटले आहे.

विशेष म्हणजे पुणे जिल्ह्यातील घाट क्षेत्रात पुढील चार दिवस पावसाचा जोर अधिक राहणार आहे. कोल्हापूर जिल्ह्याच्या घाट क्षेत्राला पुढील चार दिवस जोरदार पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गात पुढील चार दिवस जोरदार पावसाची शक्यता असल्याचे हवामान केंद्राने म्हटले आहे. राज्यातील उर्वरित भागात पुढील चार दिवस हलक्या ते मध्यम पाऊस राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच मुंबई - पुणे जिल्ह्यात पुढील २४ तासात पावसाचा जोर वाढण्याची हवामान खात्याने शक्यता वर्तवली आहे.

मुंबईत १४२ मिमी पाऊस

राज्यात मागील २४ तासांमध्ये (१९ जून २०२५ रोजी सकाळपर्यंत) मुंबई शहर जिल्ह्यात १४२.६ मिमी पाऊस झाला आहे. तर रायगड जिल्ह्यात १३४.१ मिमी, पालघर १२०.९ मिमी, ठाणे ९०.३ मिमी आणि मुंबई उपनगर जिल्ह्यात ६०.५ मिमी सर्वाधिक पावसाची नोंद झाली आहे.

## विमान अपघातानंतर एअर इंडियाने १५% आंतरराष्ट्रीय उड्डाणे केली कमी!

नवी दिल्ली : अहमदाबादमध्ये ड्रीमलायनर विमानाच्या अपघातानंतर आणि इराण-इस्त्रायल संघर्ष सुरू असल्याने, एअर इंडियाच्या आंतरराष्ट्रीय सेवा जुलैच्या मध्यापर्यंत किमान १५ टक्क्यांनी कमी करण्यात येणार आहेत. एअर इंडियाने बुधवारी (१८ जून) संध्याकाळी उशिरा सांगितले की, लांब पल्ल्याच्या आणि अति लांब पल्ल्याच्या ठिकाणांना जोडणाऱ्या वाइडबॉडी विमानांवरील आंतरराष्ट्रीय उड्डाणे १५% कमी करणार आहे.

६ दिवसांत ८३ उड्डाणे रद्द

एअर इंडियाने स्वतःहून बोइंग ७७७ विमानांच्या तपासणीसाठी अतिरिक्त खबरदारी घेण्याचे ठरवले आहे. मध्य पूर्वेतील तणाव, युरोप




आणि पूर्व आशियातील अनेक देशांतील हवाई क्षेत्रावरील रात्रीचे निर्बंध आणि तांत्रिक अडचणींमुळे गेल्या ६ दिवसांत ८३ उड्डाणे रद्द झाली आहेत. या सर्व कारणांमुळे एअर इंडियाने आपल्या वाइडबॉडी उड्डाणांमध्ये १५% कपात करण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यामुळे परिचालन स्थिरता आणि कार्यक्षमता वाढेल आणि प्रवाशांना होणारा त्रास कमी होईल.

२० जून २०२५ पासून लागू

एअर इंडियाची ही १५% कपात प्रामुख्याने युरोप, उत्तर अमेरिका आणि दक्षिण-पूर्व आशियातील लांब पल्ल्याच्या मार्गांवर परिणाम करेल, जिथे बोइंग ७८७, बोइंग ७७७ आणि एअरबस -३५० ही वाइडबॉडी विमाने वापरली जातात. ही कपात २० जून २०२५ पासून लागू होईल आणि किमान मध्य जुलैपर्यंत चालेल. या कालावधीत, एअर इंडियाने प्रवाशांना पर्यायी उड्डाणांवर सामावून घेण्याचे किंवा पूर्ण परतावा देण्याचे आश्वासन दिले आहे. प्रवाशांना कोणत्याही अतिरिक्त शुल्काशिवाय उड्डाणे पुन्हा बुक करण्याचा पर्याय उपलब्ध आहे.

नवीन सुधारित उड्डाण वेळापत्रक २० जून २०२५ रोजी जाहीर केले जाईल, ज्यामुळे प्रवाशांना त्यांच्या प्रवासाची पुनर्रचना करण्यास मदत होईल. एअर इंडियाने या बदलांमुळे प्रभावित प्रवाशांची माफी मागितली आहे आणि त्यांना आगाऊ सूचना देण्याचे आणि पर्यायी व्यवस्था करण्याचे वचन दिले आहे. याशिवाय, या कपातीमुळे राखीव विमानांची उपलब्धता वाढेल, ज्यामुळे अनपेक्षित व्यत्यय हाताळणे सोपे होईल. एअर इंडियाच्या या निर्णयाला नागरी उड्डाण मंत्रालय आणि डीजीसीए यांचे समर्थन आहे, ज्यांनी विमानांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्याचे आवाहन केले आहे.

AI171 घटनेत प्रवासी आणि कर्मचारी यांच्यासह जीवितहानीबद्दल तीव्र दुःख व्यक्त करताना, एअर इंडियाने म्हटले आहे की औपचारिक चौकशी सुरू आहे. कारणे निश्चित करण्यासाठी आणि त्यांचे सुरक्षा प्रोटोकॉल आणखी वाढवण्यासाठी एअरलाइन नागरी विमान वाहतूक महासंचालनालय , विमान अपघात तपास ब्युरो आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांसोबत जवळून काम करत आहे.

## पर्यटनाच्या नावाखाली गांजाची तस्करी, २५ कोटींचा गांजा जप्त

मुंबई : भारतात गेल्या काही महिन्यांपासून गांजा विकण्याचं प्रमाण वाढतं चाललेलं आहे. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय मुंबई विमानतळावर २४ किलो ९६ ग्रॅम हायड्रोपोनिक गांजा जप्त करण्यात आला. विशेष म्हणजे ही कारवाई सीमा शुल्क विभागाकडून करण्यात आली. गांजाची तस्करी थायलंडहून करण्यात आली असून, यात दोन प्रवाशांसह गांजाची खरेदी करण्यात आलेल्या व्यक्तीलाही अटक करण्यात आली आहे. या गांजाची किंमत २४ कोटी ६६ लाख रुपये असल्याची माहिती



सीमा शुल्क विभागाने दिली आहे.

मुंबई विमानतळावर आलेल्या दोन प्रवाशांना सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी थांबवले आणि त्यांच्या सामानाची तपासणी केली. त्यांच्या सामानात हिरव्या रंगाची पाने सापडली असून हायड्रोपोनिक गांजा असल्याचे निष्पन्न झाले... त्याच दरम्यान गांजा खरेदी करण्यासाठी आलेल्या व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले. अटक करण्यात आलेल्या तिघांवर अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक तपासातून हे प्रकरण आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ तस्करांच्या टोळीशी संबंधित असल्याचे निष्पन्न झाले. त्याचबरोबर ताब्यात घेण्यात आलेल्या व्यक्तींचे मोबाईल देखील तपासासाठी घेण्यात आले.

मोबाईलमधील संभाषणाद्वारे परदेशी नागरिकांचा समावेश असल्याची माहिती मिळाली असून संबंधित आरोपींचा शोध सुरु आहे. अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. पर्यटनाच्या नावाखाली अनेक प्रवाशी भारताता येतात, त्यामुळे गांजाची विक्री मोठ्या प्रमाणावर होत असते. अशी माहिती चौकशी दरम्यान पुढे आली. गांजाची निर्मीती दक्षिण अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर होतं असते. गेल्या सहा महिन्यात १०० कोटीहून अधिक प्रमाणात गांजा जप्त करण्यात आला आहे. बँकॉकमार्गे भारतात गांजाची तस्करी करण्यात येते. अशी सीमा शुल्क विभागाने माहिती दिली.....

## पु.ल. देशपांडे कला अकादमीमध्ये स्वतंत्र संशोधन केंद्र सुरु : आशिष शेलार यांची माहिती

मुंबई : महाराष्ट्रातील प्रयोगात्मक कलांचा अभ्यास आणि संशोधन करण्यासाठी राज्य सरकाने स्वतंत्र कला अकदामी केंद्र सरु करण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे पु. ल. देशपांडे कला अकदामीमध्ये स्वतंत्र संशोधन केंद्र सुरु करण्यात येणार आहे अशी माहिती राज्याचे सांस्कृतीक मंत्री आशिष शेलार यांनी दिली.

महाराष्ट्राला कलांचा वैभवशाली वारसा लाभलेला असून, त्यात आणखीन नाविन्यपूर्ण बदल करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने सांस्कृतिक विभागाकडे नाटक, लोककला संस्कृती, संगीत अशा अनेक कलांची माहिती उपलब्ध आहे. परंतू वेगवेगळ्या विभागात त्याचे वर्गीकरण होऊन त्याचा अनेक कलाकरांना, बाहेरील विद्यार्थ्यांना, संशोधन करणाऱ्यांना अभ्यास करता येणारा असल्याची माहिती आशिष शेलार यांनी दिली.

तसेच जे विद्यार्थी पिचडी करत असतात त्यांना या विभागाचा नक्कीच फायदा होणार असल्याचा विश्वास देखील आशिष शेलार यांनी व्यक्त केलाय...त्यामुळे या विषयाबाबत आज सांस्कृतीक कार्यमंत्री ड आशिष शेलार यांनी विभागाची मंत्रालयात बैठक घेऊन घोषणा केली. तसेच या संशोधन केंद्राचा प्रारुप आराखडा तयार करण्याचे निर्देश विभागाला दिले. या बैठकीला सांस्कृतिक कला संचनालयाचे संचालक बिभीषण चवरे यांच्या विभागाचे सबंधति अधिकारी, लोककलांचे अभ्यासक प्रकाश खांडगे यावेळी उपस्थित होते.

## बेकायदेशीर निविदा प्रक्रिया राबवून एक कोटींचा अपहार; कार्यकारी अभियंत्याविरुद्ध गुन्हा दाखल

नाशिक : खोटे दस्तऐवज तयार करून निविदा तयार करून बेकायदेशीरपणे निविदा प्रक्रिया राबवून शासनाच्या एक कोटी रुपयांचा अपहार केल्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी जि. प. च्या कार्यकारी अभियंत्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत जिल्हा परिषदेचे कनिष्ठ प्रशासन अधिकारी प्रदीप रतन अहिरे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात म्हटले आहे, की जिल्हा परिषदेच्या (इवद) विभाग क्रमांक ३ च्या तत्कालीन कार्यकारी अभियंता आरोपी शैलजा नलावडे यांनी इतर इसमांच्या संगनमताने शासन निर्णय क्रमांक टीडीएस २०२४/६/प्र. क्र. १२०/पर्यटन-१ दि. ६ ऑगस्ट २०२४ हा बनावट तयार केला. त्याद्वारे एक कोटी रुपयांची पर्यटनस्थळांच्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळाल्याचे भासवून हा बनावट शासननिर्णय बेकायदेशीरपणे शासकीय लेखा अहवाल नोंदविला. खोटे दस्तऐवज तयार करून निविदा भरणाऱ्या इसमांना शासनाच्या एक कोटी रुपयांच्या निधीचा गैरलाभ व्हावा, या उद्देशाने इतर शासकीय अधिकाऱ्यांची दिशाभूल व फसवणूक करून बेकायदेशीरपणे निविदा प्रक्रिया राबवून शासनाच्या एक कोटी रुपयांच्या निधीचा अपहार करण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार दि. ४ डिसेंबर २०२४ ते ५ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत जिल्हा परिषदेच्या इमारत व दळणवळण विभाग क्रमांक ३ च्या कार्यालयात घडला. या प्रकरणी जिल्हा परिषदेचे कनिष्ठ प्रशासन अधिकारी प्रदीप अहिरे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार भद्रकाली पोलीस ठाण्यात तत्कालीन कार्यकारी अभियंता शैलजा नलावडे व इतरांविरुद्ध अपहाराचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक मोहिते करीत आहेत.

## अपर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक संपन्न

अहिल्यानगर, दि.१९- ग्राहकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक अपर जिल्ल्हाधिकारी शैलेश हिंगे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न्न झाली.

बैठकीस उपजिल्हाधिकारी जिल्हा पुरवठा अधिकारी हेमलता बडे, उपजिल्हाधिकारी गौरी सावंत,अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त सो.ह इंगळे वैधमापनशास्त्र विभागाचे उप नियंत्रक रमेश दराडे उपस्थित होते.

अपर जिल्हाधिकारी श्री हिंगे म्हणाले, ग्राहकांच्या समस्यांची सोडवणूक समन्वयातून व्हावी. पावसामुळे रस्त्यावर उन्मळून पडलेली झाले, विद्यूत पोल आदी तातडीने हटविण्यात यावीत. नागरिकांना विद्युत विषयक असलेल्या समस्यांची तक्रार करण्यासाठी २४७ हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वित राहील, याची दक्षता घ्यावी. विद्यूत विषयक दुरुस्तीचे कामे प्राधान्याने करण्यात यावीत. नागरिकांना जारच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासणीबरोबरच फळे पिकवण्यासाठी रसायन वापराच्या तक्रारीच्या अनुषंगाने फळे विक्रेत्यांची तपासणी करुन दोषींवर कडक कारवाई करण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी दिल्या. सेतु सुविधा केंद्रातून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा योग्य आहेत काय, त्यासाठी आकारला जाणारे फिस, दिली जाणारी सेवा याच्या तपासणीसाठी लवकरच अभिप्राय कक्ष कार्यान्वित करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

बैठकीत अहिल्यानगर शहरात गुटख्याची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई, प्रत्येक सेतू सुविधा केंद्राच्या दर्शनी भागात दरसूची लावणे, आरोग्यासाठी हानीकारक असलेले प्लास्टिक कप, ग्लासचा वापरावर निर्बंध व जागृती करणे, भेसळयुक्त पनीर विक्री करणाऱ्यांवर कारवाई, ऊर्जामित्र बैठकीचे आयोजन, पेट्रोल पंपावर नागरिकांना आवश्यक त्या सुविधा पुरविणे, शासकीय दवाखान्यातून मोफत औषध पुरवठा आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.

बैठकीस विविध विषयांवरील चर्चेत अशासकीय सदस्य अतुल कुऱ्हाडे, विलास जगदाळे, प्रा. अमिता प्रीतमसिंग रानू-कोहली, दिनेश थोरात, अशोक शेवाळे, रणजित श्रीगोड, उमा मेहेत्रे, गजेंद्र क्षीरसागर, बाबासाहेब भालेराव, डॉ. कळमकर राजेंद्र पर्वती, प्रा. डॉ. मंगला भोसले, डॉ. अशोक गायकवाड, डॉ. विलास सोनवणे, डॉ. गोरख बारहाते, प्रकाश रासकर, रभाजी सुळ यांनी सहभाग घेतला.

## दिव्यांग बालकांच्या तपासणी शिबिरांचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि.१९ - महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे आदेशान्वये जिल्हा विधी सेवा प्राधिकरण औरंगाबाद, दिव्यांग कल्याण आयुक्तालय पुणे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी औरंगाबाद, आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बालकांमधील दिव्यांगत्वाचे निदान, तपासणी शिबीराचे आयोजन केले आहे. दि.२१ जून २०२५ रोजी दुपारी १२ वा. जिल्हा रुग्णालय घाटी येथील बाह्य रुग्ण विभागाच्या पोर्चमध्ये करण्यात आले आहे. शिबीरामध्ये शहरातील ० ते १८ वयोगटातील ज्या दिव्यांग बालकांना यु.डी.आय.डी.प्रमाणपत्र मिळाले नाही त्यांची तपासणी करुन त्यांना यु.डी. आय.डी. प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येईल व जिल्हा समाज कल्याण विभागामार्फत दिव्यांग बालकांसाठीच्या योजना विषयी मार्गदर्शन करण्यात येईल.

## हिंगोलीत बोगस बियाणांचा साठा जप्त

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १९ जून

शहरातील मच्छी मार्केट येथील गोदावरी कृषी केंद्रावर जिल्हा परिषद कृषी विभागाच्या पथकाने छापा मारला. यावेळी कृषी केंद्रात मोठ्या प्रमाणावर बोगस डी ए पि खताचा साठा आढळला. पथक पंचनामा करीत आहे.

सध्या पेरणीची लगबग जिल्हयात शेतकरी बी बियाणे आणि खत, औषध कृषी केंद्रावरून खरेदी करण्यासाठी गर्दी करीत आहे. शेतकरी डी ए पी खताला जास्त प्राधान्य देत असल्यामुळे या खताला शेतकऱ्यांची मोठी मागणी आहे. कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना बोगस बी बियाणे व खत याबाबत सावधान राहण्याचे आवाहन केले



आहे. तसेच बोगस खत, बी बियाणे विरोधात पथके स्थापन करण्यात आली आहेत. दरम्यान आज कृषी विभागाच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पथकाने शहरातील गोदावरी कृषी केंद्र येथे छापा मारला असता त्याठिकाणी बोगस डी ए पी खताचा मोठ्या प्रमाणावर साठा आढळून आला. या घटनेमुळे शेतकऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून आता पर्यंत किती शेतकऱ्यांनी या केंद्रातून बोगस डी ए पी नेले आहे याचाही शोध घ्यावा लागणार आहे. पथकाने केंद्राला सिल केले असुन सदरील कार्यवाही कृषी विभागाचे अधिकारी अतुल वायसे, आर एन पुंडगे, जितेंद्र सोनटक्के यांच्या पथकाने केली आहे.

## वारकऱ्यांच्या सेवेसाठी फिरता दवाखाना

मुंबई : विठू नामाच्या गजरात, ज्ञानोबाची पालखी खांद्यावर घेऊन अभंग गात, वारकरी भक्तीमध्ये भगवंताच्या नामस्मरणात मग्न झालेला असतो. वारकऱ्यांची आरोग्याची दखल घेत, वारकऱ्यांसाठी फिरता दवाखान्याची सोय करण्यात आली. वारकऱ्यांची सेवा म्हणजे साक्षात पांडुरंगाचा आशीर्वाद असतो, अशी भावना चंद्रकांत दादा पाटील यांनी व्यक्त केली. वारकऱ्यांच्या सेवेसाठी सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठ आणि शीला राज साळवे ट्रस्ट यांच्या वतीने 'फिरता दवाखाना' सुरु करण्यात आला आहे. फिरता दवाखाना या उपक्रमाचे उद्घाटन चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

## आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी 'धरती आभा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान'

छत्रपती संभाजीनगर, दि.१९ (जिमाका)- आदिवासी जमातीच्या आर्थिक व सामाजिक विकासाकरीता मत्स्यव्यवसाय विभागामार्फत केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री मत्स्यसंपदा या योजनेअंतर्गत क्काकल्चर व मत्स्यव्यसाय वृद्धींगत करण्याकरीता 'धरती आभा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान' ही सहयोजना सन २०२४-२५ ते २०२८-२९ या कालावधीसाठी राबविण्यात येत आहे.

योजना राबविण्याकरीता महाराष्ट्र राज्यातील ३२ जिल्ह्यांतील १९२ तालुक्यांमधील ४९१७ गावंचा समावेश असून यामध्ये जिल्ह्यतील ४ तालुके (कन्नड, सोयगाव, सिल्लोड व खुलताबाद) व ११ गावंचा समावेश आहे.

योजनेद्वारे आदिवासी क्षेत्र व समुदायांचा विस्तृत विकास करण्याकरीता मूळ पायाभूत सुविधा, आरोग्यसेवा, शिक्षण, रोजीरोटी या समस्यांचे निराकरण करण्याकरीता उपलब्ध संसधानांमधील दुरावा व अंतर दुर करणे इ. साध्य करण्याचे उद्दिष्ट आहे.

दि.१५ जून ३० जून या कालावधीत 'धरती आभा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान' विशेष अभियान राबविण्यात येणार असून यामध्ये गाव पातळीवरील, क्लस्टर पातळीवरील शिबिरे आयोजित करुन शासनाच्या विविध सेवा प्रत्यक्षात पुरविण्याचे नियोजन आहे. योजनेबाबतच्या अधिक माहितीसाठी जिल्ह्यातील ग्रामस्तरीय यंत्रणा तसेच सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय छत्रपती संभाजीनगर कार्यालयाशी संपर्क साधावा.

कार्यालयाचा पत्ता सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, दुग्धव्यवसाय विकास विभाग, पहिला माळा, दुध डेअरी सिग्नल जवळ, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर - पिन ४३१ ००१ ई-मेल acfchhatrapatisambhajinagar145@gmail.com असे आवाहन सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय डॉ.मधुरिमा जाधव यांनी केले आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बसवेश्वर महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुखपदी प्रा. तडवी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ जून -**
श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुखपदी प्रा. रमेश तडवी यांची संस्थेच्या आदेशान्वये नियुक्ती करण्यात आली आहे.

त्याबद्दल त्यांचा नुकताच इंग्रजी विभागामध्ये प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते शाल, पुष्पहार आणि नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी मुख्य समन्वयक डॉ. भास्कररेड्डी नल्ला, उपप्राचार्य (कनिष्ठ) प्रा. वनिता पाटील, समाजकार्य विभाग प्रमुख डॉ. दिनेश मौने, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी, मराठी विभागप्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. विजयकुमार सोनी, रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मंतोष स्वामी, गणित विभागप्रमुख डॉ. सुजीत हांडीबाग, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. दीपक चाटे, दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गुणवंत बिराजदार, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ. जे. एच. देशमुख, डॉ. डी. आर. भुरे, प्रा. आशीष क्षीरसागर आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती. त्यानंतर संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी सहसचिव सुनील मिटकरी, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, मुख्य समन्वयक डॉ. भास्कररेड्डी नल्ला, उपप्राचार्य (कनिष्ठ) प्रा. वनिता पाटील, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. विजयकुमार सोनी, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. सिद्राम डोंगरगे आणि संस्था कार्यालय प्रमुख गुरुलिंग शेटे यांची उपस्थिती होती. यावेळी प्रा. रमेश तडवी, डॉ. भास्कररेड्डी नल्ला आणि प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी मनोगते व्यक्त केली.



### संक्षिप्त वृत्त...

## किड्स प्लॅनेट स्कूल येथे प्रवेशोत्सव; औक्षण करून विद्यार्थ्यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ जून -**
शहरातील मोतीनगर भागातील किड्स प्लॅनेट स्कूल येथे शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले.



पहिल्याच दिवशी शाळेमध्ये आकर्षक सजावट करण्यात आली होती. शाळेच्या संचालिका सौ. गंगा पांचाळ यांनी विद्यार्थ्यांचे भारतीय परंपरेनुसार ओवाळून स्वागत केले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या हस्ते सरस्वतीचे पूजन करून आशीर्वाद घेतले. शाळेतर्फे विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी पॅड भेट देण्यात आले. यावेळी मोठ्या प्रमाणात पालक व विद्यार्थी उपस्थित होते. पालकांनी शाळेच्या उपक्रमाचे कौतुक केले.या शाळेमध्ये शिक्षणाबरोबरच भारतीय परंपरा जपली जाते, विद्यार्थ्यांवर संस्कार घडवले जातात असे मत पालकांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षिका व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ जून -**
वीरशैव लिंगायत समाज, लातूर व प्रियंका चॅरिटेबल ट्रस्ट, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. २८ जुन ०२५ रोजी वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या सत्कार सोहळ्यासाठी ष . ब्र . १०८ शेती शंभूलिंग शिवाचार्य महाराज, अंबाजोगाई , भारतीय जनता पार्टीच्या ज्येष्ठ नेत्या डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या मान्यवरांच्या हस्ते दहावी - बारावी परीक्षेत ९० टक्के पेक्षा अधिक गुण घेतलेले विद्यार्थी, डॉक्टर, इंजिनिअर, यूपीएससी - एमपीएससी, सीए, बी. फार्म. , एम. फार्म, एल.एल.बी., एम.बी.ए., गुणवत्तेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात येणार आहे. पात्र विद्यार्थ्यांनी दि. २७ जून २०२५ पर्यंत वीरशैव भवन, खंडोबा गल्ली, लातूर या ठिकाणी नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. शनिवार, दि. २८ जून रोजी दुपारी अडीच वाजता वीरशैव सांस्कृतिक भवन येथे होणाऱ्या या सत्कार सोहळ्यास समाजातील विविध स्तरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे ,असे आवाहन उमाकांत कोरे, नागेश कानडे, तम्मा चौंडा, सुनील भिमपुरे , दिलीप होनराव, बालाजी पिंपळे, वैभव विभूते , महेश कोळळे , प्रा.आशिष स्वामी, एड. पंकज कोरे, कमलाकर खराबे यांसह वीरशैव लिंगायत समाजातील सर्व मान्यवरांनी केले आहे.

## आर्षयोग प्रतिष्ठान, पतंजलि योग समिती वतीने जागतिक योग दिनानिमित्त कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ जून -**
जागतिक योगदिनानिमित्त आर्षयोग प्रतिष्ठान, पतंजलि योग समिती व जेएसपीएम संस्थेच्यावतीने २१ जून २०२५ रोजी सकाळी ७.३० वा. विवेकानंदपूरम् शैक्षणिक संकुल, पी-७४ एमआयडीसी, कळंब रोड, लातूर येथे अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत जागतिक योगदिनाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या कार्यक्रमाला माजी कामगार कल्याण मंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर, औसा मतदार संघाचे आमदार अभिमन्यू पवार, लातूर ग्रामीणचे आमदार रमेशअप्पा कराड, माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, भाजपाचे लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील मुरूमकर, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर व इतर मान्यवरांना निमंत्रित करण्यात आलेले आहे. तसेच पंतजलि योग समितीचे महाराष्ट्र प्रभारी विष्णूजी भूतडा, पतंजलि योग समितीचे लातूर जिल्हाध्यक्ष राम घाडगे, आर्षयोग प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष व्यंकटेश हालिंगे, डॉ.किरण सगरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे जागतिक योग दिनानिमित्त आयोजित योग कार्यक्रमाला योगप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विनोद जाधव, बापूसाहेब गोरे, प्राचार्य गोविंद शिंदे, प्राचार्य सूर्यवंशी आदिंनी केले आहे.

# जागृती शुगरच्या मिल रोलरचे पूजन

### साडेसात लाख मेट्रिक टन गाळपाचे उद्दिष्ट : दिलीपराव देशमुख



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ जून -**
खासगी साखर कारखानदारीत मराठवाडा व विदर्भ विभागात उसाला सर्वाधिक भाव देणाऱ्या मांजरा साखर परिवारातील सदस्य असलेल्या तळेगाव येथील जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रिजच्या मिल रोलरचे पूजन माजी मंत्री, कारखान्याचे संस्थापक दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते बुधवारी करण्यात आले. यावर्षी चालू गळीत हंगामात कारखान्याने ७ लाख ५१ हजार मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्या दृष्टीने कारखाना प्रशासनाने गळीत हंगामाची तयारी सुरू केली असून, दरवर्षीप्रमाणे यावर्षी जागृती शुगर गाळप हंगाम यशस्वीपणे पूर्ण करेल, असा विश्वास संस्थापक दिलीपराव देशमुख यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून विलास साखर कारखान्याचे उपाध्यक्ष वैजनाथ शिंदे, राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील, जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, ट्वेन्टीवन शुगरचे उपाध्यक्ष विजय देशमुख, रेणा साखर कारखान्याचे अध्यक्ष अनंतराव देशमुख, उपाध्यक्ष ॲड. प्रवीण पाटील, मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक काळे, मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष श्याम भोसले, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष ॲड. प्रमोद जाधव, संचालक दिलीप पाटील नागराळकर, पृथ्वीराज शिरसाट, बालाजी बिराजदार, 'जागृती'चे सरव्यवस्थापक गणेश येवले, राजकुमार पाटील, मारुती महाराज साखर कारखान्याचे संचालक गणपत बाजुळगे, इंदिरा सूतगिरणीचे चेअरमन बाळासाहेब कदम, माध्यम समन्वयक हरिराम कुलकर्णी उपस्थित होते.

यावेळी दिलीपराव देशमुख म्हणाले, दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी गाळप हंगाम पूर्व कारखाना यंत्रसामुग्री दुरुस्ती व ऑईलिंगची कामे पूर्ण झाली आहेत. कारखाना कार्यक्षेत्रात उसाची लागवड, तोडणी यासाठी प्रशासन पूर्ण तयारी करत आहे. कारखान्याच्या अध्यक्षा गौरवीताई भोसले-देशमुख यांच्या नेतृत्वात कारखान्याचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे यांच्या सूचनेनुसार यावर्षीचा गाळप हंगाम सर्वांच्या सहकार्याने यशस्वी होईल, अशी माहिती यावेळी देशमुख यांनी दिली. कार्यक्रमास जिल्हा बँकेचे माजी संचालक संभाजीराव सूळ, भगवान पाटील विजयनगरकर, सचिन दाताळ, धनाजी कोटे, मालबा घोणसे, बालाजी कारभारी, बालाजी बोबडे, मांजरा कारखान्याचे संचालक दयानंद बिडवे, रेणा कारखान्याचे संचालक बालाजी हाके, रणजित पाटील यांच्यासह कारखान्याचे विविध खाते प्रमुख, अधिकारी, कर्मचारी, सभासद उपस्थित होते.

# डॉ. उपगुप्त महाथेरोंनी घेतली बिहारच्या राज्यपालांची भेट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ जून -**
बुध्दगया येथील महाविहार बौध्द भिक्खूंच्या ताब्यात देण्यात यावे, यासाठीचा १९४९ चा कायदा मोडीत काढावा, या मागणीसाठी अखिल भारतीय भिक्खू संघाचे कार्याध्यक्ष डॉ. उपगुप्त महाथेरो यांनी बिहारचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांची लेह-लडाख येथे भेट घेतली.



लेह-लडाख येथे जागतिक योगदिनानिमित्त रविवारी (दि.१५) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून बिहारचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. उपगुप्त महाथेरो यांनी राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांना भेटून बुध्दगया येथील महाबोधी विहाराच्या कायद्यातील अट रद्द करावी, सदर विहार बुध्द भिक्खूंच्या ताब्यात देण्यात यावे, अशी मागणी केली. यावेळी भिक्खू संघसेना महाथेरो, चंदीगड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सत्यनामसिंग संधुजी यांच्यासह देशभरातील भिक्खूंची उपस्थिती होती.

## सौ.सीताबाई गिल्डा यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ जून -**
लातूर शहरातील बालाजी मंदीर - सेंट्रल हनुमान परिसरातील रहिवासी तथा ज्येष्ठ नागरीक सौ. सीताबाई जुगलकिशोर गिल्डा यांचे बुधवारी सायंकाळच्या सुमारास वृध्दापकाळाने निधन झाले.

स्व. सौ. सीताबाई गिल्डा यांच्या पार्थिवावर गुरूवारी सकाळी मारवाडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांची अंत्ययात्रा सकाळी दहा वाजता गिल्डा दूध डेअरी, बालाजी मंदीर जवळ, सेंट्रल हनुमान, लातूर येथील निवासस्थानापासून निघाली होती. स्व. सौ. सीताबाई गिल्डा ह्या लातूरचे ख्यातनाम उद्योजक ॲड. संतोष , व दिनेश गिल्डा यांच्या मोठी आई होत्या.

# जन्म-मृत्यू विभागात सावळा गोंधळ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ जून -**
लातूर शहरातील रुग्णालयांमध्ये जन्मलेल्या मुलांच्या जन्म नोंदी देण्याचे अधिकार महापालिकेला आहेत. सध्या शाळा प्रवेशाचे दिवस सुरू असल्याने लवकर जन्म प्रमाणपत्र काढण्यासाठी पालकांची गर्दी सुरू आहे.

परंतु, महापालिकेच्या पोर्टलमध्ये नेहमीच बिघाड होत असल्याने पालकांना आठ-आठ दिवस चकरा मारूनही जन्म प्रमाणपत्र मिळत नाही, अशी वाईट अवस्था महापालिकेच्या जन्म-मृत्यू विभागात झालेली दिसून येत आहे. एकाच खिडकीतून महिला व पुरुष यांची वेगळी रांग केल्याचेही दिसून येत नाही. शहरातील रुग्णालयांमध्ये जम्मलेल्या बालकांच्या नोंदी शासनाकडून महापालिकेला दिल्या आहेत. पालकांनी मुलाचा जन्मदिनांक टाकून तसा अर्ज करावा लागतो. अर्ज दाखल केल्यानंतर आठ-पंधरा दिवस झाले तरी पालकांना जन्म प्रमाणपत्र मिळत नाहीत, शाळा प्रवेशासाठी अत्यंत महत्वाचे असलेले जन्म प्रमाणपत्रच मिळत नसल्याने अनेक पालकांना चांगल्या शाळांच्या प्रवेशापासून मुकावे लागले आहे. जन्म मृत्यू विभागाचा कारभार सुधारण्यासाठी आयुक्तांनी लक्ष देण्याची मागणी पालकांतून होत आहे.

## स्कूल व्हॅनला नूतनीकरणातून शुल्कात सूट देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ जून -**
योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणा वेळी स्कूल व्हॅन, बसला वेग नियंत्रण सुस्थितीत कार्यरत असल्यास वेग नियंत्रक एजन्सींनी अशा वाहनांच्या बाबतीत वाहन प्रणालीत सोळा अंकी यूआयएन अद्ययावत करताना अतिरिक्त शुल्क आकारू नये, अशी मागणी शिवसम्राट विद्यार्थी वाहतूक संघटनेने केली आहे.

ज्या स्कूल बस वाहनामध्ये पूर्वीपासून पाच अंकी सहा, आठ अंकी यूआयएन वेगनियंत्रक बसविण्यात आले आहेत आणि ते सुस्थितीत कार्यरत असतील तर ते यूआयएन वेग नियंत्रक सोळा अंकीमध्ये अद्ययावत करताना लातुरात मनमानी अतिरिक्त शुल्क आकारण्यात येत आहे. शासन परिपत्रक मुंबई परिवहन आयुक्तांच्या अनुषंगाने, असे शुल्क आकारण्यात येऊ नये, असे स्पष्ट निर्देश आहेत. निर्देश असतानाही प्रत्यक्षात अतिरिक्त शुल्क आकारत आहेत, ते आकारू नये, अशी मागणी शिवसम्राट विद्यार्थी वाहतूक संघटनेने प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांकडे केली आहे.

यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हणमंत गोत्राळ, जिल्हाध्यक्ष रामकृष्ण साळुंके, मराठवाडा अध्यक्ष दत्ता होळीकर, कार्याध्यक्ष राम चिलमे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## दुचाकी धडकेत दोघे जण जखमी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ जून -**
शहरातील चिल्ले कॉम्प्लेक्स जवळ भरधाव वेगातील दुचाकीचालकाने समोरून येणाऱ्या फिर्यादीच्या दुचाकीला जोराची धडक दिली.

यात फिर्यादीच्या कमरेला तसेच त्यांच्या पत्नीच्या उजव्या पायाला, डोक्याला, मुलीच्या डाव्या पायाला जोराचा मार लागून दुखापत झाली आहे. याबाबत मोहसीन गणी शेख (रा. तानाजी आनंदनगर, लातूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात या क्रमांकाच्या दुचाकीचालकाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## सीईटी परीक्षेत संत तुकाराम महाविद्यालयाचे यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ जून -**
एमएचटी-सीईटी परीक्षेत येथील संत तुकाराम नॅशनल मॉडेल ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. या परीक्षेसाठी महाविद्यालयातून ५६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी ८ विद्यार्थ्यांनी ९९ पर्सेंटाइल, २२ विद्यार्थ्यांनी ९८, ३१ विद्यार्थ्यांनी ९५, ४२ विद्यार्थ्यांनी ९० पर्सेंटाइल घेतले आहेत. विनायक चंडेगावे याने सर्वाधिक ९९.९९ पर्सेंटाइल मिळवत महाविद्यालयातून पहिला क्रमांक पटकावला आहे.

श्रेयश वट्टे याने ९९.६८ पर्सेंटाइल घेत द्वितीय क्रमांक पटकावला. शंतनू अलामे याने ९९.६० पर्सेंटाइल मिळवत तृतीय क्रमांक पटकावला आहे. याबद्दल शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. पी. आर. देशमुख, सचिव अनिरुद्ध जाधव, सहसचिव गोपाळ शिंदे, ॲड. सुनील सोनवणे, संचालक बी. ए. मैंदर्ग, प्राचार्या वीणा कोपकर, उपप्राचार्य राजेंद्र ढिवरे, पंकज बागडे, बाळासाहेब राठोड, स्मिता साळुंके यांनी कौतुक केले आहे

## शिक्षकांच्या जिल्ह्यांतर्गत बदलीचा एक टप्पा पूर्ण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ जून -**
सध्या सुरू असलेल्या शिक्षकांच्या जिल्ह्यांतर्गत बदलीबाबत लागणाऱ्या वेळेसंबंधी बरीच साशंकता निर्माण केली जात आहे. परंतु, शासन निर्णयानुसार संपूर्ण बदली प्रक्रिया ही ४२ टप्प्यांतून पार पडत असते. आतापर्यंत ४२ पैकी १८ टप्पे पार पडले असून, १९व्या टप्प्यावर बदली प्रक्रिया आहे.

हे राहिलेले १९ टप्पे पार पडल्याशिवाय, जिल्ह्यांतर्गत शिक्षकांच्या बदल्या होऊ शकणार नाहीत. असे संबंधीत विभागाकडून सांगण्यात आले.

## सत्संग प्रतिष्ठानतर्फे मोफत पंढरीची वारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ जून -**
आषाढी एकादशीदिवशी विठ्ठलाचे दर्शन घेता यावे, यासाठी येथील सत्संग प्रतिष्ठानच्यावतीने ३१ एस.टी. बसेसमधून मोफत वारी घडविण्यात येणार आहे.

मागील २५ वर्षांपासून वारकऱ्यांसाठी मोफत वारीचा उपक्रम राबविण्यात येत आहे. पंढरपूरला निघणारी ही एस.टी. बस वारी ५ जुलै रोजी सकाळी १० वाजता लातूर शहरातील रेणापूर नाक्यावरील बसस्थानकातून निघणार आहे. यासाठी वारकऱ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

वारकऱ्यांनी लातूर अर्बन बँकेच्या जिल्ह्यातील सर्व शाखा, अष्टविनायक मंदिर, लातूर, दत्ता लोखंडे, सुरेश मालू, अशोक गोविंदपूरकर, भंडारी किराणा, ओमप्रकाश मुंदडा, बालाजी बारबोले, रमन पारीख व नाना लोखंडे यांच्याकडे नाव नोंदणी करावी, असे आवाहन अध्यक्ष गोविंद पारीख, चंदू लड्डा यांच्यासह आयोजकांनी केले आहे.

# मांजरा नदी पात्रात उडी मारून तरुणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ जून -**
दुचाकी आणि मोबाइल पुलावर सोडून एका तरुणाने रत्नागिरी - नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील भातखेडा येथील मांजरा नदीवर असलेल्या नव्या पुलावरून नदीपात्रात उडी मारून आत्महत्या केल्याची घटना बुधवारी (दि.१८) दुपारी घडली. घटनेची लातूर ग्रामीण पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

बुधवारी दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास एका तरुणाने आपल्या ताब्यातील दुचाकी रत्नागिरी - नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील भातखेडा येथील मांजरा नदीवरील नव्या पुलावर सोडली, स्वतःजवळील मोबाइल दुचाकीवर ठेवला आणि त्याने नदीपात्रात पुलाच्या पूर्व बाजूला उडी मारून आत्महत्या केली. हा प्रकार लक्षात येताच लातूर ग्रामीण पोलिसांनी मांजरा नदीवरील भातखेडा पुलाकडे धाव घेतली. सुरुवातीस या आत्महत्या करणाऱ्या तरुणाची ओळख पटत नव्हती. मात्र, दुचाकी क्रमांक आणि तिथे असलेला मोबाइल यावरून हा तरुण कपिल रेड्डी (रा. हत्तीबेट, ता. देवणी) हा असल्याचे निदर्शनास आले. घटनेनंतर पोलिसांनी प्रेत नदी पात्रातून बाहेर काढले. या तरुणाने नेमकी कोणत्या कारणावरून आत्महत्या केली, हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पोलीस याचा तपास करीत आहेत.

### गळफास लावून विद्यार्थ्याची आत्महत्या

**लातूर :** बी. फार्मसीच्या शेवटच्या वर्षात शिक्षण घेत असलेल्या एका २३ वर्षीय विद्यार्थ्याने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी दुपारी सुमारास घडली. याप्रकरणी रात्री उशिरा एमआयडीसी पोलिसांत आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

अभिजित पांडुरंग निटुरे (वय २३, रा. सोनवती, ता. लातूर, हा.मु. गिरवलकर मंगल कार्यालयाच्या मागे, शंभुलिंग शाळेच्या जवळ, गवते वाडा, लातूर) असे गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. मयत अभिजित हा बी. फार्मसीच्या शेवटच्या वर्षात शिकत होता. लातूर येथे तो भाड्याच्या खोलीत राहत होता. मंगळवारी दुपारी त्याने खोलीत येऊन छताला दोरी बांधून गळफास घेतला. पोलिसांनी पंचनामा करून सदर मृतदेह शासकीय रुग्णालयात रात्री दहा वाजेच्या सुमारास दाखल केला. या प्रकरणी आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. सदर तरुणाने प्रेम प्रकरणातून आत्महत्या केली असावी, असा अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.

# पावसाची दडी ;आकाशात फक्त ढगांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ जून -**
जळकोट तालुक्यासह लातूरजिल्ह्यात सर्वत्र गेल्या दहा दिवसांपासून पावसाने गुंगारा दिला असून शेतक-यांचे डोळे आता आभाळाकडे लागले आहेत. तालुक्यात ६० ते ७० टक्के पेरण्यात पूर्ण झाल्या असून आकाशात फक्त ढगांचीच गर्दी दिसून येत आहे.



जळकोट तालुक्यातील शेतक-यांनी जमिनीमध्ये ओलावा चांगला असल्यामुळे, पेरणी उरकून घेतली. काही शेतक-यांनी सोयाबीनची पेरणी केली तर काही शेतक-यांनी कापसाची लागवड केली. ज्या शेतक-यांनी लवकर पेरणी केली अशा शेतक-यांच्या कोवळ्या पिकांची उगवणही झालेली आहे . मात्र जळकोट तालुक्यामध्ये दहा दिवसापासून पावसाने उघडीत दिलेली आहे. यामुळे शेतक-यांची चिंता वाढली असून शेतक-यांचे डोळे आता आभाळाकडे लागलेले आहेत. जळकोट तालुक्यात मे महिन्यात तब्बल पंधरा दिवस पाऊस पडला . जिकडे तिकडे पाणीच पाणी झाले. नद्या नाले भरून वाहिले , विहिरीही पूर्ण क्षमतेने भरल्या, यामुळे जमिनीत ओलावाही भरपूर प्रमाणात झाला . यानंतर दि ८ जून रोजी मृग नक्षत्राचे आगमन झाले. मृग नक्षत्राचे आगमन होण्यापूर्वीच जळकोट तालुक्यात पाऊस झाला होता यामुळे पेरणी योग्य परिस्थिती निर्माण झाली होती यामुळे शेतक-यांनी सुरुवातीला कापसाची लागवड केली त्यानंतर मोठ्या प्रमाणात सोयाबीन तसेच मूग व उडीद यासोबतच तुर या पिकाचीही पेरणी केली .

जवळपास तालुक्यामध्ये ६० ते ७० टक्के पेरणी पूर्ण झाली आहे. जळकोट तालुका हा डोंगरी तालुका म्हणून ओळखला जातो या तालुक्यांमध्ये हलक्या जमिनी अधिक आहेत त्यामुळे निदान आठ दिवसानी एकदा तरी पाऊस पडणे अपेक्षित असते परंतु आता पावसाने उघडीप देऊन दहा ते बारा दिवसांचा कालावधी होत आहे . यामुळे ज्या शेतक-यांनी उशिरा पेरणी केलेली आहे अशा बियाणांची उगवण होणार की नाही तसेच उगवण झालेल्या पिकांची वाढ व्यवस्थित होणार का नाही . याची काळजी शेतक-यांना लागली आहे. पावसाने सुरुवात चांगली केली होती त्यामुळे यावर्षी चांगले उत्पादन होईल, अशी अपेक्षा शेतक-यांना होती परंतु आता पावसाने खंड दिला असल्यामुळे , शेतक-यांची चिंता वाढलेली आहे. ज्या शेतक-यांकडे पाणी उपलब्ध आहे अशी शेतकरी तुषार सिंचनाचा वापर करीत पाणी देत आहेत् परंतु ज्या शेतक-याकडे पाण्याची सोय नाही त्यांना मात्र आभाळाकडे बघण्याशिवाय दुसरा पर्याय उरला नाही.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## सीआयआय पाईप्स आणि ट्यूब्स कॉन्क्लेव्ह २०२५

छत्रपती संभाजीनगर - मुंबईत सीआयआय वायर केबल पाईप्स आणि ट्यूब्स समिट आणि एक्स्पो २०२५ सुरू; २००+ बी२बी मीटिंग्ज भविष्यासाठी बिझनेस लीड्स तयार करण्यास मदत करतात.भारतीय उद्योग महासंघाने ( सीआयआय आज मुंबईतील बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे पाईप्स अँड ट्यूब्स कॉन्क्लेव्ह २०२५ चे आयोजन केले होते. या कॉन्क्लेव्हमध्ये उत्पादन, धातुशास्त्र, पायाभूत सुविधा आणि धोरणनिर्मिती क्षेत्रातील आघाडीच्या व्यक्तींनी भारताच्या पाईप्स आणि ट्यूब उद्योगाचे भविष्य निश्चित करण्यासाठी एकत्र आले - औद्योगिक विकासाचा एक महत्त्वाचा परंतु अनेकदा कमी लेखलेला आधारस्तंभ. आपल्या स्वागतपर भाषणात, सीआयआय पश्चिम क्षेत्र २०२५-२६ चे अध्यक्ष आणि बीजी इलेक्ट्रिकल्स अँड इलेक्ट्रॉनिक्स इंडिया लिमिटेडचे सीएमडी श्री. ऋषी कुमार बागला यांनी उद्योगाच्या मजबूत वाटचालीची माहिती दिली:भारताचा पाईप्स आणि ट्यूब उद्योग १४ अब्ज डॉलर्सच्या बाजारपेठेत वाढला आहे, ज्यामध्ये २०३० पर्यंत १८-१९ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची क्षमता आहे. ही वाढ तेल आणि वायू, पाणी, पायाभूत सुविधा आणि रसायनांमध्ये जटिल प्रणाली डिझाइन, उत्पादन आणि वितरित करण्याची आमची क्षमता दर्शवते. गुणवत्ता, प्रमाण आणि निर्यातीवर लक्ष केंद्रित करून, भारत या विभागासाठी जागतिक उत्पादन केंद्र म्हणून उदयास येऊ शकतो.या परिषदेत संशोधन आणि विकास आणि धातुशास्त्रातील कमी गुंतवणूक यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रकाश टाकण्यात आला.एमएसएमईवरील सीआयआय डब्ल्यूआर उपसमितीचे अध्यक्ष आणि केमट्रोल्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेडचे सीएमडी डॉ. के. नंदकुमार यांनी यावर भर दिला:

## अल्ट्रा झकास ओटीटी वर घरबसल्या पहा मराठीत भन्नाट साऊथ थ्रिलर्स चित्रपट

मुंबई : 'जून' महिन्याच्या सुरुवातीला जशी पावसाच्या गार वाऱ्याची चाहूल लागते, तसेच अल्ट्रा झकास मराठी ओटीटीवर दर शुक्रवारी मराठी सुपरहिट कंटेंटचा वर्षाव सुरू होतो. दर महिन्यांप्रमाणे या महिन्यातही घरबसल्या एन्जॉय करा नवीन मराठी सिनेमे, धमाल वेब सिरीज आणि साऊथच्या डब्ड ब्लॉकबस्टर फिल्म्स तेही मराठीत. चला तर मग, जून महिन्यातल्या प्रत्येक शुक्रवारचा थरारक आणि भावनिक मनोरंजनाने अनुभव घेऊया अदृश्यम: एका बेपत्ता मुलीच्या मागे दडलेली गुंतागुंतीची रहस्यकथा 'अदृश्यम' हा मल्याळम भाषेतला एक उत्कंठावर्धक मिस्ट्री थ्रिलर चित्रपट आहे, ज्याचे दिग्दर्शन झॅक हॅरिस यांनी केले आहे. या कथेत 'कार्थिका' नावाची तरुणी अचानक गायब होते. नंतर तिचा तपास घेण्यासाठी वरिष्ठ अधिकारी पुरुषोत्तम यांच्या आदेशावरून डिटेक्टिव्ह नंदकुमार या प्रकरणात येतो. या शोधात त्याला राजकुमार या निलंबित पोलिस अधिकाऱ्याकडून महत्त्वाची माहिती मिळते, ज्यामुळे केसला नवे वळण येते. आणि हे दोन्ही तपास एकमेकांत गुंततात. या चित्रपटाचा मराठी वर्ल्ड डिजिटल प्रीमियर २० जून २०२५ रोजी अल्ट्रा झकास मराठी ओटीटीवर होणार आहे.

## ९ पॉइंट कॅपिटलने डिजिटल मालमत्ता गुंतवणूक आणली

नाशिक : ९ पॉइंट कॅपिटलने १३ जून २०२५ रोजी नाशिकमध्ये एक विशेष गुंतवणूकदार कार्यक्रम आयोजित केला होता, ज्यामध्ये भारतातील वाढत्या आर्थिक समुदायाला सहभागी करून घेण्यासाठी त्यांचा धोरणात्मक विस्तार सुरू होता. या कार्यक्रमात ६०+ व्यक्तींचा मेळावा होता: अति-उच्च-निव्वळ-वर्थ व्यक्ती (णक्छखी), उच्च-निव्वळ-वर्थ व्यक्ती (क्छखी), वितरक आणि कुटुंब कार्यालये. नाशिकच्या आर्थिक व्यावसायिकांना आणि गुंतवणूकदारांना कायदेशीररित्या अनुपालन करणाऱ्या आणि कर-कार्यक्षम डिजिटल मालमत्ता गुंतवणूक संधी आणणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.उपस्थितांना जागतिक डिजिटल मालमत्ता परिसंस्थेचा सखोल अभ्यास मिळाला आणि ९ पॉइंट कॅपिटलच्या तत्वज्ञानाची, उत्पादनांची आणि त्यांच्या डिजिटल मालमत्ता उपायांना चालना देणाऱ्या तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यात आली. कंपनीने विशेषतः अत्याधुनिक भारतीय गुंतवणूकदारांसाठी डिझाइन केलेल्या नियामक स्पष्टता, मजबूत अनुपालन आणि पारदर्शक गुंतवणूक संरचनांबद्दलची आपली वचनबद्धता अधोरेखित केली.

## पुण्यातील सॉफ्टवेअर इंजिनिअरवर दुर्मिळ ब्रेन बायपास शस्त्रक्रिया यशस्वी

अहमदनगर : बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटलमधील न्यूरोसर्जन्सनी दुर्मिळ आजार असलेल्या पुण्यातील ३२ वर्षीय सॉफ्टवेअर इंजिनिअरवर मेंदूमधील वरील आर्टरीपासून मधल्या भागात असलेल्या आर्टरीपर्यंत बायपास (सामान्यतः ब्रेन बायपास सर्जरी म्हणून ओळखले जाते) यशस्वीरित्या पार पाडली. या स्थितीमध्ये रूग्णाच्या मेंदूला रक्तपुरवठा कमी होत होता, ज्यामुळे त्याला वारंवार स्ट्रोक येत होते आणि स्ट्रोकनंतर एका डोळ्याची दृष्टी गेली होती. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती सुधारली असून, त्याच्या डोळ्याची दृष्टी पुन्हा काही प्रमाणात परतली आहे - ही अपेक्षित नसलेली पण सकारात्मक बाब आहे. रुग्णाला होणारे वारंवार झटकेही थांबले आहेत. सहा महिन्यांपर्यंत रुग्णाला कमी रक्तदाब किंवा डिहायड्रेशन यासह डाव्या बाजूला अशक्तपणा जाणवत होता. त्याला हा त्रास काही मिनिटे जाणवायचा. उजव्या बाजूच्या मधल्या भागामधील सेरेब्रल आर्टरी (एमसीए) पूर्णपणे ब्लॉक झाल्याचे दिसून आले, ज्यामुळे डॉक्टरांना त्याला मोया मोया आजार असल्याचा संशय आला, हा मेंदूमधील आर्टरींवर परिणाम करणारा आजार आहे, जो आशियाई व्यक्तींमध्ये अधिक आढळून येतो आणि तरुण व किशोरवयीन मुलांमध्ये अधिक आढळून येतो. मेंदूला रक्तपुरवठा कमी होण्यासह ब्लॉक झालेली आर्टरी स्थिर नसल्यामुळे प्रचलित उपचाराऐवजी शस्त्रक्रिया करण्याचा विचार करण्यात आला.

## ग्राहकांना 'प्राइम लाइट' फायदे देण्यासाठी एसीटी फायबरनेटची अमेज़न प्राइम सोबत भागीदारी

पुणे : उत्तम मनोरंजन, शिपिंग आणि खरेदीचे फायदे जलद इंटरनेटसह एकत्रित करून, भारतातील आघाडीची वायर्ड इंटरनेट सेवा प्रदाता असलेल्या एसीटी फायबरनेटने अमेज़न प्राइम सोबत भागीदारी केली आहे. या सहकार्याअंतर्गत, नवीन 'प्राइम लाइट' योजना लाँच करण्यात आल्या आहेत, जे ग्राहकांना सर्वोत्तम मूल्य आणि अनुभव प्रदान करतील. या नवीन योजनेद्वारे, ग्राहकांना प्राइम व्हिडिओवर उपलब्ध असलेल्या प्रीमियम कंटेंटचा अमर्यादित प्रवेश आणि हाय-स्पीड इंटरनेटचा आनंद घेता येईल. 'प्राइम लाइट' सबस्क्रिप्शन अंतर्गत, वापरकर्ते त्यांच्या पसंतीच्या एकाच डिव्हाइसवर एचडी गुणवत्तेत भारतीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार विजेत्या वेब सिरीज, टीव्ही शो आणि चित्रपटांच्या विस्तृत लायब्ररीचा आनंद घेऊ शकतात. प्राइम सदस्यांना इतरही अनेक उत्तम फायदे मिळतात - जसे की लाखो उत्पादनांवर त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी मोफत डिलिव्हरी, दररोज विशेष डीलची विशेष सुविधा, प्राइम डे सारख्या शॉपिंग इव्हेंटमध्ये विशेष सहभाग आणि अमेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिव्हलमध्ये लवकर प्रवेश. याशिवाय, अमेज़न पे आईसीआईसीआईख बँक क्रेडिट कार्डने खरेदी केल्यास ५% कॅशबॅक देखील उपलब्ध आहे.

## २४०० हून अधिक विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना इंटरॲक्टिव शिक्षणातून दिला रस्ते सुरक्षा संदेश

संगमनेर - रस्ते सुरक्षा आणि जागरूकता वाढवण्यासाठी आपल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा भाग म्हणून, होंडा मोटरसायकल ॲण्ड स्कूटर इंडिया ने महाराष्ट्रातील संगमनेर येथे एक विशेष रस्ते सुरक्षा जागरूकता कार्यक्रम आयोजित केला. या उपक्रमाचा उद्देश लहान वयापासूनच सुरक्षित रस्ते वर्तनाची सवय लावणे हा आहे. अमृतवाहिनी इंटरनॅशनल स्कूल, श्री श्री रविशंकर विद्यामंदिर, पोदार इंटरनॅशनल स्कूल, आणि ज्ञानदीप विद्यालय येथील २४०० हून अधिक विद्यार्थी आणि शिक्षकांनी यात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना मनोरंजक आणि ज्ञानवर्धक सत्रांद्वारे रस्ते सुरक्षिततेचं महत्त्व सांगितलं गेलं. विशेष डिझाईन केलेल्या इंटरॲक्टिव सत्रांमध्ये हेल्मेट घालण्याची गरज, वाहतूक नियमांचे पालन आणि शिस्तबद्ध रस्ते वर्तन या सुरक्षित सवारीच्या मूलभूत गोष्टी शिकवण्यात आल्या.

# जिप बांधकाम विभागाचा अजब कारभार!

# हालचाल रजिस्टर ठेवले डांबून,एक दिवस अगोदरच दौऱ्यांची नोंद

तभा वृत्तसेवा

कन्नड: दि.१९ जून - शहरात असलेले जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यालय असून या कार्यालयात दि.१९जुन रोजी दुपारी १ वा.भेट दिली असता या कार्यालयाचा अजब कारभार उघडकीस आला.





कार्यालयात कोणीही हजर दिसले नाही कार्यालयातील कर्मचारी पवार यांना विचारपूस केले असता सर्व अधिकारी कर्मचारी जेवण करण्यात गेले आहे,काही वेळेनंतर काही कर्मचारी आले तर उपअभियंता यांच्या दालनाला कुलूप दिसल्याने त्यांच्याविषयी विचारपूस केली असता कर्मचाऱ्यांनी माहिती देण्यास नकार दिला त्यानंतर अधिकारी कर्मचारी यांचे हालचाल रजिस्टर पाहण्यासाठी मागितले असता ते देण्यास अर्धा तास टाळाटाळ करण्यात आली सदर हालचाल नोंदवही वरीष्ठ सहाय्यकाच्या कपाटात डांबून ठेवले होते त्यासाठी जिल्हा परिषदचे मुख्याधिकारी अंकित पन्नू व गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे यांना फोनवरून संपर्क केल्यानंतर हालचाल नोंदवही बाहेर निघाली,त्यात अधिकारी,कर्मचाऱ्यांच्या नोंदी आढळून आल्या पण त्यावर ना जाण्याची वेळ ना येण्याची वेळ तर कार्यालयीन प्रमुखांनी पडताळणी करून स्वाक्षरी केलेली नव्हती त्यामुळे अनेक शंका ना वाव मिळाली

त्यात एक अशी नोंद मिळावी त्यात एक दिवस अगोदरच दौरा दाखवण्यात आलेला आहे यावरून हे चित्र स्पष्ट झाले की या कार्यालयात अनागोंदी कारभार सुरू आहे,

या कार्यालयात चाललेल्या अनागोंदी कारभार बाबत प्रशासन गांभीर्याने घेईल का असा प्रश्न उपस्थित झाला आहे,शहरातील अनेक कार्यालयात असाच अनागोंदी कारभार तर सुरू नाही ना अशी शंका उपस्थित झाली आहे.

**याविषयी गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे यांना विचारले असता त्यांनी सांगितले की संबंधित कार्यालयातीलअधिकारी कर्मचाऱ्यांना उद्याच पत्र काढून याविषयी खुलासा विचारतो.**

**कायदा काय सांगतो**

**हालचाल नोंदवही (Movement Register) म्हणजे शासकीय कार्यालयात अधिकारी आणि कर्मचारी यांच्या कामाच्या वेळेतील हालचालींची नोंद ठेवण्यासाठी वापरण्यात येणारे रजिस्टर. याचा मुख्य उद्देश म्हणजे, कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी कार्यालयात उपस्थित आहेत की नाही, किंवा ते कोठे गेले आहेत याची माहिती देणे.**

### शासन निर्णय

**शासकीय कर्मचाऱ्यांसाठी हालचाल नोंदवही ठेवणे बंधनकारक आहे. याबाबत शासनाचे विविध निर्णय आणि परिपत्रके वेळोवेळी जारी केली जातात. या निर्णयांमध्ये नोंदवही ठेवण्यासंबंधीचे नियम, तसेच कर्मचाऱ्यांच्या कार्यालयातील उपस्थिती आणि हालचालींवर लक्ष ठेवण्यासंबंधीच्या सूचना दिलेल्या असतात**

# छत्रपती संभाजीनगर जिल्हा 'ड्रग फ्री' करण्याचा संकल्प

### नशाबंदी मंडळाच्यावार्षिक बैठकीत संकल्प

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य ही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्या अंतर्गत व्यसनमुक्तीवर कार्य करणारी संस्था आहे. या संस्थेने ६७ वर्षे पूर्ण करून महाराष्ट्रातील ३६ जिल्हा संघटकांचे संवाद, समन्वय आणि वार्षिक नियोजन बैठकीचे आयोजन शुक्रवार, १३ जून ते १५ जूनपर्यंत प्रयास, सेवाकुंर भवन दस्तूरनगर रोड, विमलनगर, फरशी फाटा, तालुका जिल्हा अमरावती येथे करण्यात आले होते. यावेळी छत्रपती संभाजीनगर जिल्हाही ड्रग फ्री करण्याचा निर्णय घेण्यात आला. याप्रसंगी संघटकांना २०२५-२६ ची मान्यता तसेच वर्षभरात संघटकांच्या कार्याचे नियोजन करण्यात आले.

संघटकांना साहित्यात पोस्टर, पत्रक, महामानवांच्या विचारांचे पुस्तक, व्यसनमुक्तीवरील सापशिडी देण्यात आली. यावेळी संघटक बैठकीचे उद्घाटन प्रयास संस्थेचे अध्यक्ष डॉ. अविनाश सावजी, नशाबंदी मंडळाचे सरचिटणीस वर्षा विद्या विलास, मुख्य संघटक चिटणीस अमोल मडामे, चिटणीस चंद्रकांत चौधरी, सदस्य बॉस्को डिसुझा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ३६ जिल्ह्यांतील संघटक, ७ विभाग प्रमुख, नशाबंदी मंडळाचे कार्यालय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रत्येक जिल्ह्यात किमान १० शाळा तंबाखुमुक्त करण्याचा व प्रत्येक जिल्ह्यात ड्रग्स फ्री जिल्हा अभियान राबविण्याचा संकल्प करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर शहर आणि जिल्हाही ड्रग फ्री करण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेण्यात आल्याची माहिती नशाबंदी मंडळाचे छत्रपती संभाजीनगर जिल्हा संघटक भाऊ पठाडे यांनी माध्यम प्रतिनिधींना दिली.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.१९, :- सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये इयत्ता १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमामध्ये सरासरी ६०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या मातंग समाजातील गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थीनींना निधीच्या उपलब्धतेनुसार प्रोत्साहनपर शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात येणार आहे. इच्छुक मातंग, मांग समाज व तत्सम १२ पोट जातीतील विद्यार्थी व विद्यार्थीनींनी १५ जुलै २०२५ पर्यंत जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, मार्क मेमो, पुढील वर्षात प्रवेश घेतल्याबाबतची रजिस्टेशन पावती किंवा बोनाफाईड, मतदान कार्ड, आधार कार्ड, रेशन कार्ड, एक पासपोर्ट साईज फोटो इत्यादी कागदपत्रांसह अर्ज साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तळ मजला शिवाजी हायस्कुलच्या बाजुला, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे सादर करावे. अर्ज नमुना कार्यालयात विनामुल्य उपलब्ध आहे, असे जिल्हा व्यवस्थापक किसन पवार यांनी कळविले आहे.

# 'श्री शिवाय नमस्तुभ्यं ग्रुप'तर्फे गोदावरी नदीपात्रात स्वच्छता

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : 'श्री शिवाय नमस्तुभ्यं ग्रुप' च्या वतीने गुरुवारी, १९ रोजी पैठण येथील गोदावरी नदीपात्राची स्वच्छता करण्यात आली. नदीत टाकलेले निर्माल्य, खंडीत मूर्ती, फोटो, पाण्यासोबत वाहून आलेल्या जुन्या निकामी वस्तू, कपडे, झाडपाला असा कचरा नदीपात्रातून काढण्यात आला.



नदीपात्रात मयत व्यक्तीचे कपडे आणि वस्तू टाकू नये. जुन्या वस्तू नदीपात्रात विसर्जित न करता गरजू व्यक्तीला द्याव्यात आणि नदी स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन ग्रुपचे अध्यक्ष अक्षय ठुबे यांनी केले.

दोन वर्षांनी गोदावरी नदीवर नाशिक येथे कुंभमेळा होणार असून, गोदावरी स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमात सतीश आहेरकर, संजय राजगुरू, दीपक शिंदे, ऋषिकेश भंडारी, कुणाल कुंटे, जयश्री शिंदे, ज्योती राजगुरू, सिद्धार्थ लोळेवर, सोनाली दहीहंडे, सोमनाथ पवार, कडूबाई दहीहंडे, बाबासाहेब वाहूरवाघ, राजश्री कुंटे, शीतल जाधव आदी सहभागी झाले होते.

# जिल्ह्यातील अपघात प्रवण स्थळे शोधून कायमस्वरुपी उपाययोजना करा : जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया

अहिल्यानगर दि.१९- जिल्ह्यात रस्ते अपघातामध्ये अनेक व्यक्ती मृत्युमुखी पडतात. या अपघातांचे प्रमाण कमी होण्यासाठी जिल्ह्यातील अपघात प्रवण क्षेत्र शोधून तज्ज्ञांच्या साहाय्याने त्याचे सुरक्षा परिक्षण करत त्याठिकाणी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा रस्ते सुरक्षा समितीच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ.आशिया बोलत होते.

बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर, कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत जाधव, एस.आर. वर्पे, विजय कोटेचा, सहायक अधीक्षक अभियंता एस.डी. शेळके, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनंता जोशी, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी पवन टेंभुर्णे, उपशिक्षणाधिकारी मीना शिवगुंडे, पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे, वसंत पंदरकर, राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप, अभिजीत पोटे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, जिल्ह्यातील रस्ते अपघाताचे प्रमाण कमी होऊन सुरक्षित प्रवासाच्यादृष्टीने अपघातप्रवण स्थळी संबंधित विभागांनी समन्वय साधत तात्पुरत्या व कायमस्वरुपी उपाययोजना कराव्यात. जिल्ह्यातून पंढरपूरकडे अनेक दिंड्यातून वारकरी पायी चालत जातात. या सर्व रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी. ज्या ठिकाणी खड्डे पडले असतील ते बुजवण्यात यावेत. अहिल्यानगर शहरासह इतर ठिकाणच्या उड्डाणपूल अथवा अपघातप्रवण स्थळांची पोलीस, सार्वजनिक बांधकाम विभाग व परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी करण्यात यावी. उपलब्ध आकडेवारीनुसार ज्या ठिकाणी अधिक अपघात होतात त्याठिकाणी अधिक प्रमाणात लक्ष देत ड्रंक अँड ड्राईव्ह, रिफ्लेक्टर, हेल्मेट आदींची तपासणी करण्यात यावी. अपघातस्थळी पोलीस, सार्वजनिक बांधकाम विभाग व परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन झालेल्या अपघाताचे विश्लेषण करत त्याची तंतोतंत माहिती आरडीएवर भरण्याच्या च्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

जिल्ह्यात अनेक ठिकाणी विनापरवानगी गतीरोधक उभारण्यात आले आहेत. या गतीरोधकांमुळेही अनेकवेळा अपघात घडतात. त्यामुळे विनापरवानगी उभारण्यात आलेले गतीरोधक काढण्यात यावेत. ज्या ठिकाणी आवश्यकता असेल त्याच ठिकाणचे गतीरोधक ठेवण्यात यावेत. गतीरोधकाच्या ठिकाणी रिफलेक्टर, बोर्ड आदी बसविण्यात यावेत. रस्त्यावरील दिशादर्शक फलकावर कुठल्याही प्रकारच्या राजकीय जाहिराती, शुभेच्छा संदेश दिसणार नाहीत याची दक्षता घेण्याच्या सुचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिल्या.

अनेकवेळा बसस्थानकामध्ये खासगी वाहने उभे केल्या बस वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. अशा खासगी वाहनांवर कारवाई करण्यात यावी. रस्त्यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात यावी. जिल्ह्यातील बंद टोलनाके काढून टाकण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

## भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची ऑनलाईन त्रूटी पुर्तता दिनांक मुदत वाढ करण्यासाठी निवेदन



छत्रपती संभाजीनगर : २०२४/२५ या शैक्षणिक वर्षातील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची ऑनलाईन त्रूटी पुर्तता दिनांक मुदत वाढ करण्यासाठी आज दिनांक १९/०६/२०२५ रोजी निर्दशनास आणुन दिले की, साडेतीन हजार विद्यार्थ्यांचे ऑनलाईन त्रूटी पुर्तता करणे २०२४/२५ या शैक्षणिक वर्षातील खुप विद्यार्थी ऑनलाईन त्रुटी भरावयाचे बाकी आहेत . याची दखल समाज कल्याण विभाग छत्रपती संभाजी नगर यांनी घ्यावी यावेळी समाज कल्याण सहाय्यक आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांना अशा प्रकारचे निवेदन देण्यात आले. त्याचप्रमाणे समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त डॉ. दिपक खरात छत्रपती संभाजीनगर यांना सुद्धा निवेदन देण्यात आले व २०२३ च्या राहिलेल्या पात्र विद्यार्थ्यांची अजून हि स्वाधार वितरित केली नाही आणि स्वाधार कर्मचाऱ्याकडून ऑफलाईन अर्ज सादर केल्याल्या विद्यार्थ्यांचे अकाउंट नंबर चुकलेले त्यांना हि अजून ऊऊ उपलब्ध करून दिला नाही आमरण उपोषण सोडल्या नंतर योगेश आचलखांब यांनी प्रादेशिक उपयुक्त दिपक खरात साहेब यांच्याशी चर्चा केली.यावेळी प्रामुख्याने योगेश आचलखांब, विजय भिसे, आनंद अंभोरे, बाबासाहेब पटेकर, मनोहर इंगळे, आदित्य मोरे , चेतन आढे. इत्यादीची उपस्थिती होती.

## जिल्हा परिषद प्रशाला शाळा सोयगाव येथे विद्यार्थ्यांना सोयगाव आगार तर्फे अहिल्याबाई होळकर मोफत पासचे वितरण



सोयगाव,दि.१९ जून : येथील जिल्हा परिषद प्रशाला शाळा सोयगाव येथे सोयगाव आगारा तर्फे बाहेरगावाहून शिक्षणासाठी शहरात येणाऱ्या विद्यार्थ्यांना अहिल्याबाई होळकर मोफत पासेसचे शाळेत जाऊन वितरण आगार प्रमुख मनीष जवळीकर यांचे हस्ते वही,आणि पेन भेट देऊन करण्यात आले.यावेळी आगार प्रमुख मनीष जवळीकर यांनी सदर मोफत शैक्षणिक पासेसचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घ्यावा आणि कोणत्याही गरजू विध्यार्थिनीने योजनेपासुन वंचित राहू नये. या मोफत पासचा लाभ घेऊन आपले शिक्षण पूर्ण करण्याचे आवाहन केले.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक दादाराव राठोड,शिक्षक अनिल ठाकूर,दौलतसिंग परदेशी, विद्याधर बागुल यांचेसह लिपिक सतिश पाटील,वाहतूक नियंत्रक ज्ञानेश्वर वाडेकर, र.दि.चौधरी,संतोष पाखरे आदी कर्मचारी उपस्थित होते.

## एमजीएममध्ये संगीत दिनानिमित्त नाट्यगीतांचा कार्यक्रम

छत्रपती संभाजीनगर, दि.१९ : जागतिक संगीत दिनानिमित्त शनिवार, दिनांक २१ जून २०२५ रोजी एमजीएम विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने 'मर्मबंधातली ठेव' हा नाट्यगीतांचा कार्यक्रम नाट्यशास्त्र विभागाचा हॉल, रुक्मिणी सभागृह परिसर येथे दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात आला आहे. आजच्या पिढीला जुन्या संगीत नाटकातील नाट्यपदांचं, नाट्यगीतांचं आकलन व्हावं, त्यांना रुची निर्माण व्हावी, अभ्यास व्हावा या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याचे विभागप्रमुख प्रा.डॉ.राजू सोनवणे यांनी सांगितले. कार्यक्रमात गाजलेल्या संगीत नाटकातील निवडक नाट्यगीतांचे सादरीकरण अपूर्वा जाधव, तुषार अंभोरे, ज्ञानेश्वरी इधाटे, निकिता पवार, सोनाली हावळे पाटील आणि राहुल खरे इत्यादी विद्यार्थी- विद्यार्थिनी करणार आहेत. तसेच साथसंगत प्रा. राहुल खरे, सतीश जोगदंड, सचिन शिंदे, ओम केकान आणि गौरव ढोले हे करणार आहेत. या कार्यक्रमास सर्वांना खुला प्रवेश असून रसिकांनी मोठ्या संख्येने यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई यांनी केले आहे.

## रामप्रसाद भरत सोनपीर यांना पीएच. डी. प्रदान

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने रामप्रसाद भरत सोनपीर यांना भौतिकशास्त्र विषयात पीएच. डी. प्रदान करण्यात आली आहे. 'स्टडीज ऑन ग्राफीन ऑक्साईड बेस्ड टीटॅनियम डोपड कोबाल्ट ऑक्साईड नॅनो मटेरियल फॉर फोटो कॅटलेटिक प्लिकेशन्स' या विषयावर त्यानी संशोधन केले. त्यांना डॉ. इ. ठ. डोळे यांचे मार्गदर्शन लाभले.

# डॉ.श्रध्दाज स्वीट पील्स होमियोपॅथीक क्लिनिकचे उद्घाटन उत्साहात संपन्न

छत्रपती संभाजीनगर - छत्रपती संभाजी नगर येथील बीड बायपास रोडवरील ✻डॉ.श्रध्दाज स्वीट पील्स होमियोपॅथीक क्लिनिकचे उद्घाटन सोहळा✻ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. डॉ. श्रध्दा निखील दशरथ यांच्या दवाखान्याच्या दुसऱ्या शाखेचा हा उद्घाटन समारंभ झालेला आहे. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूरातील सुप्रसिध्द ज्योतिषाचार्य श्री.प्रसाद पंतोजी यांनी फीत कापून उद्घाटन केले. उद्घाटनां नंतर ज्योतिषाचार्य प्रसाद पंतोजी यांना शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ.श्रध्दाज स्वीट पील्स होमियोपॅथीक क्लिनिकच्या उद्घाटनप्रसंगी छत्रपती संभाजीनगर मधील अनेक मान्यवरांची त्याचं बरोबर वैद्यकीय क्षेत्रातील अनेकांची लक्षणीय उपस्थिती होती.डॉ. श्रध्दा निखिल दशरथ यांना त्यांच्या मैत्रिणींनी धन्वंतरीची मूर्ती भेट देऊन सन्मानित करण्यात आले.आलेल्या सर्व निमंत्रितांना शेवटी अल्पोपहार देण्यात आला.



## सर्जेराव दगडुजी शेळके यांचे निधन



बिडकीन दि १९ मे कृष्णापुर ता पैठण येथील रहिवाशी सर्जेराव दगडुजी शेळके (७२)यांचे दीर्घ आजाराने बुधवारी दि २८ रोजी संध्याकाळी साडेसात वाजता निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,एक मुलगी,सुना,जावई , नातवंडे असा परिवार आहे ते बिडकीन पेन्शनर संघटनेचे सदस्य होते.

संपादकीय

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# ‘दिव्य’त्वाची प्रचीती...

दक्षिण भारत हे बुद्धिबळाचे उगम स्थान आहे. अगदी प्राचीन काळात देवलोकापासून ते राजेशाहीपर्यंतच्या काळात देवलोक तसेच राजे-महाराजे बुद्धिबळाचे डाव खेळत होते. पटावरील राजा, राणी, हत्ती, उंट, प्यादांचा खेळ जितका मनोरंजक तितकाच क्लिष्ट आहे. पण प्रतिस्पर्ध्याला शह-काटशह देण्यासाठी क्लृप्त्या, योजना आखाव्या लागतात, त्यासाठी बुद्धीचा योग्य वापर करावा लागतो. त्यामुळे खेळताना थोडी गंमतच वाटते. बुद्धिबळ खेळाची हीच संस्कृती आजपर्यंत देशभरातच नव्हे, तर जगभरात पसरली आहे. याच परंपरेची जोपासना करत भारताच्या पाच वेळचा विश्वविजेता विश्वनाथन् आनंद, डोम्माराजू गुकेश, आर. प्रज्ञानंद, अरविंद चिदम्बरम् आणि आता नागपूरच्या महिला ग्रॅण्डमास्टर दिव्या देशमुखने जागतिकस्तरावर वर्चस्व गाजविले आहे. आधी विश्वनाथन् आनंदने रशियाचा दिग्गज गॅरी कास्पारोव्हचे बुद्धिबळ साम्राज्य उद्ध्वस्त करत पाच वेळा विश्वविजेतेपदाचा मान मिळविला व जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानही मिळविले होते. आज आनंद आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाचा उपाध्यक्ष आहे. तो नवीन युवा खेळाडूंचा आदर्श आणि मार्गदर्शकही आहे. आनंदच युवा खेळाडूंना प्रोत्साहन देत असतो. वेळोवेळी मार्गदर्शन करत असतो. दिव्या, गुकेश, अरविंदचे अलिकडील यश हे त्याचेच द्योतक आहे. अलिकडेच प्रथम विश्व मानांकित ३४ वर्षीय मॅग्नस कार्लसनने नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धा जिंकली असली तरी भारताच्या १९ वर्षीय डी. गुकेशने या स्पर्धेदरम्यान सातव्या फेरीत पराभवाचा हादरा दिला होता. त्यामुळे कार्लसन घाबरला होता, तेवढाच संतापला होता. म्हणून त्याने पराभव होताच पटावर मूठ आदळून आपला राग व्यक्त केला होता. नंतर सावरला व जिंकला, परंतु एका भारतीय ग्रॅण्डमास्टरने आपल्याला आव्हान दिल्याचे शल्य कार्लसनच्या मनाला बोचत होते आणि असेलही. तसेच दिव्या देशमुखनेही नुकतेच लंडनमध्ये आयोजित जागतिक रॅपिड व ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत अंतिम फेरीत अव्वल विश्वमानांकित चीनच्या यौ यिफानला पराभवाचा धक्का देऊन खळबळ उडविली. जागतिक कनिष्ठ गटातील अव्वल क्रमांकाची बुद्धिबळपटू दिव्या देशमुखने या जागतिक स्पर्धेत तीन पदके पटकावण्याची चमकदार कामगिरी केली. यात वैयक्तिक रूपात कांस्य, रॅपिड सांघिक गटात रौप्य, तर ब्लिट्झ सांघिक गटात कांस्यपदक मिळाले. तल्लख बुद्धिमत्तेच्या १९ वर्षीय दिव्या देशमुखने नागपूरचाच नाही, तर भारताचा जागतिकस्तरावर लौकिक वाढविला आहे. महिला ग्रॅण्डमास्टर (२०२१) व आंतरराष्ट्रीय मास्टर (२०२३) असलेल्या दिव्याने यापूर्वी ऑलिम्पियाडमध्ये तीन वेळा सुवर्णपदक जिंकले आहे, तसेच तिने आशियाई बुद्धिबळ स्पर्धेचे, जागतिक कनिष्ठ गट बुद्धिबळ तसेच जागतिक युवा बुद्धिबळ स्पर्धेचेही विजेतेपद पटकावले आहे. जागतिक रॅपिड व ब्लिट्झ स्पर्धेतील यशामुळे आज दिव्याचे फिडे रेटिंग गुण २४६३ वर पोहोचले आहे. ४५ व्या बुडापेस्ट बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारताला सुवर्णपदक जिंकून दिल्याबद्दल महाराष्ट्र राज्य सरकारने तिचा १ कोटी रुपयांचा रोख पुरस्कार देऊन गौरव केलेला आहे.

दिव्याला अगदी लहानपणापासून बुद्धिबळ खेळाची आवड असून पेशाने डॉक्टर असलेल्या जितेंद्र देशमुख व नम्रता देशमुख यांनी लेकीच्या खेळाची आवड जोपासली. तिला काय हवे नको, हे सर्व बघितले. तिला खेळासाठी अनुकूल वातावरण निर्माण केले. स्पर्धेसाठी प्रवासात तिची आबाळ होणार नाही याची काळजी घेतली. मराठमोळ्या कुटुंबातील दिव्याने आई-वडिलांच्या केलेल्या कष्टाचे, त्यागाचे चीज केले आणि जागतिक स्तरावर उंच झेप मारली. दिव्याचे हे यश बघून तिच्या आई-वडिलांनाही अभिमान वाटत असावा, हे स्वाभाविक आहे. गत मार्च महिन्यातही चेन्नईच्या ग्रॅण्डमास्टर अरविंद चिदम्बरम्ने अशीच कमाल केली आणि प्राग बुद्धिबळ स्पर्धेचे विजेतेपद जिंकून सर्वांचे लक्ष वेधले. पितृछत्र हरपलेल्या अरविंदची बुद्धिबळ खेळातील आवड त्याच्या आईने काबाडकष्ट करून जोपासली व त्याला प्रोत्साहन दिले. तामिळनाडू, दक्षिण भारत हे बुद्धिबळाचे उगमस्थान आहे, बुद्धिबळाचे ऊर्जा केंद्र आहे. तीच चैतन्यमयी संस्कृती मध्य भारतातील विदर्भापर्यंतही पसरली आहे, त्यामुळे आजपर्यंत विदर्भातील खेळाडूंनी जागतिक स्तरावर आपल्या बुद्धिबळ चातुर्याची छाप सोडलेली आहे. विदर्भाच्या या प्रतिभावान किशोरवयीन दिव्याच्या अलौकिक कामगिरीपूर्वी नागपूरच्या आंतरराष्ट्रीय मास्टर अनुप देशमुख, रौनक साधवनी, निहांश खोडे, आकाश ठाकूर, अमरावतीच्या स्वप्निल धोपाडेनेही आंतरराष्ट्रीय स्तरावर घवघवीत यश संपादन केले होते. १९९८ मध्ये अनुपने भारतीय बुद्धिबळ संघात स्थान मिळविले व त्यानंतर त्याने एलिस्टा ऑलिम्पियाडमध्येही भारताचे प्रतिनिधित्व केले. तो ब्राझीलमध्ये युथ ऑलिम्पिकमध्येही भारताकडून खेळला व १९९९ मध्ये त्याला आंतरराष्ट्रीय मास्टर उपाधी मिळाली. २०१६ मध्ये स्वप्निलने ग्रॅण्डमास्टर उपाधी प्राप्त केली. ग्रॅण्डमास्टर होणारा हा पहिला वैदर्भी बुद्धिबळपटू ठरला. त्याने २०१७ मध्ये आईसले ऑफ मॅन आंतरराष्ट्रीय मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेत तिसरे स्थान पटकावले होते. रौनक साधवानी याने वयाच्या १३ व्या वर्षी ग्रॅण्डमास्टर उपाधी मिळविली. तो भारताचा ६५ वा ग्रॅण्डमास्टर ठरला. आकाश ठाकूरने फिडे मास्टर विजेतेपद पटकावले होते. त्याने ४४ व्या फिडे बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये अँगोला महिला बुद्धिबळ संघाचा प्रशिक्षक म्हणून कामगिरी केली आहे.

मुळात खेळाडूला घरूनच प्रोत्साहन मिळायला हवे. एखाद्या खेळात आपले करीअर घडवण्यासाठी खेळाडूला त्याच्या पालकांनीच प्रोत्साहन द्यायला पाहिजे. याशिवाय राज्य सरकार तसेच केंद्र सरकारचाही पाठिंबा असणे तितकेच महत्त्वाचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे धोरणच आहे आहे की, स्वस्थ आणि तंदुरुस्त भारत घडावा. त्यामुळेच त्यांनी खेलो इंडिया, फिट इंडिया, फिट इंडिया सायकल रॅलीसारखे उपक्रम राबवण्यास सुरुवात केली. तसेच आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याची परंपरा सुरू केली. मोदी सरकार केवळ स्पर्धेत यश संपादन करून आल्यानंतरच नव्हे, तर स्पर्धेपूर्वी खेळाडूंच्या तयारीकडे तसेच त्यांच्या विदेश प्रवासाची व्यवस्था करण्यापर्यंतची सोय करत आहे. शिवाय खेळाडू, संघ ऑलिम्पिक, पॅरालिम्पिक, डेफलिम्पिक आणि जागतिक स्पर्धेला विदेशात जाण्यापूर्वी आणि स्पर्धेहून यश संपादन करून आल्यानंतर खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी त्या खेळाडूंशी संवाद साधतात, खेळाडूंना आपुलकीने त्यांच्या अडचणी विचारतात, त्या दूर करतात. त्यामुळे आज ऑलिम्पिक तसेच पॅरालिम्पिकमध्ये भारतीय खेळाडूंच्या पदक संख्येत मोठी वाढ झालेली दिसत आहे. यापूर्वी कोणत्याही सरकारकडून खेळाडूंना असे प्रोत्साहन मिळाले नाही. कॅण्डिटेड स्पर्धा जिंकून भारताच्या डी. गुकेशने जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत खेळण्याची पात्रता सिद्ध केली तेव्हाही पंतप्रधान मोदींनी शुभेच्छा दिल्या होत्या. सिंगापूर येथे झालेल्या जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत गुकेशने तत्कालीन विश्वविजेता चीनच्या डिंग लिरेनवर मात करून अजिंक्यपदाचा मान मिळविला. भारताचा डी. गुकेश सर्वांत युवा विश्वविजेता ठरल्याबद्दल पंतप्रधान मोदींनी त्याचे खूप कौतुक केले. त्याला आपल्या निवासस्थानी बोलावून त्याचे कौतुक केले व शाब्बास म्हणत पाठ थोपटली. गत वर्षी बुडापेस्टमध्ये ४५ व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारतीय संघाने दुहेरी सुवर्णपदक जिंकले, तेव्हाही पंतप्रधान मोदी यांनी संघाच्या या ऐतिहासिक कामगिरीची मुक्तकंठाने प्रशंसा केली. एकंदरीत मोदी सरकार हे सर्वसामान्यांचे, श्रमिकांचे, शेतकऱ्यांचे, उद्योजकांचे तसेच खेळाडूंचेही आहे. क्रीडा क्षेत्राला असेच प्रोत्साहन मिळत राहिले, तर एक दिवस भारत क्रीडा महासत्ता नक्कीच होईल. तेव्हा विदर्भातील बुद्धिबळपटूंनीच नव्हे, तर इतर खेळांच्या खेळाडूंनी या दिग्गजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आणि राज्य व केंद्र सरकारकडून मिळत असलेल्या सोयी-सुविधांचा फायदा घेत क्रीडा क्षेत्रात उत्तुंग भरारी घ्यावी सोबतच स्वत:चा आणि देशाचा नावलौकिक करावा.

## तंत्रवेध

डॉ. दीपक शिकारपूर

# क्रांतिकारी शोधाची प्रेरक कहाणी

माहिती तंत्रज्ञान म्हणजेच ‘आयटी’ची गंगा भारतात अवतीर्ण झालेल्याला पंचवीस एक वर्षे आणि ती सर्वसामान्य नागरिकांच्या प्रत्यक्ष अंगणी येऊनही आजघडीला एक दशकाहून जास्त काळ लोटला आहे. ही मूळची संगणकीय क्रांती असली तरी तिचा खरा प्रसार (आणि प्रभावही) प्रत्येकाच्या हाती स्मार्टफोन आल्यापासून खऱ्या अर्थाने जाणवू लागला आहे. इंटरनेटमुळे जग लहान झाले असे म्हणता येईल. दूर देशातील (परिचित तसेच अपरिचितही) व्यक्तींशी काही मिनिटांमध्ये वैयक्तिक, व्यापारी आणि सामाजिक संबंध जोडणे शक्य झाले आहे ते यामुळेच. ज्ञान आणि माहितीचा प्रसार पुस्तके, पैसे आणि अंतराच्या सीमा ओलांडू शकला तो इंटरनेटमुळेच. आजकाल डिजिटल जमाना आहे. सगळीकडे ऑनलाईन पेमेंट होते. दूध, भाजीपाल्यापासून पेट्रोल भरेपर्यंत आजकाल सगळीकडे क्यूआर कोडचा वापर करून पैसे देता येतात. फक्त एक कोड स्कॅन करून अवघ्या काही सेकंदांमध्ये पेमेंट पूर्ण करता येते. पण याचा इतिहास रंजक आहे.

सॅरेनडिपिटी म्हणजे अचानक आणि अनपेक्षितपणे चांगली गोष्ट घडणे; जी आपण शोधत नसलो तरी आपोआप समोर येते. हा शब्द ग्रीक कथेतील तीन राजकुमारांवर आधारित आहे. त्यांनी काही त्रुटींमध्ये आणि अनपेक्षित परिस्थितींमध्ये चांगली गोष्ट शोधली होती. सॅरेनडिपिटी म्हणजे एक प्रकारचा ‘चांगल्या नशिबाचा योग’ असतो, जिथे घटनांच्या संयोगामुळे काही तरी अनुकूल आणि लाभकारी घडते. सॅरेनडिपिटी म्हणजे एखाद्या संशोधकाला नकाशावर विशिष्ट नोंद करत असताना काहीतरी अनपेक्षित, पण अत्यंत महत्त्वाचा शोध लागणे. याला आपण ‘शोधाच्या नशिबी’ किंवा ‘आश्चर्यकारक संयोगाचे परिणाम’ म्हणू शकतो. सॅरेनडिपिटी आपल्याला सांगते की, अनेक वेळा आपले जीवन आपल्या नियोजित मार्गानुसार जात नसले तरी अपघाती आणि अनपेक्षित घटनांमुळे आपल्याला अधिक चांगले आणि मौल्यवान अनुभव मिळू शकतात. यामुळे आपल्या जीवनाला आश्चर्य, आनंद आणि नवा दृष्टिकोन मिळतो. असे म्हणतात की श्रीखंडाचा शोध असाच नासलेल्या दुधाचे काय करायचे या प्रश्नातूनच लागला. जपानच्या एका शांत कोपऱ्यात, १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला मासाहिरो हारा हा इंजिनीअर बारकोड्सवर उपाय शोधत होता. ते खूप कमी डेटा साठवू शकत होते. जग गतीने बदलत होते पण हे छोटे पट्टे त्यानुसार गती पकडू शकत नव्हते. मासाहिरो ‘डेंसो वेव्ह’ या ऑटो इंडस्ट्रीतील एका कंपनीत काम करत होता, जिथे गती आणि अचूकता हेच सर्व काही होते. त्याला काही तरी चांगले, स्मार्ट हवे होते. एके रात्री, गो या प्राचीन पांढऱ्या आणि काळ्या दगडांच्या बोर्ड गेमसह विश्रांती घेत असताना त्याला प्रेरणा मिळाली. त्या गेमची



परत परतची जटिलता, पॅटर्न्समधून अर्थ कसा उभा राहतो ही माहिती अशा प्रकारे साठवता येईल का, असा विचार त्याच्या मनात घोळू लागला. तीच ती भावना होती. त्यानंतर घडली एक शांत क्रांती. मासाहिरो आणि त्याच्या टीमने एक नवीन कोड तयार केला. त्यामुळे बारकोड सुधारला. त्याची संपूर्ण पुनर्रचना करता येऊ लागली. तो कोणत्याही दिशेने वाचता येऊ शकत होता. तुटला तरी स्कॅन केला जाऊ शकत होता आणि शंभरपट अधिक माहिती साठवू शकत होता. त्यांनी त्याला ‘कोड’ असे नाव दिले. पुढे इतर महान शोधांप्रमाणेच तो प्रचलित झाला.

हा कोड वाहन उद्योगातील भागांचे ट्रॅकिंग करण्यासाठी डिझाईन करण्यात आला होता. मासाहिरो हारा यांना गो या पारंपरिक बोर्ड गेमच्या काळ्या आणि पांढऱ्या पद्धतीतून प्रेरणा मिळाली आणि त्यांनी माहिती संग्रहित करण्यासाठी एक नवी पद्धत शोधली. आज आपण स्मार्टफोन कॅमेरा वापरून किंवा कोड रीडर ॲप वापरून क्यूआर कोड स्कॅन करू शकतो. स्कॅन केल्यानंतर वेबसाईट किंवा इतर प्रकारची कोडमधील माहिती डिव्हाईसवर उघडते. आजकाल कोडचा वापर ऑनलाईन पेमेंट, वेबसाईटवर जलद प्रवेश, माहिती साठवणूक आणि इतर अनेक कामांसाठी केला जातो. कोड पारंपरिक बारकोडपेक्षा अधिक माहिती साठवू शकतो. त्यामुळे वेबसाईट लिंक, संपर्क माहिती आणि इतर संबंधित तपशील साठवता येतात. कोड स्कॅन करणे हा स्मार्टफोनद्वारे माहिती मिळवण्याचा जलद आणि सोपा मार्ग आहे. यामुळे वेबसाईट उघडणे, ॲप डाऊनलोड करणे किंवा पेमेंट करणे शक्य होते. कोडचा वापर मार्केटिंग मोहिमांमध्ये ग्राहकांना विशिष्ट लॅण्डिंग पृष्ठांवर, प्रचार सामग्री प्रदान करण्यासाठी किंवा ग्राहक सहभाग वाढवण्यासाठी केला जातो. विविध उद्योगांमध्ये संपर्काविना पेमेंट्ससाठी कोडचा वापर केला जातो. त्यामुळे सुरक्षित आणि सोयीस्कर व्यवहार शक्य होतात. कोडचा वापर विशिष्ट क्षेत्रांमध्ये किंवा कार्यक्रमांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी केला जातो. त्याचप्रमाणे उत्पादने आणि इन्व्हेंटरी ट्रॅक करण्यासाठीही कोडचा वापर केला जातो. त्यामुळे त्यांची स्थिती आणि स्थानाबद्दल रिअल-टाईम माहिती मिळते.

आजघडीला कोडचा वापर डिजिटल साइनेजमध्ये इंटरॲक्टिव्ह अनुभव प्रदान करण्यासाठी केला जातो. त्यामुळे वापरकर्त्यांना ऑनलाईन संसाधनांमध्ये किंवा अतिरिक्त माहितीमध्ये प्रवेश मिळतो. कोडचा वापर उत्पादने किंवा सेवांची प्रामाणिकता पडताळण्यासाठीही केला जातो, जसे की कॉन्सर्ट तिकिटे किंवा औषध उत्पादने. कोड तंत्रज्ञानातील भविष्यकालीन ट्रेंड्स रंजक आहेत. ते समजून घेतले तर येत्या काळातील तंत्रक्रांतीची एक झलक मिळू शकते. याचीच एक झलक म्हणजे स्मार्ट आणि डायनॅमिक कोड्स. पारंपरिक कोड्स स्थिर असतात, परंतु डायनॅमिक कोड्स दुरून अपडेट केले जाऊ शकतात. यामुळे व्यवसायांना मेन्यू किंवा इव्हेंट तपशील बदलण्याची सुविधा मिळते. यातील एक भाग म्हणजे ऑगमेंटेड रिॲलिटीसह एकत्रीकरण. अशा प्रकारे कोड्सचा वापर आता वाढत आहे. कोड स्कॅन केल्याने थ्रीडी मॉडेल्स, ॲनिमेशन्स किंवा व्हर्च्युअल सूचना वास्तविक जगात समोर येऊ शकतात. यामुळे वापरकर्ता सहभाग वाढतो. व्हॉईस-एक्टिव्हेटेड कोड्स हा आणखी एक प्रकार. उदयोन्मुख व्हॉईस-एक्टिव्हेटेड कोड्स वापरकर्त्यांना व्हॉईस कमांडद्वारे सामग्रीसह संवाद साधण्याची सुविधा देतात. कोडच्या वापरात काही वाढीव सुरक्षा वैशिष्ट्ये आहेत. फिशिंग आणि मालवेअर धोके टाळण्यासाठी कोड्समध्ये एन्क्रिप्शन आणि ब्लॉकचेन पडताळणीसारखे प्रगत सुरक्षा उपाय समाविष्ट केले जात आहेत. या तंत्रज्ञानामुळे स्कॅन केलेले दुवे प्रामाणिक आणि सुरक्षित आहेत. विशेषतः आर्थिक व्यवहारांमध्ये त्यांचे महत्त्व मोठे आहे. याचे इंटरनेट ऑफ थिंग्जसह एकत्रीकरण केले जात आहे. कोड्स स्मार्ट डिव्हाईसेसमध्ये एम्बेड केले जात असल्यामुळे वापरकर्त्यांना मॅन्युअल्समध्ये प्रवेश मिळवणे, समस्या निवारण करणे किंवा सेटिंग्ज रिमोटली नियंत्रित करणे शक्य होते. व्यवसाय आणि व्यवहारामध्ये कागदाचा वापर कमी करण्यासाठी कोड्सचा वापर करून डिजिटल रिसिट, मॅन्युअल्स आणि ब्रोशर्स प्रदान केले जात आहेत. हा बदल पर्यावरणीय जपणुकीच्या प्रयत्नांना समर्थन देतो आणि पर्यावरणपूरक पद्धतींसाठी ग्राहकांच्या पसंतीशी सुसंगत आहे. मासाहिरो हाराने कधीही प्रसिद्धी मागितली नाही. पण एका शांत गो गेममधून एका क्रांतिकारी शोधाची प्रेरणा घेऊन त्याने एक महत्त्वाचे संशोधन तडीस नेले. आता हे संशोधन अब्जावधी लोकांच्या खिशात, स्क्रीन्सवर आणि जीवनात आहे. कारण कधी कधी, सर्वांत मोठ्या शोधांचा उदय ताकदीने नाही, तर जुन्या समस्येला नवीन दृष्टीने पाहिल्याने होतो.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

नंदकिशोर काथवटे

# गुंतवणुकीचा नवा चेहरा

आजच्या काळात आर्थिक सुबत्तेसाठी आणि भविष्यातील सुरक्षिततेसाठी गुंतवणूक करणे अत्यावश्यक झाले आहे. पारंपरिक गुंतवणुकीच्या साधनांपेक्षा आजची तरुण पिढी अधिक रिटर्न्सच्या अपेक्षेने नव्या आर्थिक उपकरणांकडे वळत आहे. यात प्रामुख्याने दोन गोष्टींचा उल्लेख करावा लागेल-एसआयपी (सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन) आणि शेअर मार्केट. या दोन्ही साधनांत गुंतवणूक करताना अनेक जण मोठ्या नफ्याच्या आशेने स्वत:चा पैसा गुंतवत आहेत. मात्र, त्यामागील जोखीम, स्थैर्य आणि प्रत्यक्षात मिळणारे रिटर्न यांचा नीट विचार केला जातो का, हा एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

तरुणाई आणि शेअर बाजार हे नवे समीकरण सध्या मार्केटमध्ये सुरू आहे. मात्र तरुणाईकरिता अशी गुंतवणूक म्हणजे आकर्षण की अंधानुकरण? मुळात हा एक प्रश्न आहे. भारतात २०२१ ते २०२४ दरम्यान लाखो गुंतवणूकदारांमध्ये आयपीओ आणि इक्विटी मार्केटकडे वळण्याची प्रवृत्ती दिसून आली. नव्या कंपन्यांचे प्राथमिक समभाग विक्रीत (आयपीओ) सहभागी होणे म्हणजे कमी वेळात जास्त नफा मिळवण्याचा मार्ग अशी एक धारणा अनेक नवशिक्या गुंतवणूकदारांमध्ये निर्माण झाली. मात्र, प्रत्यक्षात काय घडले? अनेकांना तोटा सहन करावा लागला. एका संशोधनातील अहवालानुसार, मागील ३ वर्षांत आलेल्या आयपीओपैकी ४८ टक्के कंपन्यांचे रिटर्न्स निगेटिव्ह आहेत. याचा अर्थ, अर्ध्याहून जास्त गुंतवणूकदारांना अपेक्षेप्रमाणे नफा मिळालाच नाही, उलट त्यांना तोटा सहन करावा लागला. आयपीओ म्हणजे हमखास नफा मिळवण्याचे माध्यम नसून, त्यामध्येही जोखीम तितकीच असते. आयपीओ प्रमाणेच तरुण एसआयपीकडेही वळलेले आहेत. एसआयपी सुरक्षित आहे पण ते सुद्धा जोखीम असलेले साधन आहे. सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन (सिप) ही अशी योजना आहे, जिच्यात दर महिन्याला निश्चित रक्कम म्युच्युअल फंडात गुंतवली जाते. दीर्घकालीन उद्दिष्टांसाठी ही योजना उपयुक्त मानली जाते. अनेक जाहिरातींमध्ये हे सांगितले जाते की पैसे दर महिन्याला गुंतवा आणि भविष्यात कोटींचा फंड मिळवा. मात्र यामध्ये ‘मुच्युअल फंड इन्व्हेस्टमेंट्स आर सबजेक्ट टु मार्केट रिस्क’ असा स्पष्ट इशारा दिला जातो. आज अनेक तरुण या योजनांकडे आकर्षित होत आहेत. त्यांना वाटते की फिक्स्ड डिपॉझिटपेक्षा जास्त व्याज यामध्ये मिळते, परंतु यामागची बाजाराशी संबंधित अनिश्चितता आणि संभाव्य नुकसान या गोष्टींकडे अनेक वेळा दुर्लक्ष केले जाते. ‘स्वप्न विकणारे’ आयपीओ आणि गोंधळलेले गुंतवणूकदार अशी काहीशी स्थिती आता सर्वत्र दिसून येत आहे.

३ वर्षांत आलेल्या २३६ आयपीओ पैकी तब्बल ११३ चे रिटर्न्स निगेटिव्ह दाखविण्यात आले आहे. म्हणजेच जवळपास ५० टक्के कंपन्यांच्या शेअरने लिस्टिंगनंतर तोटा दिला आहे. यामध्ये काही कंपन्यांचे शेअर्स लिस्टिंगनंतर २५ टक्क्यांपेक्षा जास्त कोसळले. या आयपीओमध्ये गुंतवणूक करणारे बहुतांश गुंतवणूकदार हे ‘रिटेल’ म्हणजे सामान्य नागरिक आहेत. त्यांनी केवळ प्रसिद्धीवर विश्वास ठेवून किंवा कंपनीचे उत्पादन प्रसिद्ध असल्यामुळे गुंतवणूक केली. परंतु, कंपनीचा आर्थिक अभ्यास, फायनान्शियल स्टेटमेंट्स, प्रॉफिट मार्जिन, प्रॉमोटरचे ट्रॅक रेकॉर्ड - या गोष्टी तपासल्या गेल्या नाहीत. यामुळेच आज अनेक गुंतवणूकदार निराश झाले आहेत. आजची तरुण पिढी आर्थिकदृष्ट्या अधिक जागरूक आहे. त्यांना फक्त बँक ठेवी आणि पारंपरिक बचत योजना नको आहेत. त्यांना हवे आहे झपाट्याने वाढणारे रिटर्न्स, आर्थिक स्वतंत्रता आणि अल्पावधीत मोठा फंड. म्हणूनच त्यांनी सिप आणि शेअर मार्केट याकडे मोठ्या प्रमाणावर आपला कल वळवला आहे. परंतु, हे करत असताना सर्वांत मोठा जो धोका दिसतो तो म्हणजे अपूर्ण माहितीवर आधारित गुंतवणूक. बहुतेक तरुण सोशल मीडिया, यूट्यूब आणि व्हॉट्सॲप ग्रुप्सवर अवलंबून असतात. तेथून मिळणाऱ्या ‘टिप्स’ किंवा ‘हॉट स्टॉक्स’वर ते पैसे गुंतवतात. ही प्रवृत्ती फार धोकादायक आहे.

गुंतवणुकीत यशस्वी होण्यासाठी काही मूलभूत नियम लक्षात ठेवणे आवश्यक आहे. कंपनीचे मूल्यमापन करणे, तिचा नफा, महसूल, कर्जाची स्थिती, विस्तार योजना आदी बाबींचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. सर्व आयपीओ फायदेशीर नसतात. अनेक आयपीओ केवळ प्रमोटर्ससाठी ‘एग्झिट प्लॅन’ असतो. स्वतः माहिती घेतल्याशिवाय पैसे गुंतवणे धोक्याचे आहे. गुंतवणूक ही झपाट्याने श्रीमंत होण्याची संधी नसून गुंतवणूक म्हणजे एक नियोजनबद्ध प्रवास आहे. ते तरुणाईने समजून घेण्याची गरज आहे.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

श्यामकांत जहागीरदार

# हवाई अपघातातील राजकीय नेत्यांचा मृत्यू

मागील आठवड्यात अहमदाबाद विमानतळावरून लंडनसाठी उड्डाण केलेले एअर इंडियाचे बोईंग ड्रीमलायनर विमान उड्डाणानंतर लगेच विमानतळ परिसरात कोसळले. यात विमानातील २४१ प्रवासी मृत्युमुखी पडले, तर ज्याठिकाणी विमान कोसळले त्या बी. जे. मेडिकल कॉलेजच्या होस्टेलमधील काही प्रशिक्षणार्थी डॉक्टरांसह या अपघातातील मृतांची संख्या २७५ झाली. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचाही या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला.

आपल्या देशात विमान आणि हेलिकॉप्टर अपघातात आतापर्यंत अनेक राजकीय नेत्यांचा मृत्यू झाला आहे. यात काँग्रेसचे तेव्हाचे ज्येष्ठ नेते संजय गांधी, एक तत्कालीन मुख्यमंत्री, दोन माजी मुख्यमंत्री, लोकसभेचे सभापती, केंद्रीय मंत्री आणि काही मान्यवरांचा प्रामुख्याने समावेश आहे. विमान अपघातात दगावलेले देशातील पहिले राजकीय नेते काँग्रेसचे संजय गांधी होते. २३ जून १९८० ला विमान अपघातात अमेठीचे खासदार असलेल्या संजय गांधी यांचा मृत्यू झाला होता. विशेष म्हणजे संजय गांधी वैमानिक नसले तरी त्यांच्याजवळही विमान चालवण्याचा परवाना होता. संजय गांधी काँग्रेसच्या तेव्हाच्या अध्यक्ष आणि पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे कनिष्ठ पुत्र होते. राजीव गांधी तेव्हा राजकारणात नव्हते, तर वैमानिक होते. संजय गांधी यांचा तेव्हा काँग्रेस पक्षात आणि सरकारमध्येही दबदबा होता. ते घटनाबाह्य सत्ताकेंद्र झाले होते. विमान अपघातात संजय गांधींचे निधन झाल्यानंतर वैमानिक असलेल्या राजीव गांधींना एअर इंडियातील आपली पायलटची नोकरी सोडून आपल्या आईच्या म्हणजे इंदिरा गांधींच्या मदतीसाठी राजकारणात यावे लागले होते. संजय गांधींच्या निधनानंतर काँग्रेस पक्षाच्या राजकारणाची दिशा आणि दशा बदलून गेली.

माजी केंद्रीय मंत्री माधवराव शिंदे यांचे निधनही विमान अपघातात झाले होते. ३० सप्टेंबर २००२ ला कानपूर येथे एका मेळाव्यासाठी जात असताना मैनपुरीजवळ शिंदे यांचे विमान अपघातग्रस्त झाले होते. विशेष म्हणजे कोसळत असताना शिंदे यांच्या विमानाला आगही लागली होती. त्यात त्यांच्यासह आठ जणांचा मृत्यू झाला होता. संजय गांधींच्या मृत्यूनंतर जसे राजीव गांधींना राजकारणात यावे लागले, तसेच माधवराव शिंदेंच्या विमान अपघातातील मृत्यूनंतर त्यांच्या मुलाला, ज्योतिरादित्य शिंदे, यांना त्यांचा राजकीय उत्तराधिकारी म्हणून राजकारणात पदार्पण करावे लागले होते. तेलगू देसमचे नेते आणि लोकसभेचे सभापती जीएमसी बालयोगी यांचेही ३ मार्च २००२ ला हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. बालयोगी यांना नेणाऱ्या हेलिकॉप्टरमध्ये बिघाड निर्माण झाल्यानंतर आपत्कालीन स्थितीत उतरवण्याचा प्रयत्न करत असताना ते अपघातग्रस्त झाले होते. १९९९ मध्ये सत्तेवर आलेल्या अटलबिहारी वाजपेयींच्या नेतृत्वाखालील रालोआच्या सरकारला तेलगू देसमचा पाठिंबा होता. त्यामुळे भाजपाने मित्रपक्ष असलेल्या तेलगू देसमच्या बालयोगी यांना लोकसभेचे सभापती केले होते.

प्रसिद्ध उद्योगपती आणि हरयाणाचे तेव्हाचे ऊर्जामंत्री ओ. पी. जिंदल आणि तत्कालीन कृषिमंत्री सुरेंद्रसिंह यांचे २००५ मध्ये हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. या दोघांना दिल्लीहून चंदीगडला नेणारे हेलिकॉप्टर उत्तरप्रदेशातील सहारनपूर येथे कोसळले होते. आंध्रप्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री वायएस राजशेखर रेड्डी यांचे २ सप्टेंबर २००९ ला एका हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. रेड्डी हैदराबादच्या बेगमपेठ विमानतळावरून कित्तूर येथील एका कार्यक्रमासाठी सकाळी निघाले. पण निर्धारित वेळी त्यांचे हेलिकॉप्टर कित्तूरला पोहोचलेच नाही. विमान वाहतूक नियंत्रण कक्षाशी त्यांच्या हेलिकॉप्टरचा संपर्क तुटला होता. त्यामुळे खळबळ उडाली. रेड्डी यांचे हेलिकॉप्टर बेपत्ता झाले होते. त्यामुळे त्याचा शोध घेण्यासाठी युद्धपातळीवर शोधमोहीम हाती घेण्यात आली. ज्या ठिकाणी हेलिकॉप्टर कोसळल्याचा अंदाज होता, तो घनदाट जंगलाचा भाग होता. त्यामुळे तेथे पोहोचणेही कठीण होते. खराब हवामानामुळे हेलिकॉप्टरही पाठवता येत नव्हते. केंद्रीय राखीव पोलिस दलाचे ५ हजार जवान शोधकार्यात लावण्यात आले. त्यांनी जंगलात धाव घेतली. दुसऱ्या दिवशी एका दुर्गम ठिकाणी हेलिकॉप्टर कोसळल्याचे मदत आणि बचाव पथकाला दिसले. राजशेखर रेड्डी यांच्या मृतदेहाचे अवशेष त्याठिकाणी आढळून आले.

राजशेखर रेड्डी यांच्या निधनानंतर त्यांचा मुलगा जगनमोहन रेड्डी यांना मुख्यमंत्री व्हायचे होते. पण काँग्रेस पक्षाने दुसऱ्या नेत्याची निवड केली. त्यामुळे जगनमोहन रेड्डी आणि राजशेखर रेड्डी यांचे समर्थक आमदार नाराज झाले. काही महिन्यांनी जगनमोहन रेड्डी यांनी काँग्रेस पक्षातून बाहेर पडत आपल्या पित्याच्या नावाने वायएसआर काँग्रेसची स्थापना केली. नंतरच्या विधानसभा निवडणुकीत मूळ काँग्रेस पक्षाचा पराभव करत वायएसआर काँग्रेसला बहुमत मिळाले आणि जगनमोहन रेड्डी मुख्यमंत्री झाले. त्यानंतर राज्यात काँग्रेसची घसरण सुरू झाली, काँग्रेसला कधी सत्तेवर येता आले नाही.

अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री दोरजी खांडू यांचेही एका हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. पवनहंस हेलिकॉप्टरने खांडू तवांगवरून इटानगरसाठी निघाले होते. पण रस्त्यातच त्यांचे हेलिकॉप्टर बेपत्ता झाले. रेड्डी यांचे हेलिकॉप्टर दुसऱ्या दिवशी सापडले, पण खांडू यांचे हेलिकॉप्टर पाच दिवसांनंतर अपघातग्रस्त स्थितीत आढळले होते. खराब हवमानामुळे हे हेलिकॉप्टर कोसळल्याचे तेव्हा सांगण्यात आले. सामान्यपणे कोणतीही अति महत्त्वाची व्यक्ती एक इंजिन असलेल्या हेलिकॉप्टरमधून प्रवास करीत नाही. मात्र खांडू प्रवास करत असलेले हेलिकॉप्टर एका इंजिनचे होते.

देशाचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (सीडीएस) जनरल बिपीन रावत यांचा ८ डिसेंबर २०२१ ला हेलिकॉप्टर अपघातात मृत्यू झाला होता. हेलिकॉप्टरने सुलुरमधून वेलिंग्टनला जात असताना रावत यांचे हेलिकॉप्टर अपघातग्रस्त झाले होते. यात रावत, त्यांची पत्नी आणि अन्य नऊ जणांचा मृत्यू झाला होता. गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचा मृत्यू जसा एअर इंडियाच्या विमान अपघातात झाला, तसाच देशातील महान शास्त्रज्ञ होमी जहाँगीर भाभा यांचा मृत्यूही २४ जानेवारी १९६६ मध्ये एअर इंडियाच्या विमानाला झालेल्या अपघातात झाला होता. भाभा भारताच्या परमाणू कार्यक्रमाचे जनक मानले जातात. आपल्याला हिरवी झेंडी मिळाली तर १८ महिन्यांच्या आत आपण भारतासाठी अणुबॉम्ब बनवू शकतो, असे अतिशय महत्त्वाचे विधान भाभा यांनी आपल्या अपघाती मृत्यूच्या काही दिवस आधी केले होते. एअर इंडियाच्या विमानाने मुंबईवरून न्यू यॉर्कला जात असताना भाभा असलेले विमान युरोपमधील सर्वांत उंच अशा माँट ब्लॉक पहाडावर धडकले होते. भाभा यांच्या विमान अपघातातील मृत्यूबद्दल तेव्हा वेगवेगळ्या प्रकारच्या अनेक बातम्या आल्या होत्या. त्यांचा मृत्यू हा संशयास्पद मानला गेला होता.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### शालार्थ घोटाळा : तपास सुधारणा की प्रतिष्ठेचा घात?

नागपूर जिल्ह्यातील शालार्थ पोर्टलवरील घोटाळ्यात बनावट कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून सरकारी निधी लुटल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. विशेष तपास पथकाची नियुक्ती ही योग्य पाऊल असले तरी तपासाची दिशा पाहता संस्थाचालकांनाच केंद्रस्थानी ठेवले जात असल्याची चिंता वाढली आहे. २०० हून अधिक शाळांचे संचालक चौकशीसाठी बोलावले जात असून, ठोस पुराव्याविना जबाबांवरूनच संगनमत ठरवले जाते. दस्तावेजातील त्रुटी, विलंब, अपूर्णता म्हणजे गुन्हा नव्हे. तपास करताना शाळेचे अस्तित्व, कर्मचाऱ्यांची उपस्थिती, शैक्षणिक पात्रता व नेमणुकीतील तारखा या स्पष्ट निकषांचा आधार घ्यावा. पोलिस यंत्रणेला शैक्षणिक तपासाचा अनुभव नसल्यामुळे निष्पापांवर अन्याय होण्याची शक्यता आहे. भीती नव्हे, तर सुधारणा हेच कारवाईचे उद्दिष्ट असावे. अन्यथा शैक्षणिक संस्थांमध्ये नकारात्मक वातावरण निर्माण होऊ शकते.

**निष्कर्ष** : गुन्हेगारांना शिक्षा मिळालीच पाहिजे, पण निष्पापांची प्रतिष्ठा अबाधित राहिली पाहिजे. शिक्षणव्यवस्थेत पारदर्शकतेसोबतच न्यायाची योग्य समजही महत्त्वाची आहे.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

### पावसाचा सामना करण्यासाठी मनपा सज्ज आहे?

सध्या पश्चिम महाराष्ट्रात पावसाचा धुमाकूळ सुरू आहे. रोज लोक वाहून जात आहेत, लोकांच्या घरात पाणी जाऊन त्यांची वाताहत होत आहे अशा बातम्या येत आहेत. अजून विदर्भात पावसाचे आगमन झालेले नाही. पाऊस असा काही येतो की जणू काही ढगफुटी झाली की काय! गेल्या ३-४ वर्षापासून नागपूरच्या रवींद्र नगरमध्ये थोडा पाऊस आला तर गुडघाभर पाणी साचते. लोकांच्या घरामध्ये पाणी जमा होते. सन्माननीय आयुक्तांनी मागील वर्षी आमच्या वसाहतीला भेट दिली. तिथे अनेक ज्येष्ठ नागरिकांनी पावसाळ्यात काय हाल होतात हे त्यांना सांगितले. घरासमोरचे चेम्बर्स साफ होत नाहीत. कचरा उचलला जात नाही. इमारतींचे बांधकाम साहित्य रस्त्यावर पडून असल्यामुळे पाण्याचा निचरा होत नाही, नाल्यामध्ये पाणी जात नाही. मुख्यमंत्री निधीमधून सिमेंटची भूमिगत नाली तयार केली पण ती अपूर्णावस्थेतच आहे. कारण समोर ती मोठया नाल्याला जोडण्यात आली नाही. रवींद्र नगरच्या दोन- तीन रांगामध्ये अक्षरशः नदीचे स्वरूप आलेले असते. पावसाळ्याच्या आधी घायव्याची खबरदारी जर घेतली तर नागरिकांना दिलासा मिळू शकेल. नगरसेवक दिलीप दिवे सदैव नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी अग्रेसर असतात परंतु काही वर्षांपासून नगरसेवक नसल्याने प्रशासनाने याकडे लक्ष देणे गरजेचे झाले आहे. अजून आपल्याकडे पाऊस आला नाही. त्यामुळे आपल्याकडे वेळ आहे तेव्हा नियोजन करून, सुनियोजित पद्धतीने मुसळधार पावसाला सामोरे जाऊन नागरिकांना होणारा त्रास कसा कमी करता येईल याकडे लक्ष देणे अत्यावश्यक आहे.

मागील वर्षी सुद्धा लोकांचे भयंकर नुकसान झाले होते. सिमेंट रस्त्याचे काम सुरू असल्यामुळे रस्ते बंद असतात आणि गल्लीबोळातून नागरिकांना ये-जा करावी लागते. त्यामुळे विकास कामांबरोबरच जर जनतेला होणारा त्रास आणि अपघात होणार नाही हेही प्रशासनाला बघावे लागेल. रवींद्र नगरसारख्या वसाहतीमध्ये पाणी भरत असेल आणि स्लम वसाहतीसारखं स्वरूप येत असेल तर ते शोभणार नाही. अजूनही वेळ आहे. सर्व नागरिक, नगरसेवक, प्रशासकीय यंत्रणा सर्व मिळून आपण एकमेकांना सहकार्य करून यावर्षी पावसाळ्यात कोणालाही त्रास होणार नाही याची काळजी घेऊया.

**सुनील बोक्षे**/७५८८१७७४६२

### अंबाझरी गार्डन सुरू करा

शहरात निसर्गरम्य ठिकाण म्हणून उद्यानांकडे पाहिले जाते. नयनरम्य फुले, कारंजे, मुलांची खेळणी या सर्वांचा आनंद आपल्याला बागेत मिळतो. नागपुरातला असाच एक सुंदर बगीचा म्हणजे अंबाझरी गार्डन. तलाव आणि सुंदर बगीचा हे दोन्हीही इथे पाहायला मिळते. परंतु गेल्या चार वर्षांपासून हे उद्यान बंद आहे. बांधकाम, दुरुस्ती यासाठी ते बंद असावे असा प्राथमिक अंदाज आहे. पण चार वर्ष होऊन देखील दुरुस्ती झाली नाही आणि उद्यान बंद आहे याचे सर्व नागरिकांना आश्चर्य वाटते. परगावचे लोक नागपुरात आल्यावर अंबाझरीला आवर्जून भेट देतात. तेव्हा त्यांच्या पदरी निराशाच पडते. नागपूरकरचे अंबाझरी गार्डन हे पर्यटकांसाठी मुख्य आकर्षण आहे. पण ते बंद असल्यामुळे पर्यटकांची निराशा होते. त्यामुळे हे गार्डन लवकरात लवकर सुरू व्हावे व प्रत्येकाला येथील निसर्गसौंदर्याचा आनंद लुटता यावा अशी सर्व जनसामान्यांची इच्छा आहे.

**हेमांगी देशपांडे**/७३५०८२३७४२

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# पेरणीपूर्व मशागतीची कामे पूर्ण, शेतकरी पेरणीसाठी सज्ज, पावसाची प्रतिक्षा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जून**

हिंगोली जिल्ह्यात मृग नक्षत्र लागल्यापासून दमदार पाऊस झाला नाही. काही भागात थोडाफार पाऊस झाला असून त्या पावसाच्या जोरावर खरीपाची पेरणी केली परंतु मागील आठवडाभरापासून पावसाने दडी मारल्यामुळे आता पेरणी केलेला शेतकरी पावसाच्या प्रतिक्षेत आहे तर ज्या शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व मशागतीची कामे पूर्ण केली आहेत ते शेतकरीही आता चांगल्या पावसाच्या प्रतिक्षेत आहे. मृग नक्षत्रातील पाऊस वेळेवर झाला तर पीकाचे उत्पादन चांगले येते परंतु पावसाने दडी मारल्यामुळे शेतकरी चिंतेत दिसत आहे.



जिल्ह्यात मृग नक्षत्रापूर्वी शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व मशागतीची कामे पूर्ण केली आहेत.



काही भागात पाऊस झाला होता अशा ठिकाणी खरीपाची पेरणी केली मात्र बहुतांश भागात पेरणीयोग्य पाऊस न पडल्यामुळे शेतकरी पावसाच्या प्रतिक्षेत असून मृग नक्षत्र कोरडे जाते की काय अशी भिती शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांनी उधारपाधार बी बियाणे आणि खते आणून ठेवली आहेत. हिंगोली जिल्ह्यात शेतकऱ्यांना आता दमदार पावसाची प्रतिक्षा लागली आहे.

औंढा नागनाथ तालुक्यातील काही भागांमध्ये अवकाळी पाऊस पडला. तर काही भागांत अद्यापही पावसाची प्रतीक्षाच आहे. अवकाळी पावसाने अजूनही जमिनीत ओल असून, यामुळे काही शेतकऱ्यांनी क्या ओलीवरच शेतात बियाणाची पेरणी केली आहे. तर काही शेतकरी आणखी दमदार पावसाची प्रतीक्षा करत असून शेतकऱ्यांची पेरणीसाठी तयारी पूर्ण झाली आहे. येहळेगाव, सुरेगाव, बोरजा, जडगाव, जवळा बाजार, वगरवाडी, शिरडशहापूर, हिवरखेडा, चिंचोली निळोबा, वाळकी, तळणी, जाबराजापूर, जलालदाभा, काकडदाभा, लाख, मेथा, अंजनवाडा, सिद्धेश्वर, अंजनवाडी, गोळेगाव, सुकापुर ,शिंदेवाडी, माथा, रुपुर, केळी, पारडी, आजरसोंडा, सिरला, सेदूरसना, सावरखेडा, तामटी तांडा, लक्ष्मण नाईक तांडा, सारंगवाडी, गवळेवाडी, काठोडा, नागेशवाडी आदी ग्रामीण शेत शिवारातील सगळी कामे आटोपली आहेत. मात्र, अद्याप पेरणीयोग्य पावसाचे आगमन होत नसल्याने बळीराजा चिंतेत आहे. मृग नक्षत्र लागला तरी अद्यापही पावसाला सुरवात झाली नाही. मान्सूनचा दमदार पाऊस केव्हा येणार याकडे बळीराजासह सर्वांचेच डोळे आकाशाकडे लागले आहे. दरम्यान, काही भागात पावसाच्या सरी कोसळत असल्याने जमिनीत ओलावा आहे. शेतकरी पेरणी करत असले तरी दमदार पाऊस होईपर्यंत पेरणी करू नये, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. सध्या तरी शेतकरी मोठ्या पावसाची प्रतीक्षा करत आहेत. काही शेतकऱ्यांनी विहिरीतील मुबलक पाण्यावर पिकाच्या पेरणीस प्रारंभ केला आहे.

# संत नामदेव महाराजांच्या पालखीचे औंढ्यात स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जून**

जिल्ह्यातील नर्सी नामदेव येथील श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या दिंडीचे बुधवारी (ता. १८) येथे आगमन झाले. भाविकांनी मोठ्या उत्साहाने दिंडीचे स्वागत केले.

संत नामदेव महाराज यांच्या पालखीचे पहिले अश्व रिंगण हिंगोली येथील रामलीला मैदानावर पार पडल्यानंतर ही पालखी औंढा नागनाथच्या दिशेने मार्गस्थ झाली. दिग्रस कऱ्हाळे, संतुक पिंपरी, हिवरा, येहळेगाव सोळंके या मार्गाने दि १८ जून रोजी औंढा नागनाथ नगरीमध्ये दाखल झाली. यावेळी रस्त्यात जागोजागी पालखीचे स्वागत करण्यात आले तसेच भाविकांनी पालखीचे दर्शन घेतले. श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या पालखीचे दर्शन घेऊन राजु झांझरी यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. दिंडीतील वारकऱ्याची जेवणाची व्यवस्था झांझरी कुटुंबीयांकडून करण्यात आली होती. दिंडीची न्याहरी आणि चहा पाण्याची जबाबदारी गजानन माणिकराव पाटील यांनी स्वीकारली. यावेळी'ज्ञानबा तुकाराम'च्या जयघोषाने औंढा नागनाथ नगरी दुमदुमून गेली. औंढा नागनाथ शहरातून श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांची दिंडी सकाळी दहा वाजता जवळा बाजारकडे रवाना झाली.दिंडीस पोलीस निरीक्षक जी एस राहिरे,पोलीस उपनिरीक्षक दत्ता कानगुले, पोलीस उपनिरीक्षक पंजाबराव थिटे, अफसर पठाण, जमादार सुभाष जयताडे, वशिम पठाण, किशोर पारस्कर, वसंत चव्हाण, दिनकर पोले, शेख इकबाल, ज्ञानेश्वर गोरे, अमोल चव्हाण, गजानन गिरी, माधव सूर्यवंशी, विश्वनाथ ढोणे, रमेश मस्के, विजय कालवे यांच्यासह पोलीस कर्मचारी व ट्रॅफिक पोलीस यांनी कडक बंदोबस्त दिला होता.

# वसमतमध्ये किराणा दुकानाला भीषण आग, मोठे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जून**

वसमत तालुक्यातील भोरीपगाव शिवारात मुख्य रस्त्यावर असलेल्या किराणा दुकानाला गुरूवार दि १९ रोजी सकाळी अचानक आग लागून दुकानातील सर्व साहीत्य जळून खाक झाले आहे. सुदैवाने आग लागल्याचे वेळीच लक्षात आल्यानंतर दुकानावरील घरात राहणारे कुटुंब सुखरूप बाहेर पडले. शॉर्ट सर्कीटमुळे आग लागल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, वसमत शहरापासून दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या भोरीपगाव शिवारात मुख्य रस्त्यावर आत्मारास ससे यांचे किराणा दुकान आहे. या किराणा दुकानाच्या बाजूलाच इतर दोन दुकाने असून या दुकानावर बांधलेल्या धरात ससे कुटुंबातील पाच सदस्य राहतात.

बुधवार दि १८ जून रोजी रात्रीच्या सुमारास आत्माराम ससे हे दुकान बंद करून घरात गेले होते. त्यानंतर आज सकाळी दुकानाला आग लागली. या आगीमध्ये दुकानातील सर्व किराणा सामान जळून खाक झाले. दुकानामध्ये तेल असल्यामुळे आग अधिकच भडकली. या आगीमुळे घरातील जमीन तापू लागली होती. सदर प्रकार पाहण्यासाठी ससे कुटुंबातील सदस्य खाली उतरले असता दुकानाला आग लागल्याचे लक्षात आले. त्यांनी तातडीने घरातील सदस्यांना माहीती देऊन घराच्या पाठीमागच्या बाजूने असलेल्या पायऱ्यावरून बाहेर काढले. या आगीची माहीती मिळताच उपसरपंच अनिल आगलावे, गोरख पाटील यांच्यासह गावकऱ्यांनी धटनास्थळी धाव घेतली.

गावकऱ्यांनी तातडीने वसमत पालिकेच्या अग्नीशमन दलास संपर्क साधून दलाला पाचारण केले. अग्नीशमन दलाच्या पथकाने मोठ्या प्रयत्नानंतर दीड तासानंतर आग आटोक्यात आणली. मात्र तोपर्यंत दुकानाती सर्व साहीत्य जळून खाक झाले होते. या आगीमध्ये ससे यांचे मोठे नुकसान झाले असून शॉर्ट सर्कीटमुळे ही आग लागली असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. वसमत पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी भेट दिल्याचे समजते.



**हिंगोली– वसमत येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचा कार्यकर्ता मेळावा मालेगाव रोडवरील वर्धमान भवन येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर, जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण यांच्यासह जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीबाबत चर्चा करण्यात आली. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### सुखदेवानंद विद्यालयाचे वैद्यकीय परीक्षेत यश



हिंगोली– सुखदेवानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय भांडेगाव येथील इयत्ता बारावी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी २०२४ ..२५ या शैक्षणिक वर्षांमध्ये वैद्यकीय क्षेत्रातील नीट या पूर्व परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले. यामध्ये विद्यालयाचा विद्यार्थी कार्तिक भगवान भेंडेकर या विद्यार्थ्यांनी ७२० पैकी ६०४ गुण प्राप्त केलेले आहेत. या विद्यार्थ्यांचा ऑल इंडिया रँक ११११२ आहे. हा विद्यार्थी ओबीसी या प्रवर्गामधून ऑल इंडिया रँक ३३९ या क्रमांकावर आहे. या विद्यालयातील दुसरा विद्यार्थी शिवम रामकिसन मुटकुळे या विद्यार्थ्याला ७२० पैकी ५९१ गुण मिळालेले आहेत. सदरील विद्यार्थ्यांचा ऑल इंडिया रँक ई डब्ल्यू एस प्रवर्गांमधून १५४ असून, ऑल इंडिया रँक २०८२ आहे. सदरील विद्यार्थ्यांचे संस्थेचे सरचिटणीस श्री उत्तमराव जगताप सहसरचिटणीस श्री ज्ञानदेवराव जगताप तसेच संचालक श्री संतोषराव जगताप विद्यालयाचे प्राचार्य श्री वैद्य तसेच प्रशासकीय अधिकारी श्री प्रकाश निरगुडे, पर्यवेक्षक ढोबळे तसेच विद्यालयाच्या सर्व शिक्षक व प्राध्यापकांनी त्याचे त्यांच्या या यशाबद्दल हार्दिक हार्दिक अभिनंदन केले.

### क्रिडा प्रबोधनीमध्ये चाचणीद्वारे प्रवेश

हिंगोली– शिवछत्रपती क्रीडापीठ, म्हाळुंगे, बालेवाडी पुणे अंतर्गत महाराष्ट्र राज्यात विविध क्रीडा प्रबोधिनीमध्ये रिक्त जागांवर सन २०२५–२६ करिता सरळ प्रवेश ५० टक्के व कौशल्य चाचणीद्वारे ५० टक्के प्रक्रियेंतर्गत खेळाडून प्रवेश देण्यात येणार आहे. क्रीडा प्रबोधिनीमध्ये १७ क्रीडा प्रकारात प्रशिक्षण देण्यात येते. तथापि, व्हॉलीबॉल करिता १३, सायकलींग–१३, जलतरण–७, फुटबॉल–७, ज्युदो–५, जिमनॅस्टीक्स–९ याप्रमाणे खेळाडूंच्या जागा रिक्त असल्याने याच खेळातील खेळाडूनी अर्ज करावेत. जिल्हास्तरावर क्रीडा प्रबोधिनी विभाग चाचणीसाठी सहभागी होणाऱ्या खेळाडूंची नावे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, हिंगोली येथे नोंदणी करावी. प्रवेशासाठी खेळाडूचे नाव, जिल्हा, खेळ प्रकार, जन्म दिनांक, वय व क्रीडा कामगिरी प्रमाणपत्र याबाबत माहिती संकलित करुन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडे दि. २४ जून, २०२५ पर्यंत अर्ज सादर करुन लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश्वर मारावार यांनी केले आहे.

### ५३ वाहन चालकांविरूध्द कारवाई

हिंगोली– अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५३ वाहन चालकांविरूध्द जिल्ह्यात विविध ठिकाणी पोलिसांनी कारवाई करून त्यांच्याकडून ४३९० रूपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

# डॉ. पंकज पोले यांचा आ. नवघरेंच्याहस्ते सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जून**

औंढा तालुक्यातील जोडपिंपरी येथील डॉ पंकज पंजाबराव पोले यांना गावातील पहिले डॉक्टर होण्याचा मान मिळाला. त्याबद्दल गावकऱ्यांच्यावतीने त्यांचा आई वडील यांच्यासह नागरी सत्कार करण्यात आला. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे वसमत विधानसभेचे आमदार राजू नवघरे यांनी देखील डॉ. पंकज पोले यांचा औंढा येथील शासकीय विश्रामगृहात सत्कार केला. यावेळी उपस्थित माजी जि प सदस्य संजय दराडे, बाबासाहेब गायकवाड, बाबुराव राखोडे, आदित्य आहेर, राजेंद्र सांगळे, पांडुरंग नागरे, डॉ हबीब शेख, भुजंगराव पोले, पंजाबराव पोले, शेख मोलाभाई, अंकुश मस्के, रावसाहेब ठोंबरे, पांडुरंग पुंडगे, सखाराम पोले प्रदीप दाभाडे विलास पवार यांच्यासह गावातील नागरिक उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शिबीराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जून**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त येथील संत नामदेव पोलीस कवायत मैदानावर जिल्हा प्रशासन, क्रीडा विभाग, योग विद्याधाम, पतंजली योग समिती, जिल्हा योगा संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २१ जून, २०२५ रोजी सकाळी ६ ते ७ वाजे दरम्यान योग शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या योग शिबिराचा सर्व लोकप्रतिनिधी, सर्व अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व जनतेनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी केले आहे.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमाची पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हास्तर समितीची बैठक अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश्वर मारावार, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस, शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रसकर, क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर, योग शिक्षक रत्नाकर महाजन, विठ्ठल सोळंके, क्रीडा शिक्षक आर. एन. गंगावणे, जिल्हा योग संघटनेच्या प्रतिनिधी ज्योती शेळके, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. सचिन हाटकर, प्रवीण पांडे, विविध संघटनेचे पदाधिकारी, अधिकारी उपस्थित होते.

पंतप्रधान महोदयांनी २०१४ च्या राष्ट्रीय महासभेत दिनांक २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून दरवर्षी साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला आहे. त्याअनुषंगाने दि. २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात येतो. हा दिवस जगभरात साजरा करण्यात येतो. पाच हजार वर्षाहून अधिक परंपरा असणारी योगविद्या ही भारताने जगाला दिलेली देणगी आहे. व्यक्तीच्या शारीरिक आणि आत्मिक विकासासाठी योगविद्या सहाय्यभूत आहे. तसेच केंद्र शासनाने दि. २१ जून, २०२५ हा दिवस ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून आयोजित करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

योगा दिनाच्या निमित्ताने जगभरात योगासनाची परंपरा स्वीकारणे व ती करणे ही आपल्या देशासाठी अभिमानाची बाब आहे. कारण योग हा आपल्या भारताच्या सांस्कृतिक वारसाचा अविभाज्य भाग आहे. दि. २१ जून, २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करुन जनतेमध्ये आरोग्य आणि भावनिक निरोगीपणा सुधारणा, एक लक्षणीय मालमत्ता म्हणून त्यांचे महत्व आणि योगदान यावर प्रकाश टाकून योगाचा सराव सुरु ठेवण्यासाठी लोकांना प्रेरणा देणे तसेच योगासने नागरिकांचा एक अविभाज्य भाग बनविणे आणि त्याद्वारे सर्वांसाठी आरोग्यदायी जीवन जगणे हे योग दिनाद्वारे सरकारचे उद्दिष्ट असल्याचे सांगून या योग दिनासाठी जिल्ह्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी, नागरिक, योग साधक, खेळाडू, विद्यार्थी यांनी उपस्थित राहून योगाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी यावेळी केले आहे. यावेळी बोलताना अपर जिल्हाधिकारी श्री. कांबळे यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित योग शिबिरासाठी सर्वांनी समन्वय ठेवून आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. तसेच विद्यार्थ्यांची रॅली काढून घोषवाक्याच्या माध्यमातून योग दिनाचे महत्व सांगून योग शिबिरासाठी जास्तीत जास्त नागरिक उपस्थित राहण्यासाठी आवाहन करावेत, अशा सूचना केल्या.

# सुनील देवडा, डॉ. प्रकाश अंभोरे यांना मराठवाडा भूषण पुरस्कार

**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, १९ जून**





महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्यावतीने शिक्षण क्षेत्रात मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे तर सहकार क्षेत्रात ओमप्रकाश देवडा पिपल्स को ऑप बँकेचे उपाध्यक्ष सुनील देवडा यांना मराठवाडा भूषण २०२५ पुरस्काराने १५ जून रविवारी छत्रपती संभाजी नगर येथील संत एकनाथ रंगमंदिरात झालेल्या रौप्य महोत्सव अधिवेशनात राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी प.पु.१००८महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरी महाराज, महाराष्ट्र पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे, प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत, एबीपी माझाच्या संपादिका सरिता कौशिक, पत्रकार अश्विनी डोके, राज्य संपर्कप्रमुख वैभव स्वामी, हिंगोली जिल्हा अध्यक्ष गजानन मगर यांची प्रमुख उपस्थिती होती. ग्रामीण भागासह शहरी भागातील विद्यार्थ्यांना साहित्य, कला, क्रीडा आणि विज्ञान अशा सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणाऱ्या शिक्षणाची व्यवस्था त्यांनी करून दिली आहे. मराठी माध्यमा सोबतच सेमी इंग्लिश व सीबीएसई चा संदर्भ घेत विद्यार्थ्यांना अध्यापन केले जाते. यामुळे मुलांचा पुढील शिक्षणाचा पाया पक्का होतो. ग्रामीण व शहरी भागातील आर्थिक दृष्ट्या मागास पालकांच्या मुलांकरिता या माध्यमातून प्रगतीचा मार्ग खुला झालेला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने हा पुरस्कार प्रदान केला आहे. या पुरस्काराबद्दल भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. मदन मार्डीकर, सचिव ॲड.गयबाराव नाईक, तसेच संचालक ॲड केशवराव शिरसाट, पंडितराव बांगर व सर्व संचालक यांनी अभिनंदन केले. तसेच मुख्याध्यापक संघाचे सचिव विठ्ठल सोळंके, प्राचार्य बाबासाहेब इंगोले, संजय टाकळगव्हानकर, के. डी. महाजन, प्राचार्य विठ्ठल मुटकुळे ओम तांबिले, डॉ. सूरज ठाकरे, डॉ.गणेश अंभोरे, डॉ. उत्तमराव वानखेडे, परभणी, भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे संपूर्ण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी डॉ. प्रकाश अंभोरे यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

ओमप्रकाश देवडा पिपल्स को ऑपरेटीव्ह बँकेचे उपाध्यक्ष सुनील देवडा यांनाही सहकार क्षेत्रात मराठवाडा भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी त्यांच्या सुविद्य पत्नी शिलादेवी देवडा यादेखील उपस्थित होत्या. त्यांना मिळालेल्या पुरस्कारबद्दल बँकेचे सर्व संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी यांच्यासह औद्योगिक, राजकीय, सांस्कृतिक तसेच सर्व स्तरातून सुनील देवडा यांचे अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या जात आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मोठ्या राड्यानंतर नूतन वसाहत मधील मोकळ्या जागेवरील अतिक्रमण नगरपालिकेने हटवले

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना शहरातील नूतन वसाहत भागात महापालिकेच्या मोकळ्या जागेवर करण्यात आलेलं अतिक्रमण अखेर हटवण्यात आलं आहे.आज दि.१९ गुरुवार रोजी दुपारी ३ वा. च्या सुमारा–पासून पोलीस बंदोबस्तात महापालिकेचं अतिक्रमण हटाव पथक, आणि पोलिसांनी ही संयुक्त कारवाई केली आहे.मात्र हे अतिक्रमण हटवताना मोठा राडा झाला.ज्यावेळी महापालिकेचं पथक अतिक्रमण हटवण्यासाठी नूतन वसाहत भागात गेलं त्यावेळी अतिक्रमण धारकांनी मोकळ्या जागेच्या भोवती वाल कंपाऊंड केलेलं होत. ते वाल कंपाउंड पाडण्यास अतिक्रमण धारकांनी विरोध केला.त्यांनतर महापालिका पथकाने



पोलिसांना बोलावून घेतलं यावेळी पो–लीस आणि अतिक्रमण धारक यांच्यात देखील बाचाबाची झाली.अखेर पोलीस आल्यानंतर महापालिकेच्या पथकाने जेसीबी पुढे चालवला आणि अतिक्रमण तोडण्यास सुरुवात केली .यावेळी हुज्जत आणि हाणामारीवर आलेल्या ४ अतिक्रमण धारकांना पोलिसांनी ताब्यात घेतलं.दरम्यान अतिक्रमण हटवण्यात आलं असून अतिक्रमणाची तक्रार करणाऱ्या आणि अतिक्रमण धारकांमध्ये मारहाण झाली.त्यानंतर कदीम जालना

## अतिक्रमण हटाव पथक,पोलीस आणि अतिक्रमण धारकांमध्ये बाचाबाची; ४ जणांना पोलिसांनी घेतलं ताब्यात

पोलिसांनी ४ जणांना ताब्यात घेतलं .याप्रकरणी कदीम जालना पोलीस पुढील कारवाई करत आहे.

सदरील जागेचा वाद न्यायालयामध्ये चालू असून महापालिकेने आपणास अगोदर नोटीस द्यायला हवी होती. परंतु नोटीस न देता कंपाउंड वॉल पाडण्यात येत असल्याचा आरोप अतिक्रमण धारकाने केला. तर महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी अतिक्रमण धारकास सांगितले की माननीय न्यायालयाचे कोणते पेपर आपल्याकडे आहे ते दाखवा सदरील जागा ही महानगरपालिकेची असून आपण त्यावर बेकायदेशीर कब्जा केलेला असल्याचे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे होते. या बाचाबाची मध्ये तब्बल चार तास उलटले आणि या चार तासांमध्ये बराच गोंधळ आणि राडा झाला. शेवटी पोलिसांनी अतिक्रमण धारकांना ताब्यात घेऊन महापालिकेने जेसीबीच्या साह्याने संपूर्ण वॉल कंपाऊंड जमीनदोस्त केले.

# रोड रॉबरी करणारे दोघे पोलिसांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील गोंदी पो–लीसांकडून राष्ट्रीय महामार्ग ५२ वर रॉबरी करणारे दोन आरोपी गजाआड करण्यात आलेले आसून
पोलीस ठाणे गोंदी हद्दीत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वरती ट्रक चालक लालसिंग अहीरवार हा कंपनीची ट्रक क्र.एम.एच२० डि.ई.४१०६ यात कंपनीचे सामान घेऊन बिदर राज्य कर्नाटक येथे घेऊन जात असतांना महाकाळा येथे दोन अज्ञात व्यक्तींनी हात करून थांबण्याचा इशारा केला. ट्रक चालकाने ट्रक थांबविल्यानंतर त्या व्यक्तींनी त्याच्या डोळ्यात काहीतरी टाकून त्यास ट्रक मधून खाली ओढत त्यास मारहाण केली ट्रक हा मालासह पळवून गेऊन गेले गोंदी पोलीसांना यांची माहीती मिळताच गोंदी पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जात ट्रक चालक लालसिंग अहीरवार यास सरकारी दव–खाना शहागड येथे औषध उप–चारा करीता दाखल केले त्यानंतर ट्रक चोरून घेऊन जाणारा बंडू ऊर्फ रामेश्वर भिमराव वाघमारे रा. महाकाळा व समाधान बबन बेंद्रे रा. अंकूशनगर यांना ताब्यात घेउन त्यांच्याकडून गुन्ह्यातील गेला

## ३६ लाख ३३ हजार ११५ रुपयांचा मुद्देमाल जब्त

माल ट्रक व कंपनीचा माल असे एकूण ३६,३३,११५ रूचा त्यांच्याकडून हस्तगत करण्यात आलेला आहे. त्यांच्या विरूध्द पोलीस ठाणे गोंदी येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सदर आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. या प्रकरणी मा.अबंड न्यायालया समोर आरोपींना हजर करण्यात आ–लेले असतांना आरोपीस पोलीस कोठडी रवानगी झालेली असून हि कामगिरी पोलीस अधिक्षक, अजयकुमार बंसल, अप्पर पो–लीस अधिक्षक आयूष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल खांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक, आशिष खांडेकर, पो–लीस उपनिरीक्षक किरण हावले, पोलिस जमादार रामदास केंद्रे, पो.का शाकेर सिध्दीकी, चालक वैद्य यांनी केलेली आसून असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किरण हावले हे करीत आहेत.

# संक्षिप्त



## संत श्री. मुक्ताई पालखीचे आगमन शहागडकरांनी घेतले पालखीचे दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अबंड तालुक्यातील शहागड येथे गुरुवारी सकाळी संत श्री. मुक्ताबाई पालखीचे आगमन सकाळी शहागडला दाहा वाजता झाले. वडीग्रोद्री येथे मुक्ताबाई पालखी मुक्कामी पालखी मुक्कामी होती. राष्ट्रीय महामार्ग ५२ वरण पालखीचे शहागडला आगमन होताच गावकऱ्यांनी सडा–सारवण रांगोळी फुलांचा वर्ष पालखीवर करण्यात आला, वारकऱ्यांच्या सोबत होऊन गाव वेशी जवळील हनुमान मंदिर वारकऱ्यांसाठी दाळ– भट्टीचा कार्यक्रम ठेवण्यात आलेला होता.संत एकनाथ चौक पैठण फाटा येथे हि नागरिकांनी चहा नाश्ता बिस्किट–केळीची व्यवस्था केलेली होती. दुपारी बारा वाजता शहा गड होऊन जालना जिल्ह्याचे हद्द सोडत पालखीने बीड जिल्हा गेवराई कडे प्रस्थान केलेले असून गेवराई येथे पालखी मुक्कामी राहणार आहे. अबंड–घनसावंगी–तिर्थपुरी शहागड पोलिससह हायवे ट्राफिक पोलिसांचा मोठा बंदोबस्त या ठिकाणी तैनात होता. उपविभागीय पोलिस अधिकारी विशाल खांबे,गोंदी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर, उपनिरीक्षक किरण हावले, जमादार रामदास केंद्रे, फुलचंद हाजारे,गोपाल दिलवाले, सोनवणे गुरुजी, गोपीनये शाखेचे सचिन साळवे, पो.का.शाकेर सिद्दीकी,दिपक भोजने,काळे,शेख, हिवाळे,बघाटे,राठोड सह महिला पोलिस कर्मचारी मोठ्या बंदोबस्त तैनात होता.

## भोकरदन येथे शिवसेना वर्धापन दिनानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

शिवसेना पक्षाच्या ५९ व्या वर्धापनदिनानिमित्त भोकरदन येथील जिल्हा प्राथमिक शाळा नंदुबाई नगर नवीन येथील मुस्लिम विद्यार्थ्यांना जिल्हा उपप्रमुख श्री.भुषण भैय्या शर्मा यांच्या नेतृत्व–ाखाली वही, पेन व बिस्किट पुड्यांचे वाटप करण्यात आले.
या कार्यक्रमाला शिवसेना जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्ते , शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी संबोधित करताना भुषण भैय्या यांनी सांगितले की, *शिक्षण हे समाजऐक्याचा पाया आहे. सर्व समुदायांतील मुलांना सहकार्याने शैक्षणिक सुविधा पुरवणे, हा शिवसेनेच्या 'शिवभूषण शिकवण' आणि अभियानाचा भाग आहे.
सदरील कार्यक्रमाच्या अंतर्गत ८० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना शैक्षणिक किट व नाश्त्याचे पॅकेट दिले गेले. शाळेच्या मुख्याध्यापकांनी या उपक्रमाला सामाजिक समरसतेचे प्रतीक म्हणून कौतुक केले. दरम्यान शिवसेना पक्षाने वर्धापनदिनी सामाजिक कार्यास प्राधान्य देत शाळा–मदतीचा हा कार्यक्रम राबविला. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण पहावयास मिळाले, यावेळी झालेल्या कार्यक्रमास जिल्हा उपप्रमुख भुषण भैय्या शर्मा,तालुकाप्रमुख नानासाहेब वानखेडे,तालुकाप्रमुख विशाल गाढे,गणेश इंगळे, सुखदेव रावळकर, जब्बार मामू,पैठणकर, व मुख्याध्यापक रामेश्वर शर्मा संदीप शर्मा, पूनम चराठे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते,

# जाफ्राबाद तालुक्यातील शिवसेनेच्या वतिने वर्धापन दिनानिमित्त फळ वाटप

**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद/प्रतिनिधी**

शिव सेना पक्ष च्या ५९ वर्धापन दिनानिमित्त जाफ्राबाद तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना शिव सेना उपजिल्हाप्रमुख भुषण भैया तालुकाप्रमुख दत्ता पाटील बंगाळे युव सेना तालुकाप्रमुख बालाजी पाटील पवार किसान सेना तालुकाप्रमुख सुभाष पाटील भोपळे शहर प्रमुख फारुख भैया यांच्या हस्ते रुग्णांना फळ वाटप करण्यात आली.शिव



सेना पक्षाची स्थापना झाल्यापासून शिवसेनेने नेहमीच कार्य करता हाच केंद्र बिंदु माणुन नेहमीच समाज उपयोगी गोरगरीबांची कामे केली आहे असे प्रतिपादन भुषण भैया यांनी केले यावेळी राजु परिहार मा.क. संचालक जाफ्राबाद शहर युवसेना प्रमुख शहर राजु भैया रमणे युवासेना तालुका उपप्रमुख उमेश भाऊ गायकवाड परमेश्वर मोरे गोपाल कुहीरे यशवंत गोफणे प्रदीप जाधव कैलास राऊत संतोष भोपळे.गजानन बनकर गजानन बंगाळे व ईतर शिव सैनिक उपस्थित होते

# दोन वर्षांपूर्वीचे गारपीटग्रस्त शेतकरी अनुदानापासुन वंचित!

## पावसाने दांडी मारल्यामुळे शेतकरी दुबार पेरणीच्या तयारीत



पारध येथील ७८ शेतकऱ्यांचे व्हीके नंबर जनरेट झाले आहे, येणाऱ्या पंधरा–वीस दिवसांमध्ये शेतकऱ्यांना अनुदान हे त्यांच्या खात्यात जमा होईल व राहिलेले काही शेतकरी यांचा सुद्धा लवकरच व्हीके नंबर जनरेट करून अनुदान जमा करण्यात येईल.**–अमोल पाटील (नायब तहसीलदार )**

पारध येथील २०२३ –२४ मध्ये गारपीट झाली होती त्यामधल्या काही शेतकऱ्यांना गारपीटीचा अनुदानाचा मोबदला मिळाला पण, राहिलेली शेतकरी अजून सुद्धा अनुदानापासून वंचित आहे, एन पेरणीच्या तोंडावर शेतकऱ्यांना मोबदला मिळायला हवा जर येत्या पंधरा दिवसात शेतकऱ्यांना अनुदान मिळाले नाही तर तहसील कार्यालय येथे उपोषण करण्यात येईल.
**–सागर देशमुख (सामाजिक कार्यकर्ते)**

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील पारध येथील गारपीटग्रस्त शेतकरी अनुदानापासून वंचित राहिले असून, त्यांनी आतापर्यंत तीन वेळेस कागदपत्र जमा केले आहे. पारध येथील शेतकऱ्यांना गारपिटीने चांगले झोडपल्याने उभ्या पिकांचे अतोनात नुकसान झाले होते . अधिकाऱ्यांच्या कामचुकार प्रवृत्तीने काही शेतकऱ्यांवर अन्याय झाला आहे. गारपिटीने झालेल्या नुकसानीचा मोबदला मिळावा म्हणून शेतकऱ्यांनी तलाठी,ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांना आतापर्यंत तीन वेळेस कागदपत्र देऊन सुद्धा जे वंचित शेतकरी आहे त्यांना अजून सुद्धा गारपिटीचे अनुदान मिळाले नाही. परंतु कोणत्याच प्रकारची दखल न घेतल्या गेल्यामुळे आज परत एकदा तहसीलदार कार्यलय येथे नायब तहसीलदार अमोल पाटील यांना निवेदन देण्यात आले.यावेळी निवेदन देताना शेतकरी सागर देशमुख, चेतन देशमुख, सागर श्रीवास्तव उपस्थित होते

# शेकडो वर्षांची वारी परंपरा कायम राहील

## वारकऱ्यांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याकरीता मुख्यमंत्री वारकरी महामंडळ -आ.लोणीकर



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

दुर्लभ साधनेने साधारण मनुष्यही देवत्व प्राप्त करू शकतो, हे वारीतून कळते. वारी पायी केली तर शारीरिक तप घडते, सर्व पाप नष्ट होतात म्हणूनच अत्यंत मनोभावे हे आषाढी एकादशीची वारी केली जाते. जोपर्यंत चंद्र सूर्य आहेत तोपर्यंत संत परंपरेने सुरू केलेली शेकडो वर्षांची ही वारी परंपरा यापुढे अशीच कायम राहील. केवळ विठ्ठल दर्शनाची आस मनामध्ये ठेवून 'पंढरीचा वास, चंद्रभागेस्नान, आणिक दर्शन विठोबाचे' या इच्छेपोटी वारकरी वारी चुकवत नाहीत, अशी वारकरी संप्रदायाची धारणा आहे. त्यामुळेच आषाढी वारी ही प्रत्येक वारकरी महिलापुरुषांच्या मनात आदराचे आणि श्रद्धेचे स्थान बनली आहे. असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.
मंठा तालुक्यातील श्रीक्षेत्र निळकंठेश्वर येथून पंढरपूर कडे प्रस्थान करणाऱ्या दिंडीमध्ये पायी चालत माजीमंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर सहभागी झाले. यावेळी १००८ महामंडलेश्वर स्वामी श्रीकृष्ण चैतन्यजी महाराज, महंत नर्मदापुरीजी महाराज, महंत परमानंद पुरीजी, महाराज महंत रमणचैतन्य पुरीजी महाराज, महंत विठ्ठलगिरिजी महाराज महंत स्वरूपानंद सरस्वती महाराज, महंत प्रणवचैतन्य पुरीजी महाराज आचार्य स्वामी जनार्दन जी शास्त्री हभप जगन्नाथ महाराज गनगे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की, राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा असणारा शेगाव ते पंढरपूर २ हजार कोटी रुपयांचा दिंडी मार्ग वारकऱ्यांसाठी निर्माण करण्यात मला हातभार लावता आला याचा मला सार्थ अभिमान आहे. परतुर विधानसभा मतदारसंघात २०० गावांमध्ये ३०० सभामंडप गावातील मंदिरांसमोर उभारण्याचे भाग्य मला लाभलं आहे. आणि अजूनही ज्या गावात नव्याने मंदिर उभारले जाईल त्या ठिकाणी सभामंडप देण्यासाठी मी लोकप्रतिनिधी म्हणून कटिबद्ध आहे. महाराष्ट्र राज्यातील किर्तनकार व वारकऱ्यांना सोयी–सुविधा पुरविण्याकरिता व कल्याणकारी योजना राबविण्याकरीता तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व तत्कालीनउपमुख्यमंत्री आणि विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री वारकरी महामंडळ स्थापन करण्यास दि. १४ जुलै २०२४ च्या शासन निर्णयाद्वारे मान्यता प्रदान करण्यात आली आहे. मुख्यमंत्री वारकरी महामंडळाचे मुख्यालय पंढरपूर येथे राहणार असून महामंडळावर कार्यरत किंवा सेवानिवृत्त भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांची व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.महामंडळासाठी भाग भांडवल म्हणून ५० कोटी रुपयांची तरतूद देखील करण्यात आली आहे. आषाढी एकादशीला पंढरपुरला आळंदीहून ज्ञानेश्वरांची, देहूवरून तुकारामांची, त्र्यंबकेश्वरवरून निवृत्तीनाथांची, पैठणहून एकनाथांची, नरसी नामदेव येथून संत नामदेवांची तर उत्तर भारतातून कबिराची पालखी पंढरपुरात येते. आषाढीच्या वारीला सुगीची उपमा दिली जाते. शेतकरी आपल्या शेतात पेरणी करतात आणि मग वारीसाठी निघतात. वारी करुन विठोबाचे दर्शन घेऊन घरी जाईपर्यंत त्यांच्या शेतात जोमाने झालेली वाढ बघून शेतकऱ्याला शक्ती मिळते. विठ्ठलाच्या भक्तीसाठी आस–सलेला प्रत्येक जण या वारीत सहभागी होतो तर वारीला जाऊ शकत नाहीत ते उपवास करून आपल्या विठ्ठलाची भक्ती करतात. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले. आषाढी एकादशीच्या पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या दिंड्यांना प्रतिदिंडी २० हजार रुपये अनुदान देण्याचा निर्णय राज्य सरकारने नुकताच घेतला आहे. त्यानंतर आता पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना टोलमाफी देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. आषाढी वारीच्या निमित्ताने १८ जून ते १० जुलैदरम्यान ही टोलमाफी असणार आहे. याबाबत सोमवारी शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. अशी माहिती देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी दिली. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष नितीन राठोड, भाऊसाहेब गोरे, संपत टकले, नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे, पंजाबराव बोराडे, राजेश मोरे, अजय अवचार, विलास घोडके, आनंद जाधव, रामकिसन बोडखे, नाथराव काकडे, कैलास चव्हाण, मनोज देशमुख, सोनाजी जाधव, नंदकुमार टकले, संजय गायकवाड, परमेश्वर शिंदे, सोप–ानराव वायाळ, दत्तराव खराबे, रमेश वायाळ, श्रीदेव खरात, जगदीश जाधव, नितीन चाटे, गौतम खरात, सोपान घोडके, विष्णू गायकवाड, सुंदरराव काकडे, राजेश काकडे, एकनाथ काकडे, दत्तराव दहातोंडे, भगवानराव देशमुख यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# जेष्ठ नागरीक एकनाथराव बांगर यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**अंबड प्रतिनिधी**



नालेवाडी ता.अंबड येथील जेष्ठ नागरिक एकनाथराव वामनराव बांगर ( वय ८५) यांचे बुधवार ता.१८ रोजी दुपारी २:५० वाजता दिर्घ आजारपणामुळे आणि वार्धक्याने निधन झाले आहे त्यांच्यावर गुरूवारी सकाळी ९:३० वाजता मौजे नालेवाडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आली
त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुल ,तीन मुली, सुना,नातवंड,असा मोठा परीवार आहे. जिल्हा व सत्र न्यायालय मुंबई येथील न्यायाधीश श्री.शशिकांत बांगर व सोयायटी नालेवाडी चे माजी चेअरमन श्री. श्रीकांत बांगर,यांचे ते वडील होत.

# शिवसेनेचा ५९ व्या वर्धापन दिन विविध उपक्रमांनी साजरा

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

याप्रसंगी शहरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली व सफाई कामगार महिला, पुरुष मंडळी यांचे माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सत्कार केले तसेच या प्रसंगी शिवसेनेचे जुने शिवसैनिक शिवा भाऊ श्रीमाळी यांचा विशेष सत्कार करण्यात आला.



या वेळी उपस्थित असलेल्या शिवसैनिकांना शिव–सेनेच्या आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. या वेळी उपस्थित शिवसैनिकांनी आपल्या परिसरातील सामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण काम करत रहावे व शिवसेना पक्ष ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हे आपल्याला वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचे शिकवण आहे. या प्रसंगी शिवसेना शहरप्रमुख विष्णु भाऊ पाचफुले, मेघराज चौधरी, विष्णु भाऊ वाघमारे, जेष्ठ शिवसेनिक शिवाभाऊ श्रीमाळी, संजय गायकवाड, नरेश खुदभैये, पांडुरंग राऊत, श्रीराम मामा लगडे, सुधाकर क्षीरसीगर, शंकर सोनवणे, मनोज थोरात, नागेश क्षिरसागर, विकी वाघमारे, संजय गोंटे, अर्जुन भगत, निलेश कुरील, संतोष चौंडीये, गोंविद वाघमारे, अभिजीत देशमाने, रामेक्ष्वर राऊत, दर्शन कोटल, प्रेम टेटवार, पियुष बाबर, चैतन शेटे, रमेश रोडीये व शिवसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# नांदेड आणि बिलोली येथे डाक भवन उभारणीच्या प्रस्तावासाठी पाठपुरावा

## खा.डॉ. अजित गोपछडे यांची केंद्रीय मंत्री सिंधिया यांच्या सोबत सकारात्मक चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.१९ जून -**

नांदेड आणि जिल्ह्यातील बिलोली येथे अत्याधुनिक असे डाक भवन उभारावे यासाठी केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांचे कडे फेब्रुवारी २०२५ मध्ये संसद अधिवेशन काळात मागणी केली होती. त्याला अनुसरुन मंत्री महोदयांनी तात्काळ प्रस्ताव सादर करणे बाबत संबंधित विभागास सुचना केल्या होत्या.

जिल्हास्तरावरून केंद्राकडे प्रस्ताव सादर करणेची प्रक्रिया सुरु असुन त्याला गती देऊन मंजुरी द्यावी आणि आर्थिक तरतूद करावी यासाठी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्याकडे पाठपुरावा सुरू ठेवला आहे. दिल्लीत काल ना .ज्योतिरादित्य सिंधिया यांची खा. गोपछडे यांनी भेट घेऊन डाक भवन उभारणीसाठी स्मरणपत्र दिले.

यानुषंगाने खा.डॉ.गोपछडे यांनी सांगितले की, नांदेड जिल्ह्यातील डाक सेवा अत्यंत महत्त्वपूर्ण असून, सध्या अस्तित्वात असलेली नांदेड डाक विभागाची कार्यालये



ब्रिटीश कालीन जुन्या व अपुऱ्या इमारतींमध्ये कार्यरत आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांना तसेच नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.त्यामुळे नवीन विभागीय मुख्य डाक भवन नांदेड शहराच्या मध्यवर्ती भागात उभारल्यास जिल्ह्यातील सर्व तालुक्यांना अधिक चांगली सेवा पुरवणे शक्य होईल. तांत्रिक सुविधा, आधुनिक यंत्रणा आणि नागरिकांना मिळणारी सेवा यामध्ये लक्षणीय सुधारणा होईल.

बिलोली हा नांदेड जिल्ह्यातील अत्यंत जुना आणि विस्ताराने मोठा तालुका आहे परंतु या तालुक्याचा म्हणावा तसा विकास झालेला नव्हता पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्वात बिलोली तालुक्याच्या विकासाच्या अनुषंगाने सकारात्मक प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे बिलोली तालुक्याला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तालुकास्थानी प्रस्तावित 'स्वतंत्र डाक भवन' हे ग्रामीण भागातील नागरिकांसाठी सुलभ, जलद डाक सेवा अधिक विश्वसनीय बनवणे अत्यंत आवश्यक आहे. सद्यस्थितीत बिलोलीचे डाक कार्यालय अपुऱ्या सुविधांमध्ये कार्यरत असून, नवीन इमारतीमुळे कर्मचाऱ्यांचे काम अधिक कार्यक्षम होईल आणि नागरिकांनाही चांगल्या सुविधा मिळतील.यासाठी येथे अत्याधुनिक डाक भवन उभारावे अशी मागणी करण्यात आली होती.यासाठी आवश्यक तो प्रस्ताव केंद्र शासनाकडे यापूर्वीच पाठविण्यात आला आहे. आता या कामाला मंजुरी मिळवून द्यावी आणि काम प्रत्यक्ष सुरू करावे यासाठी खा. डॉ. गोपछडे यांनी ना. सिंधिया यांची दिल्लीत भेट घेतली. केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी या मागण्यांना सकारात्मक सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे अशी माहिती खा. डॉ. गोपछडे यांनी दिली आहे.

### संक्षिप्त वृत्त




#### जि.प. विष्णुपुरी येथील नवप्रवेशित बालकांचे कुलगुरूंच्या हस्ते पुष्प देऊन स्वागत

**नवीन नांदेड-** शैक्षणिक वर्षाची सुरुवात दि. १६ जुन पासून संपूर्ण महाराष्ट्रात झाली जि. प. हा. विष्णुपुरी येथे दरवर्षीप्रमाणे विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून नवीन प्रवेश घेणाऱ्या बालकांचे स्वागत केले. जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी येथे यावर्षी पहिली मध्ये प्रवेश घेणाऱ्या बालकांचे स्वागत हे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांचे कुलगुरू मनोहरजी चासकर साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच सर्व शाळेतील विद्यार्थ्यांचे स्वागत विविध प्राणी व कार्टूनच्या वेशभूषेतील माध्यमातून करण्यात आले. बालकांच्या प्रवेशासाठी आठ प्रकारचे टेबल मांडणी केली. प्रथम बालकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तसेच त्या पुढील टेबलवर प्रवेश फॉर्म भरून घेणे विद्यार्थी माहिती पत्रिका भरून घेणे बालकासाठी मनोरंजनात्मक खेळ ,आरोग्य तपासणी ,हाताच्या पंजाचे ठसे घेण्यात येऊन सेल्फी पॉईंट वरून पालकासह फोटो काढण्यात आले. प्रवेशोत्सव कार्यक्रमाच्या अध्यक्ष माननीय कुलगुरू श्री मनोहरजी चासकर साहेब यांच्या हस्ते बालकांचे स्वागत करून पुस्तक ,गणवेश व शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले याप्रसंगी कुलगुरू साहेबांनी गावकरी मंडळी शिक्षक वृंद यांचे शाळेच्या यशस्वी ते बद्दल अभिनंदन केले व शाळेस सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले या कार्यक्रमासाठी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री विलास आबासाहेब देशमुख, उपाध्यक्ष साहेबरावजी हंबर्डे तसेच सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक माणिकरावजी हंबर्डे साहेब ,माधव भारती ,एम .आर. राठोड सर ,पोलीस पाटील प्रवीण हंबर्डे ,शंकरराव हंबर्डे ,गोविंदराव हंबर्डे गावच्या सरपंच सौ. संध्याताई विलासराव हंबर्डे, शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष सौ.विजयश्री साहेबरावजी हंबर्डे ,रामचंद्र शेंबोले सर ,शिवाजीराव हंबर्डे, दीपकराव हंबर्डे तसेच गावातील शिक्षण प्रेमी प्रतिष्ठित नागरिक पालक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते...

#### चिटमोगरा शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप करून भेदेकर यांचा वाढदिवस साजरा

**नायगाव** -फुले-शाहू-आंबेडकर क्रांती मंचाचे संस्थापक अध्यक्ष



भास्कर भेदेकर यांचा वाढदिवस दरवर्षी सामाजिक उपक्रमांद्वारे साजरा करण्यात येतो. याच परंपरेनुसार यंदा त्यांचा वाढदिवस मौ. चिटमोगरा (ता. बिलोली, जि. नांदेड) येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक अशोक बावणे होते. शैक्षणिक साहित्याचे वाटप क्रांती मंचाचे कार्यकर्ते इंद्रजीत डुमणे व मुस्तफा पटेल कुंचेलीकर यांच्या वतीने करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारा हा उपक्रम गावात कौतुकास्पद ठरला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बहुजन कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल गायकांबळे, संतोष खरकाडे, महेश पाटील, स्वामी मॅडम, झुंजारे सर, सरपंच आकाश कोकणे, उपसरपंच नागसेन जिगळेकर, फुले-शाहू-आंबेडकर क्रांती मंचाचे सचिव सुनील कांबळे, उपाध्यक्ष गौसभाई शेख, रिपब्लिकन पार्टी व्यापारी आघाडीचे जिल्हाध्यक्ष धम्मदीप भद्रे आदी उपस्थित होते. तसेच निळकंठ तरटे, दीपक कांबळे, खाजाभाई शेख, शेषराव गावंडे, साहेबराव डुमणे, जयदीप कांबळे, नितीन कांबळे, श्रीकांत गायकवाड, नागनाथ शेळके, राहुल गायकवाड रातोळीकर, वाघमारे शेळगावकर, जाधव यांच्यासह अनेक चळवळीतील कार्यकर्त्यांची उपस्थिती लक्षणीय होती.भास्कर भेदेकर यांच्या सामाजिक बांधिलकीचे हे उदाहरण इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

#### शिवसेनेचा ५९वा वर्धापन दिन विविध उपक्रमांनी साजरा



**भोकर-** शिवसेनेच्या ५९व्या वर्धापनदिनानिमित्त हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. त्यानंतर दत्तगडावर वृक्षारोपण करण्यात आले तसेच भोकर येथील समाज प्रबोधन मंडळ संचलित निवासी अपंग विद्यालय भोकर येथील दिव्यांग विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. सदरील कार्यक्रमास तालुकाप्रमुख माधव पाटील वडगावकर, माजी तालुकाप्रमुख प्रदिप दौलतदार , माजी तालुका संघटक नारायण पाटील पोमनाळकर, युवा सेना उपजिल्हाप्रमुख माधव करेवाड, सचिन पा. किन्हाळकर, सोहम शेट्टे, नागेश पिठलेवाड, अदिनाथ लुंगारे, माजी शहरप्रमुख सुनिल जाधव, जगदीश पाटील.गडदे, सुनिल पवार, श्याम पा.वानखेडे गजानन तवर, चक्रधर कदम, यांच्यासह मुख्याध्यापक वाय. व्हि.सोळंके व इतर कर्मचारी वर्ग, अजित बेले, ओंकार चिंताकुटे, पठाण अयाजखान हबिबखान यांच्यासह असंख्य विध्यार्थी हजर होते.

# शाळेत प्रवेशासाठी पालकांची आर्थिक पिळवणूक जोमात

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि.१९ जून -**

हदगाव तालुक्यात शिक्षणाचे बाजारीकरण झाल्याचे दिसून येत आहे १६ जून रोजी महाराष्ट्र सरकारने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षासाठी सुरुवात झाली असून हदगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील व शहरी भागातील विद्यार्थी आपली शाळा निवडण्यासाठी व जाणे-येण्याच्या मित्रपरिवार सोबत राहावे यासाठी शाळेची निवड करतात व ती शाळा सुद्धा चांगली राहावी यासाठी या शाळेकडे कल विद्यार्थ्यांचा दिसतो हीच बाब जाणून हदगाव शहरातील एक नामांकित संस्था विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी पाचवी ते दहावी या वर्गासाठी एका विद्यार्थ्यांना दहा ते पंधरा हजार रुपये शुल्क आकारात असून त्यामुळे सर्वसामान्य कुटुंबातून जन्माला आलेल्या मुलाचा काय दोष चांगल्या शाळेत शिक्षण घ्यावे हे प्रत्येक विद्यार्थ्याचे स्वप्न असते व ते स्वप्न साकार करण्यासाठी त्या विद्यार्थ्यांच्या पालकांना १० ते १५ हजार रोखीने मोजावे लागतात तरच आपल्या पाल्याला त्या संस्थेमध्ये प्रवेश मिळू शकतो अन्यथा प्रवेश मिळत नाहीत.

ज्या विद्यार्थ्यांना या संस्थेमध्ये प्रवेश मिळण्यासाठी त्यासाठी त्यांना पूर्व परीक्षा सुद्धा द्यावी लागते त्या पूर्व परीक्षेत विद्यार्थी चांगल्या गुणसंख्येने घेऊन पास जरी झाला तरी त्यांना पैसे द्यावेच लागतात त्यासाठी या संस्थेवर नांदेड जिल्ह्यातील जिल्हा परिषद च्या अधिकाऱ्याचा कृपा आशीर्वाद आहे असं समजावे लागेल. जिल्हा परिषद माध्यमिक विभागाच्या शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मर्जी शिवाय ही संस्था १० ते १५ हजार प्रत्येक विद्यार्थ्याकडून शुल्क घेते व हे पैसे आम्ही विद्यार्थी तुकडी खाजगी शिकवणी विद्यार्थ्यांना सुविधा या नावाखाली असे पैसे घेण्याची सुरुवात करत आहेत त्यामुळे सर्वसामान्य गरीब कुटुंबातील हुशार जरी विद्यार्थी असाल तरी त्यांना या संस्थेत प्रवेश मिळत नाही प्रवेश मिळण्यासाठी त्यांना विद्यार्थ्यांची पात्रता नाही तर त्यांच्या वडिलांच्या खिशाची पात्रता तपासावी लागते.

नांदेड जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी या अशा हजारो रुपयांची फी वसुली घेणाऱ्या संस्थेवर काय कारवाई करतील व सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना प्रवेश निशुल्क मिळेल का? असा प्रश्न या निमित्ताने पालक वर्गातून उपस्थित होत आहे.

# ज्येष्ठ पत्रकार बजरंगसिंह हजारी यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या माहूर तालुकाध्यक्षपदी नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**माहुर, दि.१९ जून -**

माहूर येथील ज्येष्ठ पत्रकार तथा दैनिक सोलापूर तरुण भारतचे तालुका प्रतिनिधी बजरंगसिंह रामसिंह हजारी यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या माहूर तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष संग्राम पाटील मोरे यांच्याकडून त्यांची स्वाक्षरी असलेले या संदर्भातील नियुक्ती पत्र नुकतेच पत्रकार हजारी यांना प्राप्त झाले आहे.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे,प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे,अभयकुमार दांडगे, विभागीय अध्यक्ष अनिल सावंत यांच्या आदेशानुसार नांदेड जिल्हा कार्यकारणीने, माहूर येथील ज्येष्ठ पत्रकार तथा दै. तरुण भारतचे (मराठवाडा आवृत्ती) तालुका प्रतिनिधी बजरंगसिंह हजारी यांच्या वृत्तपत्र माध्यमातील प्रदीर्घ कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या माहूर तालुका अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

या निवडीबद्दल मराप संघाचे निवड समितीचे प्रदेशाध्यक्ष रुपेश पाडमुख, सरचिटणीस बापूसाहेब पाटील, जिल्हाध्यक्ष संग्राम पाटील मोरे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष लक्ष्मिकांत मुळे,जिल्हा कार्याध्यक्ष रामेश्वर काकडे, यांच्यासह अनेकांनी हजारी यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या असून, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे ध्येय धोरणे आणि कार्य प्रामाणिकपणे आपल्या कार्यक्षेत्रात पार पाडत पत्रकार संघाचे नाव अधिक उज्वल कराल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# दारुडे अन् गंजेटींनी केली पोलीसांची बत्ती गुल

## पोलीस लॉन्समध्ये व परिसरात उघडपणे तळीरामांचा गोंधळ

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.१९ जून -**

नांदेड परिक्षेत्र तथा नांदेड जिल्ह्यात ऑपरेशन फ्लश आउट अंतर्गत अवैध व्यवसाय तथा उघडपणे रस्त्यावर दारू ढोसून धिंगाणा घालणाऱ्या तळीरामांवर कारवाई करण्याची मोहीम चालू आहे मात्र दिव्याखाली अंधार या उक्तीप्रमाणे पोलीस अधिकारी व अंमलदार राहत असलेल्या स्नेह नगर पोलीस वसाहत परीसरात दिवस-रात्र तळीरामांनी आपला डेरा मांडला आहे. या तळीरामांवर कारवाई करावी अशी मागणी अनेकवेळा करण्यात आली परंतु पोलीसांची दखल पोलीसच घेत नसल्याची चर्चा वसाहतीत सुरु आहे.

स्नेह नगर येथील पोलीस वसाहतीतील वसाहत इन्चार्ज यांच्या कार्यालयालगत असलेले पोलीस लॉन्स, पोलीस पेट्रोल पंपच्या मागील बाजूस, जिम समोर व दवाखाना, शाळेसमोर दिवस-रात्र तळीरामांनी आपला डेरा मांडला



आहे. तळीरामांच्या धिंगाण्यामुळे पोलीस कुटुंबीयातील महिला व बालकांना ये-जा करणे अवघड झाले आहे. पोलीस लॉन्समध्ये टॉवर लाईट असविण्यात आला होता तळीरामांनी स्वत:च्या सोयीसाठी तो लाईट बंद केला. विशेष म्हणजे पोलीस लॉन्समध्ये तर पोलीस बॉईज व बाहेरील टुकार मुले हे सकाळी ११ ते रात्रीच्या १ वाजेपर्यंत खुलेआम पणे नशा करताना दिसतात. नुकतेच दि. १७ जुनच्या मध्यरात्री लॉन्स मध्ये व जिमच्या समोर रात्री उशिरापर्यंत नशापाणी करणाऱ्या तळीराम व अट्टल गुन्हेगार यांच्यामध्ये राडा होऊन एकमेकांवर खंजर उगारल्याची घटना घडली होती परंतु सुदैवाने गंभीर घटना होता होता वाचली असल्याची चर्चा वसाहतीमध्ये होत आहे. याबाबत पोलीस कर्मचाऱ्यांनी भाग्यनगर पोलीस ठाण्यात अनेकवेळा तक्रारी करून देखील कोणीच दखल घेत नसल्याने भविष्यात मोठ्या प्रमाणात गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वरिष्ठांनी यात विशेष लक्ष घालून क्यूआरटी किंवा आरसीपीच्या जवानांना या धिंगाणा घालणाऱ्या तळीरामांना चारी बाजूंनी घेरून त्यांना प्रसाद देऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणे आवश्यक आहे अशी अशी चर्चा पोलीस वसाहतीत होत आहे.

# वडगांव येथे घरफोडी ; दिड लाखाचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**तामसा, दि.१९ जून -**



शहरासह ग्रामीण भागात चोरीच्या घटनांत वाढ झाली असून जवळच असलेल्या वडगांव (बु.) येथे दिनांक १८च्या रात्री घरफोडी करुन घरातील सोन्याचे दागिने व नगदी रोख रक्कम अज्ञात चोरटयांनी लंपास केल्याची घटना दि. १८ जून रोजी रात्री घडली असल्याने चांगलीच खळबळ उडाली आहे. आता चोरट्या न चांगलीच दशहत माजवली असून या गावात चं घरफोडी ची घटना ताजी असताना ही पंधरावाड्यात दुसरी घरफोडी आहे होऊ या चोरी सत्रात तामसा पोलिसांच्या कर्तव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मागील काही दिवसांपूर्वी तामसा पोलीस ठाण्याच्या गेटसमोर व हाकेच्या अंतरावर असलेले मोबाईल शॉप व बँकेचे सीएससी केंद्र फोडून लाखो रुपयांचा ऐवज लंपास केला होता. परवाच भारतीय स्टेट बँकेतून पेरणीसाठी उचललेले शेतकऱ्याचे ९० हजार रुपये दोन महीला चोरट्यांनी लंपास केले. आणि मागील २ जून ला वडगांव येथे भर दिवसात घरफोडी ची ही घटना ताजी असताना हाकेच्या अंतरावर असलेल्या वडगांव (बु.) येथील हॉटेल व्यवसायिक सोमनाथ बालाजी नारेवाड हे दिनांक १५जून रोजी आपल्या भावाचा मोटारसायकल न अपघात झाल्यावर त्याचा उपचारासाठी नांदेड येथे विष्णुपुरी शासकीय दवाखान्यात एडमिट होता दिनांक १८रोजी सोमनाथ आपल्या भावाचे दवाखान्यात लागणारे कागद पत्र आणण्यासाठी तामसा ला आला आणि घराचे कुलूप लावून परत नांदेड ला घेल्यावर रात्री घरात कोणीच नाही याचा फायदा घेत चोरट्या न दिनांक १८ रोजी घराचे कुलप फोडून घराच्या आत लोखण्डी कपाटात ठेवलेल्या नकद ५० हजार व सोन्याचा दागिने लंपास केलं ही घटना सकाळी येथून जवळ रोड च्या दुसऱ्या बाजूला त्याचे आज्या राहतात त्यांनी सकाळी घराकडे येऊन पाहिल्यावर घराचे कुलप तोडलेलं निदर्शनास आल्यावर आपल्या नातू सोमा ला माहिती दिली घटना माहित झाल्यावर सोमनाथ न घरी आपल्या कपाट फोडलेलं दिसल्यावर त्यांनी कपाटात ठेवलेल्या सामनाची पाहणी केल्यावर कपाटातील सासू सुनेचे सोन्याचांदीचे दागिने व ५० हजार रुपये

चोरट्यांनी एक तोळ्याचे सोन्याचे गंठण,कानातले झूम्बर सहा ग्रॅम, सोन्याची अंगठी पांच ग्राम व नकद ठेवलेल्या ५० हजार रुपये असा एकूण दिड लाख रुपयाचा ऐवज लंपास केला आहे. हा सगळा प्रकार पाहून त्या कुटुंबीयांना धक्काच बसला. चोरीचा हा प्रकार तामसा पोलिसांना कळविला असता ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर, जमादार श्यामसुंदर नागरगोजे, चक्रधर पवार यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. . याप्रकरणी सोमनाथ नारेवाड यांच्या तक्रारीवरून तामसा पोलीस ठाण्यात आज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद झाला. . दिवसाच्या चोरीमुळे गावात खळबळ उडाली. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सहदेव खेडकर करीत आहेत.

# राज्यपालांसमवेत आ. भीमराव केराम यांची आदिवासी प्रश्नांवर चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि.१९ जून -**

ाज्यातील आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांबाबत चर्चा करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन मंत्री ना. नरहरी झिरवळ यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी आमदार व आदिवासी सामाजिक संघटनांचे शिष्टमंडळ आज राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची राजभवन, मुंबई येथे भेट घेण्यासाठी उपस्थित होते. या महत्त्वपूर्ण शिष्टमंडळात किनवटचे आमदार आ. भीमराव केराम यांची ठळक उपस्थिती होती.

या बैठकीत पेसा क्षेत्रांमध्ये आदिवासी कर्मचाऱ्यांची भरती करणे, सध्याच्या आदेशातील विसंगती दूर करणे, अवैध जात प्रमाणपत्र रोखण्यासाठी कायदा करणे, आदिवासी विद्यापीठाची स्थापना, मुंबई व पुणे विद्यापीठांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उभारणी, प्रलंबित वनहक्क दावे निकाली काढणे, व आदिवासी सल्लागार परिषदेच्या वर्षातून दोन वेळा बैठक घेणे यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा झाली.



या बैठकीत आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, आ. राजेंद्र गावित, आ. राजू तोडसाम, आ. आमश्या पाडवी, आ. नितीन पवार तसेच विविध आदिवासी सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या बैठकीत आ. भीमराव केराम यांनी किनवट व आसपासच्या परिसरातील आदिवासी जनतेच्या समस्यांकडे राज्यपालांचे लक्ष वेधले. त्यांनी स्थानिक पातळीवर रोजगार, शिक्षण व सामाजिक सुरक्षा यासंबंधी ठोस निर्णय घेण्याची गरज असल्याचे अधोरेखित केले.

# उमरी तालुक्यात अज्ञात खून झालेल्या मयताची नेटग्रिट ॲपचा वापर करून पटविली ओळख

**तभा वृत्तसेवा**
**उमरी, दि.१९ जून -**

तालुक्यातील धानोरा येथे अनोळखी युवकांचा गावातील आरोपींनी संशयाच्या कारणावरून मारहाण करून त्याचा खून केला होता. मयताजवळ कोणताच पुरावा नसल्याने पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. शेवटी वरिष्ठांची परवानगी घेऊन तांत्रिक विश्लेषण, नेटग्रीन ॲपचा वापर करून मयताची ओळख पटवून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक अंकुश माने यांनी दिली आहे.

उमरी तालुक्यातील धानोरा शिवारात १० मे २०२५ रोजी शेख फरदीन जमील वय २४ राहणार हैदराबाद (आंध्र प्रदेश) हा युवक डोक्यावर परिणाम असल्याच्या कारणांनी धानोरा शिवारात मध्यरात्री एका आखाड्यावर दाखल झाला. येथे उपस्थित असलेले आरोपी यांनी त्यास चोर समजून बेदम मारहाण करून जबरदस्त दुखापत झाल्याने नंतर त्यास उमरी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले पण यावेळी डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. मयताजवळ ओळख पटविण्यासाठी कोणताच पुरावा नसल्याने त्याचा मृतदेह नांदेड येथे सात दिवस तपासासाठी ठेवण्यात आले होजा. पण तपासात ओळख पटत नसल्याने शेवटी त्याचा कायदेशीर अंत्यविधी नांदेड येथे करण्यात आला. यानंतर या तपासात मोठे जिकरीचे काम असल्याने कोणताच ओळखीचा पुरावा उपलब्ध नसताना उमरी येथील पोलीस निरीक्षक अंकुश माने यांनी आंतरराष्ट्रीय आतंकवादी, गुन्हेगार यांची ओळख पटविण्यासाठी वापरले जाणारे तांत्रिक विश्लेषण व नीटग्रीट ॲपचा वापर करण्याची परवानगी वरिष्ठाकडून घेतली. जिल्ह्यात असा तपास केवळ प्रथमच करण्यात आला आहे. या ॲपद्वारे मयताची ओळख पटविण्यात आली. मयत हा आंध्रप्रदेश येथील बहादुरपुरा हैदराबाद येथील असल्याचे निष्पन्न झाले. यानंतर उमरी पोलिसांनी या ठिकाणी जाऊन मयताची आई, भाऊ यांना भेट घेतली. मयत हा त्यांचा नातेवाईक असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर मयताचा भाऊ शेख आफरीदी शेख जलील यांनी दिलेल्या तक्रारीवरून दि. ११ जून रोजी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तीन आरोपी अटक करण्यात आले आहे. यात दोन आरोपी बालगुन्हेगार तर उर्वरित गुन्हेगारांचा शोध चालू आहे.

या घटनेत पोलीस अधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक, विभागीय पोलीस अधिकारी धर्माबाद यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अंकुश माने यांनी महत्त्वपूर्ण तपासाची चक्री फिरवीत गुमनाम असलेल्या मयताचा पत्ता लावण्यात यश प्राप्त करून आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला व आरोपीला अटक केली आहे. ....

**मानसिक रुग्णांची माहीती कळवावी**

उमरी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील शहर व ग्रामीण भागात नागरिकांनी रात्री बेरात्री डोक्यावर परिणाम झालेले, वेडसर इसम कुठे आढळल्यास कायदा हातात न घेता पोलिसांना याची माहिती देऊन कळवावी जेणेकरून अनुचित घटना ह

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# माजलगाव शहर पोलीसांचा जुगार आड्यावर छापा

## आठ जुगारी ताब्यात, पन्नास हजाराचा मुद्देमाल जप्त



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१८ जून**

शहरातील गौतमनगर भागात काही इसम अवैद्यरीत्या जुगार खेळत असल्याची गोपीनय माहीती मीळाल्याने माजलगाव शहर पोलीसांनी दि.१८ जून रोजी छापा मारला असता आठ इसम रमी जुगार खेळत असताना मिळुन आले. तसेच त्यांचे ताब्यात जुगाराचे साहीत्य व नगदी रुपय व मोबाईल असा एकुण ५०, ८१० रुपयाचा मुद्देमाल मिळुन आल्याने सदर मुद्देमाल जप्त करुन आठ आरोपीतां विरुध्द पोस्टे गुरनं २२३/२०२५ कलम १२ (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत,अपर पोलीस अधिक्षक आंबाजोगाई चेतना तीडके , मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ ,पोलीस उपनिरीक्षक संदिप राठोड, गवळी, मिरकले यांनी केली.

# सीईओ जितीन रहमान यांनी पदभार स्वीकारला



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ जून**

जिल्हा परिषदेचे नूतन सिइओ जितीन रहमान यांनी गुरुवारी पदभार स्वीकारला. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी त्यांचे स्वागत केले.

बीड जिल्हा परिषदेचे सिइओ आदित्य जिवने यांची मागील आठवड्यात बदली झाली. त्यांच्या जागी नियुक्ती झालेले एम मुरुंगनाथम यांनी येण्यासाठी नकार दिला.

त्यानंतर वर्धा जिल्हा परिषदेचे सिइओ जितीन रहमान यांची नियुक्ती करण्यात आली. रहमान यांनी गुरुवारी १९ जुन रोजी पदभार स्वीकारला. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सोळंके यांनी त्यांचे पुष्पगुछ देऊन स्वागत केले.

# भाजपा शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टे यांच्या वतीने परळीतील यशवंतांचा गौरव

## ना.पंकजाताईंचे गौरवपत्र देत केला सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१९ जून**

परळी शहरातील रहिवासी असलेल्या व शैक्षणिक,क्रिडा व तंत्रज्ञान क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत परळीचा नावलौकिक वाढवणार्या सोमेंद्र शास्त्री, सुजित पिंपळे,कु.सिध्दी टिंबे या यशवंत विद्यार्थ्यांचा भाजपा शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टे यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देत शाल श्रीफळ,पुष्पगुच्छ व राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचे गौरवपत्र देत सन्मान केला.

परळी शहरातील रहिवासी वाराणसी येथील रासायनिक अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभागात संशोधन करत असलेला सुजित पिंपळे याचा संशोधनप्रबंध कार्बन डायऑक्साइड कॅप्चरसाठी बायफेसिक टीका,टिमीडा मिश्रणाचे प्रायोगिक आणि विशिष्टता विश्लेषण आंतरराष्ट्रीय दर्जाचे जर्नल,'रासायनिक अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान'मध्ये प्रकाशित झाले आहे.ही परळीसाठी गौरवाची बाब असुन.सोमेंद्र शास्त्री याने नुकत्याच थायलंड येथे पार पडलेल्या योगा स्पर्धेत दोन सुवर्णपदके पटकावली आहेत.नुकत्याच जाहिर झालेल्या नीट परिक्षेत यश संपादन केलेल्या कु.सिध्दी टिंबे या यशस्वी विद्यार्थ्यांच्या



निवासस्थानी दि.१८ जुन रोजी भेटी देत भाजपा शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टे यांनी गौरव करत पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी सौ.ऊज्वला काटकर, सौ.तारावती अग्रवाल,सौ.छाया देशमुख,श्रीमती सुचेता पोखरकर, सुशील हरंगुळे,दत्ता गोपनपाळे, विकास हालगे, अनिल चौंडे, नितीन हालगे,नरेश पिंपळे,रमेश चौंडे,भूषण आंबेकर आदी उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराज हे देशाचा गौरव – जनार्दन पाटील

## सर्व सामान्यांसाठी दिल्लीत शिवस्वराज भवन उभारणार

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१९ जून**




रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज हे या महाराष्ट्राचे नाही तर देशाचा गौरव आहे.दिल्लीत महाराष्ट्राचा सन्मान वाढला पाहिजे. यासाठी मी प्रयत्नशील असून महाराष्ट्रातील शिवप्रेमींनी शिवरायांचा आदर्श अंगीकारला पाहिजे असे प्रतिपादन विश्वभूषण राजे शिवछत्रपती चेतना यात्रा चे प्रमुख जनार्दन पाटील यांनी केले.ते परळी येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, देशभरात शिवरायांच्या नावाने एक लाखापेक्षा अधिक संस्था आहेत.परंतू त्यांच्यात देशपातळीवर समन्वय नाही.समन्वयाचा अभाव असल्याने महाराष्ट्राचे दिल्लीत जसे असायला हवे तसे स्थान नाही.तसेच विविध क्षेत्रातील तज्ज्ञ, गुणवंतांचा, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते यांचा दिल्लीत गौरव करण्याचा संकल्प व्यक्त केला.तसेच देशपातळीवर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली कार्याचा प्रसार करण्यासाठी ही संघटना काम करत आहे.

महाराष्ट्राचा गौरव देशात वाढला पाहिजे.याकरिता अराजकीय उद्देशाने फुले शाहू आंबेडकरी, कल्याणकारी, मानवतावादी विचार लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी दिल्लीत विश्व भूषण राजे शिवछत्रपती चेतना संघटना काम करत आहे. सदर संघटना देशात १४ राज्यात कार्यरत आहे.लवकरच दिल्लीत छत्रपती संभाजी राजे यांच्या हस्ते लवकरच दिल्लीत प्रचार कार्यालयाचे उद्घाटन करण्यात येणार असल्याचेही जनार्दन पाटील यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला मराठा सेवा संघाचे संजय सुरवसे उपस्थित होते.

# पद्मश्री वेदशास्त्रसंपन्न श्री गणेश्वर शास्त्री द्रविड गुरुजी यांच्या दिव्य मार्गदर्शनाखाली पवित्र यज्ञ विधी संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ जून**

श्री क्षेत्र तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान येथे पद्मश्री वेदशास्त्र संपन्न श्री गणेश्वर शास्त्री द्रविड गुरुजी यांच्या दिव्य मार्गदर्शनाखाली पवित्र वातावरणात संपन्न झाला.या यज्ञाचे प्रमुख आचार्य म्हणून गजानन गुरुजी गुंजकर पुणे (राजपुरोहित) यांनी व वेदशास्त्र संपन्न ऋषिकेश (राजू) पाठक यांच्या समवेत सर्व ब्रह्मवृंदांच्या मंत्रोच्चाराच्या शक्तीने या चालन विधीचा अध्यात्मिक उत्सव केला.

दि.१६ जून २०२५ या शुभमुहूर्तावर श्री तुळजाभवानी मंदिरातील प्रसाद चालन विधी संपन्न झाला. तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या शुभहस्ते आस्था व श्रद्धेने पार पडला. हे मंगलकार्य माय भवानीच्या असीम कृपेने सर्व भक्तांसाठी एक अध्यात्मिक ऊर्जा देणारे ठरले आहे.

या यज्ञाचे प्रमुख आचार्य म्हणून गजानन गुरुजी गुंजकर व वेदशास्त्र संपन्न श्री ऋषिकेश उर्फ राजू पाठक यांच्या समवेत झाल्याबद्दल माजलगाव भाजपाचे शहर मंडल अध्यक्ष तथा नगरसेवक विनायक रत्नपारखी, भाजपा मराठवाडा सोशल मीडियाचे संयोजक दत्ता महाजन यांच्यासह भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ.प्रशांत पाटील, डॉ.स्वानंद कुलकर्णी यांच्यासह पत्रकार बंधू व माजलगावमधील सर्व ब्रह्मवृंद व मित्र परिवाराच्या वतीने सर्व स्तरातून माजलगावचे भूमिपुत्र राज पुरोहित, गजानन गुंजकर गुरुजी, वेदशास्त्र संपन्न ऋषिकेश पाठक यांचे कौतुक होत आहे.

# अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या एनपीए व्यवस्थापनामुळे बँकेस भारतरत्न सहकारिता पुरस्कार प्रदान

## ग्राहकांचा विश्वास व सहकार्याच्या बळावरच पिपल्स बँकेने हे यश मिळवले – राजकिशोर मोदी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१९ जून**

अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या बँकेला एनपीएचे व्यवस्थापन सर्वोत्तम केले यासाठी शहरी सहकारी बँक गटात 'भारतरत्न सहकारिता पुरस्कार - २०२५' ने नुकतेच गौरवविण्यात आले आहे. अंबाजोगाई पीपल्स बँकेने पारदर्शक, गतिमान कारभार व तत्पर सेवेला नेहमीच प्राधान्य दिले आहे. त्यामुळे नेहमीच उत्तम टीमवर्क करून बँकेने सभासद, ठेविदार, ग्राहक आणि हितचिंतक यांची विश्वासार्हता कमावली व याच विश्वासाच्या बळावरच बँक हे यश मिळवू शकली असे बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी सांगितले.

यंदा चालू आर्थिक वर्षामध्ये बँकेस मिळालेला पुरस्कार हा बँकेचे सर्व सन्माननीय संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, अधिकारी, सर्व शाखाधिकारी, कर्मचारी यांनी केलेल्या उत्तम टीम वर्कचेच फलित आहे. सहकार क्षेत्रामध्ये काम करीत असताना एखाद्या बँकेने केंद्र सरकार, आरबीआय, सहकार खाते आणि बँकींगचे सर्व नियम पाळून समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत बँकींग सेवा, विविध सुविधा उपलब्ध करून देत आर्थिक वर्षात आपला एनपीए शुन्य टक्के ठेवण्याचा, कमीत-कमी राखण्याचा अटोकाट प्रयत्न केला पाहिजे, यासाठीच काटेकोरपणे काम करीत बँकेकडून एनपीएचे व्यवस्थापन सर्वोत्तम केले जाते. अंबाजोगाई पीपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या आपल्या बँकेने ही आपला एनपीए हा कमीत-कमी राखण्याचा, ठेवण्याचा अटोकाट प्रयत्न प्रत्येक आर्थिक वर्षांत केलेला आहे. अंबाजोगाई पीपल्स बँकेने एनपीएचे व्यवस्थापन सर्वोत्तम केले याची दखल घेत आशिया खंडातील सहकारी बँकिंगसाठी सर्वात मोठे व्यासपीठ असलेले भारत कॉपरेटीव्ह बँकिंग समितीच्या वतीने मुंबई येथील 'द ललित' या पंचतारांकित हॉटेलच्या सभागृहात या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अंबाजोगाई पीपल्स बँकेला एनपीएचे सर्वोत्तम व्यवस्थापन करणारी शहरी सहकारी बँक या गटात 'भारतरत्न सहकारिता पुरस्कार' देवून गौरविण्यात आले. सदरचा पुरस्कार दळणवळण मंत्रालय, भारत सरकारचे उपमहासंचालक सुमनेश जोशी यांच्या हस्ते बँकेचे तज्ज्ञ संचालक संदेश बोराडे, संगणक विभागप्रमुख गणेश रोकडे यांनी स्विकारला. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, ग्रंथ असे आहे. यावेळी उपमहासंचालक जोशी यांनी, सध्याचे बँकिंग व्यवहार हे डिजिटल असून यामुळे




बँकेस अत्यंत वेगाने गती मिळाली आहे. मात्र सायबर क्राईमची जोखीम सुध्दा प्रचंड वाढल्याने सर्वांनी सतर्कता बाळगावी असे सांगितले. भारत जगातील तंत्रज्ञानात लवकरच प्रथम क्रमांकावर असेल असेही ते यावेळी म्हणाले. पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल आमच्या प्रतिनिधीशी बोलताना बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी यांनी सांगितले की, अंबाजोगाई पीपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या आपल्या बँकेने सुरूवातीपासून एनपीए कमीत-कमी राखला आहे. सर्वच शाखांतून बँकींग विषयक सर्व आधुनिक सेवा, सुविधा, नवे तंत्रज्ञान, डिजिटल व्यवहार बँक सभासद आणि ग्राहकांना पुरविते. यापूर्वी ही बँकेस विविध सन्मान व पुरस्कार प्राप्त झाले आहेत. अंबाजोगाई पीपल्स बँकेच्या सर्वांगिण प्रगती आणि विकासात बँकेचे व्हाईस चेअरमन प्रकाश सोळंकी, सर्व संचालक वसंतराव चव्हाण, ॲड.विष्णुपंत सोळंके, पुरूषोत्तम चोकडा, सुरेश मोदी, ॲड.सुधाकर कराड, श्रीमती वनमाला रेड्डी, संकेत मोदी, शेख दगडू शेख दावल, सौ.स्नेहा हिवरेकर, सुधाकर विडेकर, प्रकाश लखेरा, हर्षवर्धन वडमारे, तज्ज्ञ संचालक सचिन बेंबडे, तज्ज्ञ संचालक सुनिल राजपुरोहित, मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे, बँकेचे सर्व सन्माननीय सभासद, ठेविदार, खातेदार, ग्राहक, हितचिंतक, बँकेचे सर्व अधिकारी, शाखाधिकारी, कर्मचारीवृंद व पिग्मी एजंट यांचे सातत्यपूर्ण सहकार्य व योगदान असल्याची माहिती चेअरमन राजकिशोर मोदी यांनी दिली. अंबाजोगाई पीपल्स बँकेस पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सर्वस्तरांतून बँकेचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

# भगवान विद्यालयात पुष्पगुच्छ व औक्षण करून विद्यार्थ्यांचे केले स्वागत

## स्वागतासाठी शाळेच्या प्रवेशद्वारावर उभारली डिजिटल कमान

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१९ जून**




येथील भगवान प्राथमिक विद्यालयात शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ व औक्षण करून स्वागत करण्यात आले. संस्थेच्या अध्यक्षा भाग्यश्रीताई कराड व सचिव प्रियाताई कराड यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन वर्षाचा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळेच्या मुख्यप्रवेशद्वारावर स्वागतासाठी डिजिटल कमान उभारण्यात आली होती. पहिल्याच दिवशी मोठ्या संख्येने व उत्साहाने विद्यार्थी शाळेत आले होते. यावेळी शाळेच्या सांस्कृतिक विभागाने व शाळेतील शिक्षिका व शिक्षकांनी मोठ्या उत्साहात त्यांचे औक्षण, पुष्पगुच्छ व चॉकलेट देऊन स्वागत केले.त्यानंतर शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांना पुस्तक वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती मातेच्या प्रतिमा पुजनाने करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक लिंबाजी दहिफळे, सांस्कृतिक विभागाचे प्रमुख बंडू अघाव, महिला पालक भारतीताई उपस्थित होत्या. यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील जेष्ठ शिक्षक तथा कवी/शाहीर अनंत मुंडे यांनी केले तर आभार गोविंद मुंडे यांनी मानले. शाळेतील शिक्षक राजेश विभूते यांचा याच दिवशी वाढदिवस आसल्यामुळे त्यांच्या वतीने विद्यार्थ्यां व शिक्षकांना अल्पोपहार देण्यात आला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका यांनी प्रयत्न केले.यावेळी विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.

# राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सर्कल अध्यक्ष आणि कार्याध्यक्षांच्या निवडी जाहीर

## पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र बहाल

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१९ जून**

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आगामी निवडणुका लक्षात घेता पक्ष आणि संघटन बांधणीच्या कामाला वेग आणला आहे. पक्षाचे सर्वेसर्वा आणि देशाचे नेते शरदचंद्र पवार तसेच पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरून आणि जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या अनुमतीने परळी तालुक्यातील जिल्हा परिषद सर्कल अध्यक्ष आणि कार्याध्यक्ष यांच्या नव्या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत. पक्षाच्या शहरातील मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयात पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या हस्ते सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना निवडीचे पत्र देण्यात आले. यावेळी त्यांनी सर्वांचे अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने वेगाने कामाला लागला असून, पक्ष आणि संघटन बांधणीला गती देण्यात आली आहे. यावेळी पक्षाचे नेते राजेभाऊ फड, तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे पाटील, ज्येष्ठ नेते उत्तम दादा माने, ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष एच.यू.फड, मुक्ताराम गवळी, यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरून टप्प्या टप्प्याने निवडी जाहीर करण्यात येत आहेत. बुधवार, दि.१८ जून रोजी परळी वैजनाथ तालुक्यातील जिल्हा परिषद सर्कलचे अध्यक्ष तथा कार्याध्यक्ष यांच्या निवडी करण्यात आल्या. यामध्ये दादाहरी वडगाव सर्कल अध्यक्षपदी



बब्रुवान आघाव, सर्कल कार्याध्यक्षपदी शिवाजी शिंदे, पिंपरी बुद्रुक सर्कल अध्यक्षपदी दत्ता चव्हाण तर कार्याध्यक्षपदी प्रकाश मुंडे, सिरसाळा सर्कल कार्याध्यक्षपदी बाळासाहेब पवार तर अध्यक्षपदी सय्यद अजमत सय्यद आबेदाली, नागापूर सर्कल कार्याध्यक्षपदी विलास तेलंग तर अध्यक्षपदी पंडित मुंजाजी भोसले यांच्या निवडी करण्यात आल्या तर तालुक्यातील सर्वात मोठ्या असलेल्या सिरसाळा शहराच्या अध्यक्षपदी फिरोज शेख यांची निवड घोषित करण्यात आली आहे. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना निवडीचे पत्र देण्यात आले असून, वरिष्ठांनी सर्वांचे अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या.